विषय क्रमांक १ : ~~दिनांक १७/०९/२०२१ रोजी संपन्न झालेल्या संचालक मंडळ सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.~~

दिनांक १६ सप्टेंबर, २०२२ रोजीचे दुपारी ११.०० वाजता मा. मंत्री, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली, शासकीय विश्रामगृह, नाशिक येथे संपन्न झालेल्या संचालक मंडळ सभेचे इतिवृत्त

सभेस खालील प्रमाणे सन्माननिय संचालक व अधिकारी उपस्थित होते.

| अ. क्र. | मा.संचालक सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १. | मा.ना.डॉ. विजयकुमार गावित,<br>मंत्री, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२. | अध्यक्ष, (पदसिध्द) |
| २. | मा.श्री. सुनिल चंद्रकांत भुसारा | संचालक |
| ३. | मा. श्री. भरतलाल थुकेलसिंग दुधनाग | संचालक |
| ४. | मा.श्री.मधुकर निंबाजी काठे | संचालक |
| ५. | मा. श्री. धनराज हरिभाऊ महाले | संचालक |
| ६. | मा. श्री. विकास दुलाजी वळवी | संचालक |
| ७. | मा. श्री. विठ्ठल देवराम देशमुख | संचालक |
| ८. | मा. श्री. केवलराम तुळशीराम काळे | संचालक |
| ९. | मा. श्री. मगन नुरा वळवी | संचालक |
| १०. | मा. श्री.अशोक भाऊराव मंगाम | संचालक |
| ११. | मा. श्री. प्रकाश तुळशीराम दडमल | संचालक |
| १२. | मा. श्रीमती मिनाक्षी अर्जुनराव वट्टी | संचालिका |
| १३. | मा. श्रीमती ताराबाई शंकर माळेकर | संचालिका |
| १४. | मा.श्रीमती जयश्री नामदेव तळपे | संचालिका |
| १५. | ट्राईफेड, नवी दिल्ली यांचे प्रतिनिधी | संचालक, (पदसिध्द) |
| १६. | अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक | संचालक, (पदसिध्द) |
| १७. | आयुक्त,<br>आदिवासी विकास विभाग, (महाराष्ट्र राज्य), नाशिक. | प्रतिनिधी |
| १८. | सहनिबंधक सहकारी संस्था, (महाराष्ट्र राज्य), नाशिक. | संचालक, (पदसिध्द) |
| १९. | श्री.गणेश जनार्दन सुकाळे | कर्मचारी प्रतिनिधी |
| २०. | श्री.अमोल फुलचंद धुर्वे | कर्मचारी प्रतिनिधी |
| २१. | जालिंदर नामदेव आभाळे | महाव्यवस्थापक (प्रशासन) |
| २२. | बाबासाहेब शिंदे | महाव्यवस्थापक (वित्त) |
| २३. | विजय शिवाजी गांगूर्डे | महाव्यवस्थापक (विपणन) |

उपस्थित सर्व संचालक यांनी मा. मंत्री, आदिवासी विकास तथा अध्यक्ष, आदिवासी विकास महामंडळ यांचे पुष्पगुच्छ व हार देवून स्वागत केले.

मा.व्यवस्थापकीय संचालक हे सभेस हजर नसल्याने महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी सभेचे कामकाज सांभाळावे असे मा. मंत्री तथा अध्यक्ष यांनी सभेत सूचित केले त्यास मा.श्री.भरतलाल दुधनाग, संचालक यांनी अनुमोदन दिले.

प्रथम दिवंगत राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील तसेच आदिवासी विकास महामंडळातील अधिकारी / कर्मचारी यांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

त्यानंतर भारतातील प्रथम आदिवासी महिला सौ.द्रोपदी मुर्मु यांची महामहिम राष्ट्रपती म्हणुन निवड झाल्यामुळे त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

मा. अध्यक्ष, आदिवासी विकास महामंडळ तथा मा.मंत्री, आदिवासी विकास यांनी सभेकरीता उपस्थित सदस्य यांची गणपुर्ती झाल्याने विषयसुचीप्रमाणे सभेचे कामकाज सुरु करण्यास अनुमती दिली.

**विषय क्रमांक १ : संचालक मंडळ सभा दिनांक १७.०९.२०२१ रोजीचे इतिवृत्तास वाचुन कायम करणे.**

महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी दिनांक १७.०९.२०२१ रोजी संपन्न झालेली संचालक मंडळ सभेचे इतिवृत्ताचे वाचन केले.

विषय क्रमांक १५ वर चर्चा करतांना मा. भुसारा सो. यांनी तेलपंप, विजपंप व एचडीपीई पाईप वाटपासाठा शासनाकडुन प्राप्त निधीपैकी शिल्लक असलेला निधी रुपये ५७.४७ कोटी ही रक्कम शासनास परत करण्यांत आलेली आहे. त्यामुळे बरेच मंजुर यादीमधील आदिवासी लाभार्थी या योजनेपासुन वंचित राहिले आहेत. त्यामुळे सदरची योजना कृषी विभागाकडुन आपले विभागाकडे परत घेण्यासाठी शासनास प्रस्ताव सादर करावा. तसेच ज्या योजना यापुर्वी महामंडळाकडुन राबविल्या जात होत्या त्या योजना पुर्ववत सुरु करणेसाठी शासनाकडे पाठपुरावा करावा.

विषय क्रमांक ३३ वर चर्चा करतांना मा. दुधनाग, संचालक व मा.भुसारा, संचालक यांनी बारदाना, ताडपत्री व मॉईश्चर मिटर खरेदीसाठी एकुण किती खर्च झाला आहे याची आकडेवारी विस्तृत केलेली नसल्याने सदरच्या विषयास मंजुरी न देता सदर विषय पुढील सभेत ठेवणेबाबत सुचित केले आहे.

विषय क्रमांक ३८ वर चर्चा करतांना मा. मंगाम, संचालक यांनी अनेक खरेदी केंद्रांना भेटी दिल्या असता, बोगस धान खरेदी झाल्याचे निदर्शनास आले आहे. साठा तपासणी केली असता महामंडळाकडील प्रत्यक्षात नोंदीप्रमाणे खरेदी केंद्रावर धान साठा आढळुन आलेला नाही. श्री.दुधनाग सो. यांनी मुरुमगाव येथे ९ हजार क्विं. पेक्षा जास्त धान खराब झाल्याचे सांगितले. यावर श्री. विजय गांगुर्डे, महाव्यवस्थापक ( विपणन ) यांनी स्पष्टीकरण केले की, ज्या ठिकाणी असे प्रकार उघडकीस आलेले आहेत त्या ठिकाणच्या कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कार्यवाही सुरु केलेली आहे. याबाबत मा.अध्यक्ष महोदय यांनी सांगितले की, याबाबत संबंधित प्रादेशिक कार्यालयाची तपासणी करण्यासाठी समिती गठीत करणे व आधारभुत योजनेत धानाची उचल वेळेवर होत नसल्याने तसेच, आदिवासी सोसायटींकडे साठवणुकीसाठी गोदाम नसल्याने घट-तुट जास्त प्रमाणात येते व महामंडळास नाहक तोटा सहन करावा लागतो. त्यामुळे आधारभुत खरेदी योजनेमध्ये येणारा तोटा शासनाने भरुन काढावा व सदरची योजना महामंडळाकडुन काढुन घेणेबाबत शासनास कळवावे.

विषय क्रमांक ४० वर चर्चा करतांना मा. भुसारा, संचालक यांनी महामंडळामध्ये सन २०१३-१४ मध्ये झालेल्या भरतीमध्ये महामंडळामध्ये रुजु झालेल्या अधिकारी/ कर्मचारी हे भरती प्रक्रीया रद्द करणेच्या आदेशाच्या विरोधात कोर्टात गेले असतांना त्यांना ७ वा वेतन आयोग लागु का करण्यांत आला. यावर महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी शासनाने दिनांक १८ जानेवारी, २०२२ च्या शासन निर्णयात महामंडळात जेवढी पदे भरलेली आहेत, त्यांनाच सुधारित वेतनश्रेणीचा लाभ अनुज्ञेय आहे, असे शासन निर्णयात नमुद केले असल्याचे सभागृहाच्या निदर्शनास आणुन दिले. त्यामुळे, दि.०१/०७/२०२१ रोजी महामंडळात जेवढी पदे कार्यरत होती, त्यांना ७ वा वेतन लागु केल्याचे सांगितले.

त्यानुसार महामंडळाने कार्यवाही केलेली आहे. यावर मा. मंत्री तथा अध्यक्ष महोदय, यांनी सांगीतले की, जर महामंडळाने सदर अधिकारी / कर्मचारी यांना नियुक्ती आदेश दिलेले आहेत. त्यामुळे त्यांना शासनाचे आदेशाप्रमाणे लाभ देणे योग्य आहे. त्यावर मा. मंगाम सो. संचालक यांनी भरती प्रक्रीयेसंदर्भात मे. उच्च न्यायालय, नागपुर येथे सुरु असलेल्या केस संदर्भात तज्ञ वकीलाची नेमणुक करुन प्रकरण लवकरात लवकर निकाली काढण्याचा प्रयत्न करावा. यावर महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी सदर प्रकरणासाठी मे. उच्च न्यायालय, नागपुर येथील केस लढविण्यासाठी वरीष्ठ वकील श्री. मनोहर यांची नियुक्ती केलेली आहे. मे. उच्च न्यायालयात महामंडळाच्या वतीने ते कामकाज करीत आहेत. तसेच, याबाबत मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपुर येथील निबंधक यांना पत्राव्यवहार केलेला असल्याचे सांगितले.

**ठराव क्रमाक १ :** दिनांक १७.०९.२०२१ रोजी संपन्न झालेल्या संचालक मंडळ सभेचे इतिवृत्तामधील उपरोक्त चर्चा झालेले विषय क्रमांक ३२, ३३, ३८ हे विषय सविस्तर माहीतीसह पुढील संचालक मंडळात ठेवण्यात यावेत. उर्वरीत विषयांस ही संचालक मंडळ सभा मंजुरी देत आहे.

**सुचक** : मा. श्री. धनराज हरीभाऊ महाले, संचालक सदस्य
**अनुमोदक** : मा. श्री. भरतलाल दुकेलसिंग दुधनाग, संचालक सदस्य

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्र.०२ सन २०२२-२०२३ या वर्षाचा मंजूर अर्थसंकल्पित निधी व सन २०२३-२०२४ च्या वार्षिक अंदाजपत्रकाला मान्यता देणे बाबत.**

केंद्र व राज्य शासनाकडुन महामंडळास भागभांडवल,अनूदान व अर्थसहाय्य प्राप्त होते. आर्थिक वर्ष २०२१-२०२२ व २०२२-२०२३ मधील लेखाशिर्षनिहाय योजनेतंर्गत व योजनेत्तर मागणी अर्थसंकल्पित व प्रत्यक्ष प्राप्तचा तपशिलानुसार आर्थिक वर्ष २०२३-२०२४ मधील मागणीचे अंदाजपत्रक खालील प्रमाणे सादर करणेत येत आहे.

| लेखाशिर्षक | वर्ष २०२१-२०२२ | | | वर्ष २०२२-२०२३ | | | २०२३-२४ अंदाज पत्रक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | मागणी | अर्थसंकल्पित | प्रत्यक्ष | मागणी | अर्थसंकल्पित | प्रत्यक्ष | |
| राज्य शासन : | | | | | | | |
| भागभांडवल (4425 0472) | 5108.68 | 0.00 | 0.00 | 5108.68 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| सहाय्यक अनुदान (2425 0853) | 0.00 | 300.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| खावटी कर्ज **(2425 1493)** | 0.00 | 30000.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| गौणवनोपज (MSP) २५% **(2425 2426)** | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| **एकूण** | **5108.68** | **30300.00** | **0.00** | **5108.68** | **00.00** | **0.00** | **0.00** |
| **केंद्रशासन :** | | | | | | | |
| गौणवनोपज (वि.कें.अ.) **(2425 0862)** | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| गौणवनोपज (MSP) ७५% **(2425 2426)** | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| **एकूण :** | **0.00** | **0.00** | **0.00** | **0.00** | **0.00** | **0.00** | **0.00** |
| **एकूणांत:** | **5108.68** | **30300.00** | **0.00** | **5108.68** | **0.00** | **0.00** | **0.00** |
| **राज्य शासन :** | | | | | | | |
| व्यवस्थापकीय अनुदान **(2425 0853)** | 4267.26 | 3537.50 | 3212.50 | 5791.84 | 3400.00 | 1734.00 (apr.22 to Aug22) | 6156.28 |
| **एकूण:** | **4267.26** | **3537.50** | **3212.50** | **5791.84** | **3400.00** | **1734.00** | **6156.28** |
| **एकूणांत :** | **9375.94** | **33837.50** | **3212.50** | **10900.52** | **3400.00** | **1734.00** | **6156.28** |

उपरोक्त प्रमाणे आर्थिक वर्ष २०२३-२०२४ मधील योजनेतंर्गत एकूण रु.६१५६.२८ लक्ष अंदाजपत्रकास मान्यता मिळणेसाठी सादर. २०२३-२०२४ चे अंदाजपत्रकासाठी वरील प्रमाणे सादर करणेत येत आहे. असे सविस्तर वाचन महाव्यवस्थापक (वित्त) यांनी केले. सदर विषयावर सविस्तर चर्चा होवुन उपरोक्त तक्ता मध्ये खावटी कर्ज योजना, किमान आधारभुत किंमत खरेदी योजना (गौणवनोपज) यामध्ये निरंक रक्कम दर्शवली आहे असे संचालकांनी निदर्शनात आनुन दिले. या बाबात खावटी कर्ज योजना व गौणवनोपज करता निधीची मागणी व प्रस्ताव विपणन विभागाने सादर करावा. व त्या नुसार त्याच्या समावेश अंदाज पत्रकात मागणी करण्यात यावी अशी मागणी केली.

यावर मा. अध्यक्ष यांनी सदर बाबींचा समावेश अंदाज पत्रकात व प्रास्ताव सादर करण्याचे निर्देश दिले. सदर विषयावर सविस्तर चर्चा होवुन खालील प्रमाणे ठराव बहुमताने मंजुर करण्यात आला.

**ठराव क्र.०२ : सर्वानुमते ठराव समंत करण्यात येतो की, सन २०२२-२०२३ या वर्षाच्या मंजुर अर्थसंकल्पित** निधी व सन २०२३-२०२४ च्या वार्षिक अंदाजपत्रकास सदर सभा मान्यता देत आहे. व खावटी कर्ज योजना, किमान आधारभुत किंमत खरेदी योजना (गौणवनोपज) प्रस्ताव शासनास सादर करण्यास व यासंबधीचे पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांना देण्यात येत आहेत.

सुचक :- मा श्री. धनराज हरिभाऊ महाले.
अनुमोदक :- मा श्रीमती. मिनाक्षी अर्जुनराव वट्टी.

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**विषय क्र.०३ सन २०१९-२०२० चे संवैधानिक लेखापरिक्षण अहवालाचे वाचन करुन स्विकृत करणे बाबत.**

केंद्र शासनाने केलेल्या ९७ व्या घटनादुरुस्तीतील अनुच्छेद २४३ झेड. एम नुसार व राज्य शासनाचे अध्यादेश दि.१४/०२/२०१३ अनुसरुन कलम ८१ मधील सुधारणानुसार महामंडळाचे सहकार कायद्यान्वये बंधनकारक असलेले संवैधानिक लेखापरिक्षण सहकार आयुक्त यांच्या नामतालिकेवरील "अ" सुचित समाविष्ठ असणारे सनदी लेखापाल धोंगडेपाटील गोधानी अँण्ड कंपनी, सनदी लेखापाल, नाशिक यांची सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षाचे संवैधानिक लेखापरीक्षण करणे करीता दि.२९.०९.२०१९ च्या संचालक मंडळ सभाचा ठराव क्र.४५ व दि.३०.०९.२०१९ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ठराव क्र.५ पारीत करण्यात आला होता. महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाने मा.अध्यक्ष यांच्या मान्यतेने व मुख्य कार्यालयाचे आदेश क्र. आविम/लेखा-२/लेखापरिक्षण/४६५५/२०१९ नाशिक दि.०६.१२.२०१९ अन्वये नेमणुक करण्यात आली होती.

महामंडळाचे दि.०१/०४/२०१९ ते दि.३१/०३/२०२० या कालावधीचे लेखापरिक्षण पुर्ण झाले आहे. त्याचा लेखापरिक्षण अहवाल मुख्य कार्यालास दि.२७/०५/२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. सदर अहवालातील महत्वांच्या मुद्याचा गोषवारा संचालक मंडळाच्या सभेसाठी व्यवस्थापनाचे अभिप्राय मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

सन २०१९-२०२० या वर्षात महामंडळास "ब" वर्ग मिळाला आहे. प्राप्त लेखापरिक्षण अहवालाच्या गोषवाऱ्यातील मुद्यास मान्यता मिळावी. तथा सदरच्या लेखा परीक्षण अहवालाची दोष दुरुस्ती विहीत कालावधीत करुन आगामी संचालक मंडळाच्या सभेत सादर करण्यात येईल व सदरचा लेखापरीक्षण अहवाल आगामी वार्षिक सर्व साधारण सभेत सादर करण्यात येईल, करीता मान्यतेस सादर. सदरचा विषय महाव्यवस्थापक (वित्त) यांनी सभे समोर सादर केला. श्री. धोंगडे पाटील गोधानी, सनदी लेखापाल, नाशिक यांना व त्यांचे प्रतीनिधीनां सभे मध्ये बोलवण्यात आले.

सादर सवैधानिक लेखापरीक्षण अहवालात नोंदवलेल्या गंभीर टिपण्यांचा सारांश या वर सविस्तर चर्चा झ ाली.

मुद्या क्र. १. बोगस धान खरेदी - आधारभुत किंमत खरेदी योजनेत सदर सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षात धान खरेदी करताना अनिमीयत्ता व आर्थिक गैर व्यवहार झाल्याचे श्री. धोंगडे पाटील गोधानी, सनदी लेखापाल, नाशिक यांनी सांगितले सदर विषयावर श्री.दुधनाग, संचालक व श्री.भुसारा, संचालक यांनी जेथे अशा प्रकारची घटना घडल्याचे निदर्शनास आले आहे, तेथे काय करावे लागेल व या बाबत कोणती कार्यवाही अनुसरावी लागेल, याबाबत सहनिबंधक सहकारी संस्था, आदिवासी विकास विभाग नाशिक यांना विचारना करण्यात आली. यावर सहनिबंधक सहकारी संस्था, आदिवासी विकास विभाग नाशिक यांनी सांगितले की, सवैधानिक लेखापरीक्षकांना FIR दाखल करण्याचे अधिकार आहेत. तो त्यांनी संबधीत ठिकाणी FIR दाखल करावा.

यानंतर मा.अशोक मंगाम, संचालक यांनी असे निदर्शनास आणुन दिले की, त्यांनी स्वत: प्रादेशिक कार्यालय गडचिरोली व भंडारा अंतर्गत खरेदी केंद्रावर प्रत्यक्ष भेटी दिल्या असुन त्या ठिकाणी सुध्दा हंगाम २०२०-२०२१ व २०२१-२०२२ मध्ये अशा प्रकारची बोगस धान खरेदी झालेली आहे.

याबाबत महाव्यवस्थापक (विपणन) यांनी असे सांगितले की, ज्या ठिकाणी बोगस धान खरेदी झ ालेली आहे त्या ठिकाणी FIR दाखल करण्यात आले आहेत.

यावर मा.अध्यक्ष महोदय यांनी खालील प्रमाणे आदेश / निर्देश दिले, सन २०१९-२०२० मधील लेखापरीक्षण अहवालात लेखापरीक्षक यांनी नमुद केलेल्या बोगस धान खरेदी बाबत, संबधीत ठिकाणी नियमा नुसार FIR दाखल करावेत.

हंगाम २०२०-२०२१ व २०२१-२०२२ मधील बोगस धान खरेदी बाबत संचालक महोदय यांची समिती तयार करुन, सदर समितीने चौकशी करुन अहवाल सादर करावा.

मुद्या क्र.३. मुख्य कार्यालयाच्या मंजुरीशिवाय प्रादेशिक कार्यालय स्तरावर फर्निचर वस्तुचीं खरेदी करण्यात आली आहे. प्रादेशिक कार्यालय नाशिक व गडचिरोली येथे आर्थिक वर्षात मुख्य कार्यालयाची मंजुरीविना खरेदी करण्यात आली असल्याचे श्री. धोंगडे पाटील गोधानी, सनदि लेखापाल, नाशिक यांनी सांगितले, श्री.भुसारा यांना महाव्यवस्थापक (प्रशासन) यांना सखोल चौकशी करण्यात यावी व अगामी संचालक मंडळ सभेत सदर चौकशीचा अहवाल सादर करण्यात यावा असे निर्देश दिले.

मुद्या क्र.४ जी.एस.टी. कायद्याचे पालन न करणे बाबत सवीस्तर चर्चा झाली व लवकरात लवकर जी.एस.टी. रिर्टन सादर करण्यासाठी सनदी लेखापालाची नेमणुक करुन सन २०१७-२०१८ ते सन २०२२-२०२३ पर्यंत होणारी जी.एस.टी. रक्कम भरणा करण्यात यावी.

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन खालील प्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव क्र. ०३** :- सर्वानुमते ठराव मंजुर करण्यात येतो कि, सन २०१९-२०२० चे सवैधनिक लेखापरीक्षक धोंगडे पाटील गोधाणी ॲण्ड कंपनी, सनदी लेखापाल, नाशिक यांचे कडुन लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झालेला आहे.

यावर मा.अध्यक्ष महोदय यांनी खालील प्रमाणे आदेश / निर्देश दिले, सन २०१९-२०२० मधील लेखापरीक्षण अहवालात लेखापरीक्षक यांनी नमुद केलेल्या बोगस धान खरेदी बाबत, संबधीत ठिकाणी नियमा नुसार FIR दाखल करावे.

हंगाम २०२०-२०२१ व २०२१-२०२२ मधील बोगस धान खरेदी बाबत संचालक महोदय यांची समिती तयार करुन, सदर समितीने चौकशी करुन अहवाल सादर करावा.

महाव्यवस्थापक (प्रशासन) यांना सखोल चौकशी करण्यात यावी व अगामी संचालक मंडळ सभेत सदर चौकशीचा अहवाल सादर करण्यात यावा.

जी.एस.टी. रिर्टन सादर करण्यासाठी सनदी लेखापालाची नेमणुक करुन सन २०१७-२०१८ ते सन २०२२-२०२३ पर्यंत होणारी जी.एस.टी. रक्कम भरणा करण्यात यावी.

सादर अहवालातील अनियमितता व आक्षेप / हरकती बाबत प्रशासनाने नियमोचित कार्यवाही करावी, याबाबीस अधिन राहुन लेखापरीक्षण अहवाल स्विकृत करण्यात येत आहे.

त्याचा दोष दुरुस्ती अहवाल विहीत "ओ" नमुण्यात व विहीत कालावधीत पुर्ण करुन संचालक मंडळ व वार्षिक सर्वसाधारण सभेत मान्यतेस सादर करण्यात यावा. करीता सदर सभा मंजुरी देत आहे.

सुचक :- मा.श्री.सुनिल चंद्रकांत भुसारा.
अनुमोदक :- मा.श्री. भरतलाल थुकेलसिंग दुधनाग.
ठराव सर्वानुमते मंजूर.

**विषय क्रमांक ०४ : आधारभुत किंमत खरेदी योजने अंतर्गत खरेदी झालेल्या हंगाम 2020-21 व 2021-22 मधील हंगाम निहाय भरडाईविना शिल्लक असलेल्या धानाचा विक्री व शिल्लक साठयाचा आढावा.**

**<u>हंगाम २०२०-२०२१</u>**

आधारभुत किंमत खरेदी योजने अंतर्गत पणन हंगाम २०२०-२१ मध्ये झालेली खरेदी, भरडाई, व भरडाईविना शिल्लक मालाचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ. क्र | जिल्हा | एकूण खरेदी (क्विं.) | भरडाई झालेला धान (क्विं.) | भरडाईची टक्केवारी | भरडाईविना शिल्लक धान (क्विं.) | प्रत्यक्ष शिल्लक साठा (क्विं.) | आलेली घट | घटीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | गडचिरोली | १२२२९०९.६८ | ११४०३४०.९५ | ९३.२५ | ८२५६८.७३ | ६४६२१.४७ | १७९४७.२६ | १.४६ |
| २ | अहेरी | ७६३११४.०८ | ७२०१७४.२६ | ९४.३७ | ४२९३९.८२ | १२१५९.६८ | ३०७८०.१४ | ४.०३ |
| ३ | गोंदिया | १६५०३३२.७१ | १५५९०७४.७३ | ९४.४७ | ९१२५७.९८ | ५३८१४.१९ | ३७४४३.७९ | ४.८३ |
| ४ | नागपूर | ३०६८५.२० | २८३६८.२१ | ९२.४५ | २३१६.९९ | २०१०.१४ | ३०६.८५ | १.०० |
| ५ | चंद्रपूर | ३२५२९७.४४ | ३२१९४९.१८ | ९८.९७ | ३३४८.२६ | ०.०० | ३३४८.२६ | १.०३ |
| ६ | पालघर | ३००३६१.२३ | २९७१२२.५५ | ९८.९२ | ३२३८.६८ | ०.०० | ३२३८.६८ | १.०८ |
| ७ | ठाणे | ३५८५५४.७९ | ३५३११९.११ | ९८.४८ | ५४३५.६८ | ०.०० | ५४३५.६८ | १.५१ |
| ८ | रायगड | ९९००.४० | ९७७५.०० | ९८.७३ | १२५.४० | ०.०० | १२५.४० | १.२७ |
| ९ | नांदेड | २१२०.२० | २०८१.४८ | ९८.१७ | ३८.७२ | ०.०० | ३८.७२ | १.८३ |
| १० | नाशिक | ९५५३४.९९ | ९४४३८.९४ | ९८.८५ | १०९६.०५ | ०.०० | १०९६.०५ | १.१५ |
| ११ | पुणे | ४०६.३७ | ४०६.३७ | १००.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| १२ | अ.नगर | ९२४०.१९ | ९१५२.०३ | ९९.०५ | ८८.१६ | ०.०० | ८८.१६ | ०.०० |
| **एकूण** | | **४७६८४५७.२८** | **४५३६००२.८१** | **९५.१३** | **२३२४५४.४७** | **१३२६०५.४८** | **९९८४८.९९** | **२.०९** |

भरडाईविना शिल्लक दिसत असलेल्या वजन २,३२,४५४.४७ क्विं.धान शिल्लक दिसत असला तरी १% आर्दता घट वजन ९९,८४८.९९ क्वि. वजा जाता प्रत्यक्षात वजन १,३२,६०५.४८ क्विं. धान शिल्लक आहे. प्रादेशिक कार्यालय, गडचिरोली, भंडारा व उप प्रादेशिक कार्यालय, अहेरी येथील वजन १०४०६३.१८ क्विं. धान पावसात भिजून खराब झाला असून खराब झालेल्या धानाचा तपासणी करून पंचनामा करण्यात आलेला असून सदर धानासाठी ई-लिलावामध्ये दर प्राप्त झाले आहेत. सदर दरास मान्यता मिळणेसाठी स्वतंत्ररित्या विषय क्र. २ सादर करण्यात आलेला आहे.

दिनांक १९/०९/२०१९ च्या शासन निर्णयानुसार प्रा.का गडचिरोली, प्रा.का.भंडारा व उप प्रा.का.अहेरी येथील शिल्लक धानाचा ई-लिलाव करण्यात आला असून प्राप्त उच्चतम दरास मान्यता मिळण्यासाठी प्रस्ताव मा.अध्यक्ष सो यांच्या कडे अग्रेषित करण्यात आला आहे. तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | प्रादेशिक कार्यालय | विक्री केलेला धानसाठा (क्विं.) |
|---|---|---|
| १ | गडचिरोली | ९४५०.०१ |
| २ | अहेरी | १२१५९.६८ |
| ३ | भंडारा | ४२२८४.१३ |
| एकूण | | **६३८९३.८२** |

वजन १,३२,६०५.४८ क्विं.धानापैकी वजन ६३,८९३.८२ क्विं.धानाचा ई-लिलाव झाला असून उर्वरीत वजन ६८,७११.६६ क्विं. धानाच्या ई-विक्री बाबतची कार्यवाही प्रादेशिक कार्यालय स्तरावर सुरू आहे.

वरील प्रमाणे विषय मा. संचालक मंडळापुढे महाव्यवस्थापक (विपणन) यांनी सादर केला असता, त्यावर मा. संचालक महोदायांसोबत चर्चा झाली.

मा. सुनिल भुसारा सो.- तोटा येण्याची कारणे काय ?

महाव्यवस्थापक (विपणन) - महामंडळाकडे पर्याप्त गोदामे नसल्याने ८०% धानसाठा खुल्या जागेत साठवावा लागतो. तसेच नैसर्गिक आपत्तीमुळे (अतिवष्टीमुळे/मुसळधार पावसामुळे) हंगाम २०२०-२१ मधील धानसाठयात घटी आलेल्या आहेत. तसेच सदर हंगामात धान भरडाईचा दर अल्प असल्याने व परवडत नसल्याने माहे एप्रिल, २०२१ नंतर धान भरडाईला गती आलेली आहे.

मा. सुनिल भुसारा सो.- आपण दरवर्षी ताडपत्र्या खरेदी करुन आदिवासी सोसायटयांना उपलब्ध करुन देतो, तरी देखील तोटा येतो. याबाबत अभ्यास करणे गरजेचे आहे.

मा. अध्यक्ष सो. - जेव्हा पासुन ही योजना सुरु आहे तेव्हा पासुन दरवर्षी माल पावसात भिजल्याची माहीती मिळते. सदरचा खरेदी केलेला मालाची वेळीच उचल होत नसल्याने माल खराब होतो. त्यामुळे येणारा तोटा हा अन्न, नागरी पुरवठा विभागाने भरणेआवश्यक आहे. त्याबाबत त्यांना प्रस्ताव पाठवावा.

<u>हंगाम २०२१-२०२२</u>

आधारभुत किंमत खरेदी योजने अंतर्गत पणन हंगाम २०२१-२२ मध्ये एकुण झालेली खरेदी, भरडाई, व भरडाईविना शिल्लक मालाचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र | जिल्हा | एकूण खरेदी (क्विं.) | भरडाई झालेला धान (क्विं.) | भरडाईची टक्केवारी | भरडाईविना शिल्लक धान (क्विं.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | गडचिरोली | ११८८२७९.२४ | ११०७५६७.३४ | ९३.२१ | ८०७११.९० |
| २ | अहेरी | ७०७७७३.५० | ६२८७०७.०५ | ८८.८३ | ७९०६६.४५ |
| ३ | गोंदिया | १३८८३३४.४५ | १३०९९५६.०८ | ९४.३५ | ७८३७८.३७ |
| ४ | नागपूर | २१७२६.२० | २०२६६.५२ | ९३.२८ | १४५९.६८ |
| ५ | चंद्रपूर | २२६११४.४४ | २०८४०६.६६ | ९२.१७ | १७७०७.७८ |
| ६ | नांदेड | ५३२०.८० | ३१३५.२५ | ५८.९२ | २१८५.५५ |
| ७ | पालघर | ३८७५०१.७७ | ३८३६४३.८७ | ९९.०० | ३८५७.९० |
| ८ | ठाणे | ४५१२४२.३३ | ४०५१८३.२८ | ८९.७९ | ४६०५९.०५ |
| ९ | रायगड | १२१९२.६० | १२०७०.६० | ९९.०० | १२२.०० |
| १० | नाशिक | १२१५५९.४५ | ११०४७८.५० | ९०.८८ | ११०८०.९५ |
| ११ | नंदुरबार | ८४.०० | ८३.५८ | ९९.५० | ०.४२ |
| १२ | पुणे | ७३०.११ | ७२२.८७ | ९९.०१ | ७.२५ |
| १३ | अहमदनगर | १४९१३.३५ | १४७६४.५५ | ९९.०० | १४८.८० |
| | एकूण | ४५,२५,७७२.२४ | ४२,०४,९८६.१५ | ९२.९१ | ३,२०,७८६.०९ |

भरडाईविना शिल्लक दिसत असलेल्या वजन ३,२०,७८६.०९ क्विं. धानाच्या भरडाईचे काम सुरू असून धानभरडाई मुदत दिनांक ३०/०९/२०२२ रोजी पर्यंत आहे. तद्नंतर धान भरडाईस शासनाकडून मुदतवाढ न मिळाल्यास धान भरडाईबाबतचे शासन परिपत्रक दिनांक १४/१०/२०२१ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार शिल्लक धानाच्या विक्रीची कार्यवाही करण्यात येईल.

वरील विषयावर चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारीत करणेत आला.

**ठराव क्र.४** :- सर्वानुमते ठराव प्रारीत करण्यात येतो की, मा. अध्यक्ष सो. यांनी सुचविल्यानुसार आधारभुत किंमत खरेदी योजने अंतर्गत झालेला तोटया प्रतिपुर्ती करीता अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागास प्रस्ताव सादर करावा.

**सुचक** :- मा. सुनिल भुसारा, संचालक
**अनुमोदक** :- मा. भरतलाल दुधनाग, संचालक

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक ०५ : आधारभूत किंमत खरेदी योजने अंतर्गत हंगाम २०२०-२१ मध्ये खरेदी केलेला व भरडाई विना शिल्लक असलेल्या धानाचा ई-लिलावा मध्ये प्राप्त उच्चतमं दरास मान्यता देऊन विक्रीस मंजूरी मिळणेबाबत.**

**अ) प्रादेशिक कार्यालय, गडचिरोली.**

प्रा.का.गडचिरोली अंतर्गत हंगाम २०२०-२१ मधील आधारभूत किंमत खरेदी योजने अंतर्गत खरेदी केलेला परंतू भरडाई विना शिल्लक असलेला धान दिनाक ०६/०७/२०२२ रोजी NCDEX, Agribazar, Indi Trade व BSE Beam यांच्या प्लॅटफॉर्म वर खरेदीकेंद्र निहाय विक्रीस ठेवण्यात आले असून ई-लिलावात प्राप्त दरापैकी उच्चतम बोली नुसार खालीलप्रमाणे तोटा अपेक्षित आहे.

| विक्रीस ठेवलेला धानसाठा (क्विं.) | MSP दरानुसार होणारी रक्कम | उच्चतम बोली नुसार होणारी रक्कम | अपेक्षित तोटा |
|---|---|---|---|
| ९४५०.०१ | १७६५२६१८.६८ | ६६५८७७५.६१ | १०९९३८४३.०७ |

**ब) उप प्रादेशिक कार्यालय, अहेरी.**

उप प्रा.का.अहेरी अंतर्गत हंगाम २०२०-२१ मधील आधारभूत किंमत खरेदी योजने अंतर्गत खरेदी केलेला परंतू भरडाई विना शिल्लक असलेला धान दिनाक ६/७/२०२२ रोजी NCDEX, Agribazar, Indi Trade व BSE Beam यांच्या प्लॅटफॉर्म वर खरेदीकेंद्र निहाय विक्रीस ठेवण्यात आले असून ई-लिलावात प्राप्त दरापैकी उच्चतम बोली नुसार खालीलप्रमाणे तोटा अपेक्षित आहे.

| विक्रीस ठेवलेला धानसाठा (क्विं.) | MSP दरानुसार होणारी रक्कम | उच्चतम बोली नुसार होणारी रक्कम | अपेक्षित तोटा |
|---|---|---|---|
| १२,१५९.६८ | २,२७,१४,२८२.२४ | ८०,५९,०५५.८६ | १,४६,५५,२२६.३८ |

**क) प्रादेशिक कार्यालय, भंडारा.**

प्रा.का.भंडारा अंतर्गत हंगाम २०२०-२१ मधील आधारभूत किंमत खरेदी योजने अंतर्गत खरेदी केलेला परंतू भरडाई विना शिल्लक असलेला धान दिनाक २९/०४/२०२२ रोजी NCDEX, Agribazar, Indi Trade व BSE Beam यांच्या प्लॅटफॉर्म वर खरेदीकेंद्र निहाय विक्रीस ठेवण्यात आले असून ई-लिलावात प्राप्त दरापैकी उच्चतम बोली नुसार खालीलप्रमाणे तोटा अपेक्षित आहे.

| दिनांक | विक्रीस ठेवलेला धानसाठा (क्विं.) | MSP दरानुसार होणारी रक्कम | उच्चतम बोली नुसार होणारी रक्कम | अपेक्षित तोटा |
|---|---|---|---|---|
| २३/०६/२०२२<br>२४/०६/२०२२ | ४२,२८४.१३ | ७,८९,८६,७५४.८४ | ३,१९,४३,००९.०८ | ४,७०,४३,७४५.७६ |

प्रादेशिक कार्यालय गडचिरोली, भंडारा व उप प्रादेशिक कार्यालय,अहेरी यांचे कडील हंगाम २०२०-२१ मधील भरडाई विना शिल्लक असलेल्या धानाची ई-लिलावा द्वारे प्राप्त झालेल्या दरानुसार अपेक्षित तोटा खालील प्रमाणे.

| अ. क्र. | कार्यालयाचे नाव | दर प्राप्त झालेला धानसाठा वजन (क्विं.) | MSP दरानुसार होणारी रक्कम | उच्चतम बोली नुसार होणारी रक्कम | अपेक्षित तोटा |
|---|---|---|---|---|---|
| १ | गडचिरोली | ९,४५०.०१ | १,७६,५२,६१८.६८ | ६६,५८,७७५.६१ | १,०९,९३,८४३.०७ |
| २ | भंडारा | ४२,२८४.१३ | ७,८९,८६,७५४.८४ | ३,१९,४३,००९.०८ | ४,७०,४३,७४५.७६ |
| ३ | अहेरी | १२,१५९.६८ | २,२७,१४,२८२.२४ | ८०,५९,०५५.८६ | १,४६,५५,२२६.३८ |
| | एकूण | ६३,८९३.८२ | ११,९३,५३,६५५.७६ | ४,६६,६०,८४०.५५ | ७,२६,९२,८१५.२१ |

ई-लिलावातील अटी-शर्ती नुसार ई-लिलावाच्या तारखेपासून १० (दहा) दिवसाच्या आत विक्रीचा व्यवहार पूर्ण करणे आवश्यक आहे. प्रादेशिक कार्यालय, गडचिरोली, भंडारा, व उप प्रादेशिक कार्यालय, अहेरी मधील मागील हंगामातील भरडाई विना शिल्लक असलेल्या धानाचा ई-लिलावाव्दारे विक्री करण्यासाठी मा. अध्यक्ष, आदिवासी विकास महामंडळ तथा मा. मंत्री, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांच्या मान्यतेने प्राप्त उच्चतम दरास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार विक्री केलेल्या धानाची उचल करण्याची कार्यवाही सुरु आहे. परंतु विदर्भात अतिवृष्टीमुळे उचल करण्याची कार्यवाही संथ गतीने सुरु आहे.

करीता वरीलप्रमाणे केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता मिळणेस सविनय सादर.

**ठराव क्र.५** :- सर्वानुमते ठराव प्रारीत करण्यात येतो की, मा. अध्यक्ष सो. यांनी सुचविल्यानुसार आधारभुत किंमत खरेदी योजने अंतर्गत झालेला तोटया प्रतिपुर्ती करीता अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागास प्रस्ताव सादर करावा.

**सुचक** :- मा. सुनिल भुसारा, संचालक
**अनुमोदक** :- मा. भरतलाल दुधनाग, संचालक
**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक ०६ : एकाधिकार खरेदी योजने अंतर्गत हंगाम २०१४-१५ ते २०१८मधील शिल्लक असलेल्या कृषी उपज मालाची ई-लिलाव/जाहिर लिलावात प्राप्त उच्चतम दरास मान्यता देऊन विक्रीस तसेच निर्लेखनास मंजूरी मिळणेबाबत.**

दिनांक १९/१०/२०१३ रोजीच्या आदिवासी विकास विभागाकडील शासन अधिसुचनेनुसार एकाधिकार खरेदी योजना ८ जिल्हयातील २९ तालुक्यात राबविणेबाबत निर्देश आहेत. या योजनेद्वारे खरेदी केलेला कृषी उपज माल शासकिय आश्रमशाळा/वस्तीगृहांना पुरवठा केला जात होता.

मात्र दिनांक १५ जून २०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार शासकिय आश्रमशाळा/ वस्तीगृहांना माल पुरवठा करण्यासाठी काढण्यात आलेल्या ई-निविदेत महामंडळाने सुद्धा भाग घेण्याचे निर्देश असून ई-निविदेत पात्र ठरल्यास महामंडळास पुरवठा आदेश देणे बाबत नमुद आहे. परंतू महामंडळाचा मुख्य उद्देश नफा मिळवणे नसून आदिवासी उपयोजना क्षेत्रातील शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालास वाजवी दाम मिळवून देणे आहे व खुल्या बाजारातील स्पर्धेत महामंडळ टिकणार नसल्याने तसेच निविदा फी व इतर खर्चाचा महामंडळावर भार पडेल त्यामुळे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी महामंडळाने ई-निविदेत भाग घेतला नाही. पर्यायाने एकाधिकार खरेदी योजने अंतर्गत खरेदी केलेला कृषी उपज माल प्रादेशिक कार्यालयांच्या गोदामात पडून राहिला.

दरम्यानच्या काळात कोविड-१९ चा प्रसार झाला व टाळेबंदीमुळे सदर मालाची विल्हेवाट वेळेवर होऊ शकली नाही. करीता आदिवासी विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचे दिनांक ०७.०४.२०२० रोजीच्या पत्रान्वये आदिवासी जनतेची उपासमार होऊ नये याकरिता एकाधिकार खरेदी योजने अंतर्गत खरेदी केलेल्या कृषी उपज मालाचे वाटप आदिवासी कुटूंबांना करण्याचे निदेश प्राप्त झाल्याने चणा, तिळ, तांदुळ, गहु, खुरासणी, तुरदाळ तसेच धान व वरईची प्रक्रीया करुन प्राप्त तांदुळ व भगर या मालाचे वाटप करण्यात आले. परंतू प्रादेशिक कार्यालय जव्हार अंतर्गत निकृष्ट दर्जाचा मालाबाबत स्थानीक संघटनांकडुन तक्रार प्राप्त झाल्याने मा.मुख्यमंत्री महोदयांनी सदर वाटप बंद करून शिघ्र विल्हेवाट लावण्याबाबत निर्देश दिलेले होते.

सर्व प्रादेशिक कार्यालयांना दिनांक २८.०९.२०१८ रोजी संचालक मंडळाच्या सभेतील आयत्या वेळचा विषयाचा पारित ठराव नुसार शिल्लक असलेल्या मालाचा ई-लिलाव करून तोटयाच्या कारणमिमांसेसह संचालक मंडळाच्या समितीची मान्यता घेऊन मुख्यालयामार्फत शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याबाबत कळविण्यात आले. त्यानुसार प्रादेशिक कार्यालय यवतमाळ, प्रादेशिक कार्यालय नाशिक व प्रादेशिक कार्यालय नंदुरबार यांनी ई-लिलाव/जाहिर लिलावाद्वारे एकाधिकार खरेदी योजनेतील मालाच्या विक्री साठी प्रस्ताव सादर केले आहेत. त्यांचा तपशिल पुढील प्रमाणे.

**अ) प्रादेशिक कार्यालय, यवतमाळ (हरबरा)**

एकाधिकार खरेदी योजने अंतर्गत हंगाम २०१९-२० मध्ये खरेदी झालेला कृषी उपज माल कोरोना काळात लाभार्थ्यांना वाटप करण्यात आलेला आहे. परंतू शिल्लक राहिलेला हरबरा वजन ११.९० क्विंटल गोदामात पडून राहिल्याने निकृष्ट दर्जाचा झाला. त्यामूळे प्रयोगशाळेत तपासणी केली असता "खाण्यास योग्य नाही" असे प्रमाणपत्र प्राप्त झाले असल्याने मुख्य कार्यालयाच्या निर्देशानुसार दिनांक १५/०४/२०२२ रोजी जाहिर लिलाव करण्यात आला. त्यात अत्यल्प दर प्राप्त झाले असून जाहिर लिलावात प्राप्त दरापैकी उच्चतम बोली नुसार खालीलप्रमाणे तोटा अपेक्षित आहे.

| दिनांक | विक्रीस ठेवलेला हरबरा (क्वि.) | BEP दरानुसार होणारी रक्कम (रुपये) | उच्चतम बोली नुसार होणारी रक्कम (रुपये) | अपेक्षित तोटा |
|---|---|---|---|---|
| १५/०४/२०२२ | ११.९० | ८३,२६३.०० | ३५७०.०० | ८२,६९३.०० |

**ब) प्रादेशिक कार्यालय, नाशिक**

एकाधिकार खरेदी योजने अंतर्गत हंगाम २०१४-१५ ते २०१७-१८ मध्ये खरेदी झालेला कृषी उपज माल कोरोना काळात लाभार्थ्यांना वाटप करण्यात आलेला आहे. परंतू सदर हंगामातील शिल्लक राहिलेला धान, तुर, खुरासणी, वरई, कणी, सोयाबिन मिळुण एकुण कृषी उपज माल वजन १५९५.५९ क्विंटल गोदामात पडून राहिल्याने निकृष्ट दर्जाचा झाला. मुख्य कार्यालयाच्या निर्देशानुसार दिनांक ०३/०३/२०२२ रोजी महामंडळासोबत करारबद्ध एजंसी (NCDEX, Agribazar, Indi Trade व BSE Beam) यांच्या प्लॅटफार्म वर हंगामनिहाय ई-लिलाव करण्यात आला असून प्राप्त दरापैकी उच्चतम बोली नुसार खालीलप्रमाणे तोटा अपेक्षित आहे.

| हंगाम | मा.संचालक मंडळाने मान्यता दिलेले वजन(क्वि.) | BEP दरानुसार होणारी रक्कम (रुपये) | उच्चतम बोली नुसार होणारी रक्कम (रुपये) | अपेक्षित तोटा |
|---|---|---|---|---|
| २०१४-१५ | २९८.२६ | १३८५८९७.४६ | ३८६३८०.८२ | ९९९५१६.६४ |
| २०१५-१६ | ९.२५ | ४५६३९.५० | १०१७५.०० | ३५४६४.५० |
| २०१६-१७ | ९६२.९३ | ४१२९६०४.५४ | १२७३४७९.९९ | २८५६१२४.५५ |
| २०१७-१८ | १७७.२६ | ७५०५९५.५८ | २५१४६९.४७ | ४९९१२६.११ |
| एकूण | १४४७.७० | ६३११७३७.०८ | १९२१५०५.२८ | ४३९०२३१.८० |

## क) प्रादेशिक कार्यालय, यवतमाळ (तुर दाळ)

एकाधिकार खरेदी योजनेंतर्गत खरेदी केलेला कृषी उपज माल शासकिय आश्रमशाळा/वस्तीगृहांना पुरवठा केला जात होता. प्रकल्प कार्यालयांच्या मागणीनुसार प्रादेशिक कार्यालय, यवतमाळ द्वारे खरेदी केलेली तुरदाळ प्रादशिक कार्यालय चंद्रपूर, गडचिरोली, धारणी, नंदुरबार व उप प्रादेशिक कार्यालय, अहेरी यांना प्रकल्प कार्यालयामार्फत आश्रमशाळा व वस्तीगृहांना वितरीत करणेसाठी पुरवठा करण्यात आली होती. परंतू आश्रमशाळा/वस्तीगृहांना आवश्यक वस्तूंची खरेदी खुल्या बाजारातून सुरु केल्याने प्रादेशिक कार्यालय, यवतमाळ यांच्या कडून पुरवठा करण्यात आलेली तुरदाळ त्या-त्या कार्यालयाच्या गोदामात शिल्लक राहिली. तपशिल पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | कृषी उपज माल | प्रादेशिक कार्यालय | वजन (क्विं.) |
|---|---|---|---|
| १ | तुर दाळ | चंद्रपूर | २४.५० |
| २ | | गडचिरोली | १६१.९० |
| ३ | | धारणी | ४.४० |
| ४ | | नंदुरबार | १४२.५९ |
| ५ | | अहेरी | ४०.०० |
| **एकूण** | | | **३७३.३९** |

सदर तुरदाळ हंगाम २०१५-१६ मध्ये खरेदी करण्यात आली असल्याने सुमारे ७ वर्षाचा कालावधी झाला असून तूरदाळ निकृष्ट दर्जाची झाल्याचे प्रादेशिक कार्यालयांनी कळविल्याने सर्व प्रादेशिक कार्यालयांना शिल्लक तुरदाळ चे प्रयोगशाळेत तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले.

त्यानुसार प्रादेशिक कार्यालयांनी तपासणी केल्यानंतर सदर तुरदाळ "खाण्यास योग्य नाही" असे प्रमाणपत्र घेऊन तुरदाळ निर्लेखनाचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. प्रादेशिक कार्यालय, यवतमाळ यांच्याकडून सदर तुरदाळचे BEP दर मागविण्यात आले. व प्राप्त BEP दरानुसार खालीलप्रमाणे तोटा अपेक्षित आहे.

| हंगाम | प्रादेशिक कार्यालय | शिल्लक असलेली तुरदाळ (क्विं) | BEP दर प्रती क्विं. | शिल्लक तुरदाळची BEP नुसार होणारी किंमत (रुपये) | अपेक्षित तोटा (रुपये) |
|---|---|---|---|---|---|
| २०१५-१६ | चंद्रपूर | २४.५० | ३३५६८ | ८२२४१६.०० | ८२२४१६.०० |
| | गडचिरोली | १६१.९० | ३३६२० | ५४४३०७८.०० | ५४४३०७८.०० |
| | धारणी | ४.४० | ३३५६१ | १४७६६८.४० | १४७६६८.४० |
| | नंदुरबार | १४२.५९ | ३३६३४ | ४७९५८७२.०६ | ४७९५८७२.०६ |
| | अहेरी | ४०.०० | ३३६०५ | १३४४२००.०० | १३४४२००.०० |
| **एकूण** | | **३७३.३९** | | **१२५५३२३४.४६** | **१,२५,५३,२३४.४६** |

## ड) प्रादेशिक कार्यालय, नंदुरबार

एकाधिकार खरेदी योजने अंतर्गत हंगाम २०१६-१७ ते २०१९-२० मध्ये खरेदी झालेला कृषी उपज माल कोरोना काळात लाभार्थ्यांना वाटप करण्यात आलेला आहे. परंतू शिल्लक असलेला उडीद दाळ वजन ३९.५५ क्विं. व गहू (लोकवन) वजन १२०.७० क्विं. गोदामात पडून राहिल्याने निकृष्ट दर्जाचा झाला. मुख्य कार्यालयाच्या निर्देशानुसार दिनांक २६/११/२०२१ रोजी महामंडळासोबत करारबद्ध एजंसी (NCDEX,

Agribazar, Indi Trade व BSE Beam) यांच्या प्लॅटफार्म वर ई-लिलाव करण्यात आला. परंतू उडीद दाळ यास रुपये १००/- प्रती क्विंटल व गहु यास रुपये ४००/- प्रती क्विं. असे अत्यल्प दर प्राप्त झाल्याने मा. संचालक मंडळाच्या विक्री समितीने जाहिर लिलाव करण्याचे सुचविले त्यानुसार दिनांक २५/०३/२०२२ रोजी स्थानिक व्यापाऱ्यांकडून शिल्लक असलेल्या उडीद दाळ व गहू च्या विक्री करिता दर मागविले असता उडीद दाळ यास रुपये ७००/- प्रती क्विंटल व गहु यास रुपये १२००/- प्रती क्विं. असे दर प्राप्त झाले आहेत. BEP दरानुसार खालीलप्रमाणे ई-लिलावात व जाहिर लिलावात पुढील प्रमाणे तोटा अपेक्षित आहे.

**ई-लिलावात प्राप्त दरानुसार नफा / तोटा** तक्ता.

| हंगाम | कृषीउपज मालाचे नाव | मा.संचालक मंडळाने विक्रीस मान्यता दिलेले वजन (क्विं) | विक्री मालाची बीईपी नुसार होणारी किंमत (रूपये) | विक्री मालास ई-लिलावात प्राप्त दर प्रती क्विं. (रूपये) | विक्री मालाची ई- लिलावात मिळणारी किंमत (रुपये) | ई-लिलावा नुसार विक्री मालातुन होणारा तोटा (रूपये) |
|---|---|---|---|---|---|---|
| २०१६-१७ | उडीद दाळ | ३९.५५ | ३२५७३४.०० | १००.०० | ३९५५.०० | ३२१७७९.०० |
| २०१९-२० | गहु | १२०.७० | ३३६९९४.०० | ४००.०० | ४८२८०.०० | २८८७१४.०० |
| **एकूण** | | **१६०.२५** | **६६२७२८.००** | | **५२२३५.००** | **६१०४९३.००** |

**जाहिर लिलावात प्राप्त दरानुसार नफा / तोटा तक्ता.**

| हंगाम | कृषीउपज मालाचे नाव | मा.संचालक मंडळाने विक्रीस मान्यता दिलेले वजन (क्विं) | विक्री मालाची बीईपी नुसार होणारी किंमत (रूपये) | विक्री मालास ई-लिलावात प्राप्त दर प्रती क्विं. (रूपये) | विक्री मालाची ई- लिलावात मिळणारी किंमत (रुपये) | ई-लिलावा नुसार विक्री मालातुन होणारा तोटा (रूपये) |
|---|---|---|---|---|---|---|
| २०१६-१७ | उडीद दाळ | ३९.५५ | ३२५७३४.०० | ७००.०० | २७६८५.०० | २९८०४९.०० |
| २०१९-२० | गहु | १२०.७० | ३३६९९४.०० | १२००.०० | १४४८४०.०० | १९२१५४.०० |
| **एकूण** | | **१६०.२५** | **६६२७२८.००** | | **१७२५२५.००** | **४९०२०३.००** |

**ई) प्रादेशिक कार्यालय, धारणी**

एकाधिकार योजनेअंतर्गत खरेदी केलेल्या कृषीउपज मालास सुमारे सात वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला असून सदर मालास किड लागून खराब होण्याच्या स्थितीत असल्याने महामंडळाच्या प्रादेशिक कार्यालयांतर्गत हंगाम २०१४-१५ ते २०१८-१९ या कालावधीत एकाधिकार धान्य खरेदी योजनेमध्ये खरेदी करण्यात आलेल्या कृषी उपज मालापैकी शिल्लक कृषीउपज जो माल जास्त खराब झालेला आहे. त्याची प्रयोगशाळेत तपासणी केली असता "खाण्यायोग्य नसल्याचे प्रमाणपत्र" मिळाले आहे.

तपशिल खालील प्रमाणे.

**तपशिल**

| कृषीउपज मालाचे नाव | हंगाम | शिल्लक असलेला माल (क्विं.) | BEP दर (प्रती क्विं.) | शिल्लक मालाची BEP नुसार होणारी किंमत (रुपये) | अपेक्षित तोटा (रूपये) |
|---|---|---|---|---|---|
| चना | २०१८-१९ | ८.१६ | ६८४४.०० | ५५८४७.०४ | ५५,८४७.०४ |
| तीळ | २०१५-१६ | १.०० | १६८२२.०० | १६८२२.०० | १६,८२२.०० |
| एकूण | | **९.१६** | | **७२६६९.०४** | **७२,६६९.०४** |

आदिवासी विकास महामंडळ ही सेवाभावी संस्था असल्याने, व्यापारीदृष्ट्या नफा कमाविणे हा महामंडळाचा उद्देश नसुन, नक्षलग्रस्त अतिदुर्गम भागातील तळागाळातील आदिवासी शेतकऱ्यांना त्यांच्या कृषी उपज मालास योग्य मोबदला मिळवुन देणे व व्यापाऱ्यांकडुन त्यांची होणारी पिळवणुक थांबविणे हा आहे. प्रादेशिक कार्यालय, धारणी अंतर्गत हंगाम २०१५-१६ व २०१८-१९ मधील शिल्लक कृषीउपज मालाचा बारदाना विरहित बीईपी दराप्रमाणे रुपये ७२,६६९/-(अक्षरी रूपये बहात्तर हजार सहाशे एकोणसत्तर) तोटा अपेक्षित असून सदर शिल्लक माल "खाण्यायोग्य नाही"(Unsafe Food/Not of standard quality) प्रमाणपत्र असल्याने ई-लिलावात विक्री करता येणार नाही. त्यामुळे प्रादेशिक कार्यालय धारणी येथील एकाधिकार योजने अंतर्गत शिल्लक असलेल्या चना व तीळ चे निर्लेखन करण्यासाठी मान्यता मिळणे आवश्यक आहे.

ई-लिलाव व जाहिर लिलावातील अटी-शर्ती नुसार लिलावाच्या तारखेपासून १० (दहा) दिवसाच्या आत विक्रीचा व्यवहार पूर्ण करणे आवश्यक आहे. लिलाव होऊन जवळपास दोन महिन्याचा कालावधी होत आल्याने ई-लिलाव धारकास लवकरात लवकर त्याने दिलेल्या दराबाबत निर्णय देणे आवश्यक आहे. शिल्लक धानसाठयाच्या साठवणूक कालावधीत वाढ होत असल्याने व शिल्लक धान खुल्या जागेवर असल्याने ऊन, वारा, पाऊस व नैसर्गिक आपत्तीमुळे धानाचे नुकसान होऊन धानाची प्रत खराब होते. व अनुषंगीक खर्चात सुद्धा वाढ होते. तसेच यापुढील ई-लिलावात BEP पेक्षा जास्तचे दर प्राप्त होतीलच याची शाष्वती नाही. त्यामुळे विक्री करण्यासाठी महामंडळासोबत करारबद्ध एजंसी (NCDEX, Agribazar, Indi Trade व BSE Beam) यांचे प्लॅटफार्मवर ई-लिलावात प्राप्त झालेल्या दरापैकी उच्चतम दरास मान्यता मिळणे आवश्यक आहे.

तसेच ई-लिलावात काही कृषीउपज मालासाठी अत्यल्प दर प्राप्त झाल्याने तोटयात देखील मोठयाप्रमाणात वाढ होईल. त्यामुळे प्रादेशिक कार्यालय स्तरावर अशा मालाची जाहिर लिलावाद्वारे विक्री करण्यात आली आहे. त्यास देखील मान्यता मिळणे आवश्यक आहे.

**ठराव क्रमांक ६** :- बहुमताने ठराव पारित करण्यात येतो की, सदरचा विषय एकत्रित आकडेवारीसह तसेच संपुर्ण तोटा एकत्रित दर्शवुन पुढील मा. संचालक मंडळ सभेत सादर करावा.

**सुचक** :- मा. सुनील भुसारा, संचालक.
**अनुमोदक** :- मा. अशोक मंगाम, संचालक.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक ०७ : खरीप पणन हंगाम २०२२-२३ करीता एकाधिकार खरेदी योजना / आधारभुत खरेदी योजना व गौणवनोउपज खरेदी योजना राबाविणेसाठी आवश्यकतेनुसार खरेदी केंद्र उघडयास मान्यता मिळणे बाबत.**

खरीप पणन हंगाम २०२२-२३ दिनांक ०१/१०/२०२२ पासून सुरु होत असल्याने एकाधिकार खरेदी योजना, गौणवनोपज ऐच्छीक हिरडा खरेदी सुरु करणेसाठी आदिवासी उपयोजना क्षेत्रात महामंडळामार्फत खरेदी केंद्र सुरु करणे आवश्यक आहे. तसेच आधारभुत किंमत खरेदी योजना राबविण्यासाठी आदिवासी उपयोजना क्षेत्रात महामंडळाची अभिकर्ता म्हणून शासनाकडून दरवर्षी नियुक्ती केली जाते. हंगाम २०२२-२३ मधील आधाररभुत योजनेत अन्न, नागरी पुरवठा विभागाकडून शासन निर्णय निर्गमित झालेनंतर खरेदी सुरु करण्याच्या अनुषंगाने खरेदी केंद्र निश्चित करावे लागणार आहेत.

महामंडळाच्या उपअभिकर्ता असलेल्या आदिवासी विविध कार्यकारी संस्था मार्फत वरील योजनांतर्गत खरेदी करण्यासाठी संबधित जिल्हाधिकारी अथवा आदिवासी उपयोजना क्षेत्रात कार्यरत असलेले भारतीय प्रशासन सेवेतील प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी यांचेकडून खरेदी केंद्र मंजूर करुन घेतले जातात, मात्र ज्या ठिकाणी बहुतांशी संस्था हया आर्थिकदृष्टीया दुर्बल व अन्य कारणाने खरेदी योजना राबवू

शकत नाही. अशा ठिकाणच्या शेतकऱ्यांचा माल खरेदी करणेस अडचणी निर्माण होऊ नयेत, तसेच खरेदी बाबत तक्रारी उद्भवू नयेत, यासाठी प्रतिवर्षी महामंडळामार्फत स्वतःची खरेदी केंद्र उघडावी लागतात अशा ठिकाणच्या कार्यक्षेत्रामध्ये महामंडळामार्फत स्वतःचे केंद्र सुरु करुन परिसरातील शेतकऱ्यांचा माल अशा खरेदी केंद्रावर खरेदी करण्यात येतो.

गत वर्षी हंगाम २०२१-२२ आधारभुत किंमत खरेदी योजने अंतर्गत संपुर्ण आदिवासी उपयोजना क्षेत्रात १२ जिल्हयातील केंद्र मंजूर करण्यात आले, त्यापैकी २०४ आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थाची केंद्र असून महामंडळाची स्वतःची ५५ केंद्र मंजूर करण्यात आले होते. यावर्षी २०२२-२३ मध्ये खरेदी केंद्र गरज व आवश्यकतेनुसार संबधित जिल्हाधिकारी यांचे मार्फत योजना निहाय मंजूरी घ्यावी लागणार आहे. तसेच ज्या ज्या ठिकाणी आदिवासी विविध कार्यकारी सहाकारी संस्था खरेदी योजना राबविण्यास असमर्थता दर्शवित असल्यास अशा ठिकाणी महामंडळाचे खरेदी केंद्र सुरु करणेत येतील.

शेतकऱ्यांकडील माल खरेदी करण्यास अडचणी येऊ नये म्हणून एकाधिकार खरेदी, गौणवनोपज, ऐच्छीक हिरडा व इतर वनउपज माल खरेदी आणि आधारभुत किंमत खरेदी योजने अंतर्गत धान/भरडधान्य (ज्वारी, मका, बाजरी, रागी) खरेदी करण्यासाठी खरेदी केंद्र सुरु करण्यास मा. संचालक मंडळाची मंजूरी आवश्यक आहे.

मात्र एकात्मिक खरेदी अंतर्गत केलेली खरेदी नंतर विक्रीसाठी व्यवस्था नसल्याने व या कार्यालयास सततचा तोटा येत असल्या कारणाने ही योजना कशा प्रकारे राबवायची हया मुद्दयाचे निरसण होणे आवश्यक आहे.

वरील विषयाबाबत खालीलप्रमाणे चर्चा झाली.

मा. सुनील भुसारा- मा. अध्यक्ष महोदय, आपले निदर्शनास आणुन देतो की, आधारभुत किंमत खरेदी योजनेअंतर्गत खरेदी केंद्राचे प्रस्ताव संबंधीत जिल्हयाचे पालक मंत्री देतात. परंतु पालकमंत्री यांचे दैनंदीन कामकाजाच्या व्यस्ततेमुळे खरेदी केंद्राचे प्रस्ताव विलंबाने मंजुर होतात. यामुळे जनतेच्या रोषाला सामोरे जावे लागते. करीता स्थानीक आमदार किंवा खासदार यांना अधिकार प्रदान करणेबाबत शासनास सुचित करावे.

मा. अध्यक्ष सो.- लोकांच्या मागणीप्रमाणे खरेदी केंद्राचे प्रस्ताव मंजुरी सादर करावेत. तसेच आधारभुत किंमत खरेदी योजनेत मोठया प्रमाणात आर्थिक तोटा येतो. त्यामुळे सदर योजनेकरीता खरेदी केंद्र मंजुरीचे प्रस्ताव सादर करु नयेत. एकाधिकार योजना व गौणवनोपज योजनेकरीता खरेदी केंद्र सुरु करण्यात यावेत.

वरील प्रमाणे चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करणेत आला.

**ठराव क्रमांक ७** :- बहुमताने ठराव पारित करणेत येतो. आधारभुत किंमत खरेदी योजनेअंतर्गत खरेदी केंद्र मंजुरीचे प्रस्ताव पाठवु नयेत. एकाधिकार खरेदी व गौणवनोपज खरेदीचे प्रस्ताव सादर करावेत.

**सुचक** :- मा. धनराज महाले, संचालक.
**अनुमोदक** :- मा. अशोक मंगाम, संचालक.

**ठाराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक ८ : हंगाम २०२०-२१ मधिल ई-निविदेव्दारे खरेदी केलेल्या ताडपत्री खरेदीस कार्योत्तर मंजुरीबाबत.**

आधारभुत किंमत खरेदी योजनेअंतर्गत हंगाम २०२०-२१ मध्ये खरीप व रब्बी धान वजन क्विंटल ४९,१८,४५३.१८ व भरडधान्य वजन क्विंटल १,८१,३११.२८ इतकी खरेदी झालेली आहे. सदर हंगामात विक्रमी खरेदी झालेली आहे. धान साठवणुकीकरीता महामंडळाकडे पुरेसे गोदामे उपलब्ध नसल्याने ८०% धान खुल्याजागेत साठवणुक करण्यात येतो. सदर धानाच्या सुरक्षितेसाठी GeM पोर्टलवर ताडपत्री खरेदीस लागणारा वेळ लक्षात घेता हंगामी/अवकाळी पाऊसापासुन धानाचे नुकसान टाळणे करीता तातडीची बाब म्हणुन प्रादेशिक कार्यालय, नाशिक, जव्हार, यवतमाळ, भंडारा, चंद्रपुर, गडचिरोली व उप प्रादेशिक कार्यालय, अहेरी यांना प्रत्येकी रक्कम रु.५०,०००/- च्या मर्यादेत ताडपत्री खरेदी करणेस मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार प्रादेशिक कार्यालयांनी ताडपत्री (प्लॅस्टिक) ची खरेदी केली आहे.

| अ.नं. | प्रादेशिक कार्यालय | GSM | ताडपत्री साईज | खरेदी ताडपत्री संख्या | एक ताडपत्रीची किंमत GST सह | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | भंडारा | २५० | ३०X३० | १० | ४८८५.२० | ४८८५२.०० |
| २ | चंद्रपुर | २५० | ३०X३० | १० | ४८८५.२० | ४८८५२.०० |
| ३ | गडचिरोली | २५० | ३०X३० | १० | ४८८५.२० | ४८८५२.०० |
| ४ | उप प्रा.का.अहेरी | २५० | ३०X३० | १० | ४८८५.२० | ४८८५२.०० |
| **एकुणांत :** | | | | **४०** | | **१९५४०८.००** |

तसेच प्रादेशिक कार्यालयांच्या मागणीनुसार GeM पोर्टलवर ई-निविदा प्रक्रीया राबवुन ताडपत्री पुरवठा करणेकरीता पुरवठा धारकांस आदेश देण्यात येवुन खालील प्रमाणे ताडपत्रीचा पुरवठा करण्यात आलेला आहे.

| अ.नं. | प्रादेशिक कार्यालय | GSM | ताडपत्री साईज | ताडपत्री खरेदी संख्या | एकुण Sqr. Mtr. | दर प्रति Sqr.Mtr. रुपये GST सह | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नाशिक | ४०० | ३०X३० | ५० | ४१८२.०० | ६२.०० | २,५९,२८४.०० |
| **एकुण नाशिक :** | | | | **५०** | **४१८२.००** | | **२,५९,२८४.००** |
| २ | जव्हार | ४०० | ३०X३० | ५० | ४१८२.०० | ६२.०० | २,५९,२८४.०० |
| **एकुण जव्हार :** | | | | **५०** | **४१८२.००** | | **२,५९,२८४.००** |
| ३ | चंद्रपुर | ४०० | ४०X४० | १५० | २२२९६.०० | ६२.०० | १३,८२,३५२.०० |
| **एकुण चंद्रपुर :** | | | | **१५०** | **२२२९६.००** | | **१३,८२,३५२.००** |
| ४ | भंडारा | ४०० | ३०X३० | ४५ | ३७६३.०० | ६२.०० | २,३३,३०६.०० |
| | | ४०० | ४०X४० | ६०० | ८९२२०.०० | ६२.०० | ५५,३१,६४०.०० |
| **एकुण भंडारा :** | | | | **६४५** | **९२९८३.००** | | **५७,६४,९४६.००** |
| ५ | गडचिरोली | ४०० | ३०X३० | १ | ८४.०० | ६२.०० | ५,२०८.०० |
| | | ४०० | ४०X४० | ४६६ | ६९२६७.०० | ६२.०० | ४२,९४,५५४.०० |
| **एकुण गडचिरोली :** | | | | **४६७** | **६९३५१.००** | | **४२,९९,७६२.००** |
| ६ | उप.प्रा.का.अहेरी | ४०० | ४०X४० | २९९ | ४४४६१.०० | ६२.०० | २७,५६,५८२.०० |
| | | ४०० | २०X२० | १ | ३७.०० | ६२.०० | २,२९४.०० |
| **एकुण अहेरी :** | | | | **३००** | **४४४९८.००** | | **२७,५८,८७६.००** |
| **एकुणांत :** | | | | १६६२ | २३७४९२.०० | | १,४७,२४,५०४.०० |

वरील प्रमाणे हंगाम २०२०-२१ मध्ये प्रादेशिक कार्यालयस्तरावर खरेदी केलेल्या ४० नग ताडपत्र्यांची रक्कम रु.१,९५,४०८/- व मुख्य कार्यालयांने GeM पोर्टलवर ई-निविदा राबवुन खरेदी करुन प्रादेशिक कार्यालयांना पुरवठा केलेल्या ताडपत्री नग १६६२ एकुण स्क्वेअर मिटर २,३७,४९२ प्रति स्क्वेअर मिटर रु.६२/-

प्रमाणे रक्कम रु.१,४७,२४,५०४/- असे एकुण ताडपत्री प्लॅस्टिक खरेदी नग १७०२ चे खर्च रक्कम रुपये १.४९,१९,९१२/- (अक्षरी रक्कम रुपये एक कोटी एकोणपन्नास लाख एकोणावीस हजार नऊशे बारा मात्र) इतकी किंमत होते. सदर खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत दिनांक १७.०९.२०२१ रोजी झालेल्या मा. सचांलक सभेत विषय क्र.३२ ठेवण्यात आलेला होता. मात्र मागील ३ वर्षातील शिल्लक ताडपत्र्यांचा आढावा घेवुन सदर विषय पुढील संचालक मंडळ सभेत सादर करणेबाबत सर्वानुमते क्र.३२ नुसार ठराव पारीत करण्यात आला आहे.

त्यानुसार हंगाम २०१८-१९, २०१९,२० व २०२०-२१ मध्ये शिल्लक ताडपत्र्या खालील प्रमाणे.

| अ.नं. | हंगाम | शिल्लक ताडपत्री | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | नविन | वापरण्यास योग्य | फाटक्या/ निरुपयोगी | एकुण |
| १ | २०१८-१९ | १५६ | ६९६ | १०८२ | १९३४ |
| २ | २०१९-२० | ९५ | ७३८ | ८७९ | १७१२ |
| ३ | २०२०-२१ | ९९ | १७२५ | १२५३ | ३०७७ |
| **एकुणांत :** | | **३५०** | **३१५९** | **३२१४** | **६७२३** |

वरील ताडपत्री पैकी हंगाम २०२०-२१ मध्ये नविन ९९, वापरण्यास योग्य १७२५ व फाटक्या/निरुपयोगी १२५३ आहेत. शिल्लक असलेल्या नविन ९९ व १७२५ वापरण्यास योग्य अशा एकुण १८२४ ताडपत्रीचा उपयोग खरीप पणन हंगाम २०२१-२२ मधिल खरेदी केलेल्या धानापैकी खुल्याजागेत साठवणुक केलेल्या धानाचे सुरक्षितेकरीता वापर करण्यात येत आहे. सोबत हंगाम २०१८-१९, २०१९,२० व २०२०-२१ चे ताडपत्रीचा तपशिल सादर करण्यात येत आहे.

वरीलप्रमाणे १७०२ नग ताडपत्री प्लॅस्टिक खरेदी करीता आलेला खर्च रक्कम रुपये १,४९,१९,९१२/- (अक्षरी रक्कम रुपये एक कोटी एकोणपन्नास लाख एकोणावीस हजार नऊशे बारा मात्र) कार्योत्तर मंजुरी मिळणेस्तव महाव्यवस्थापक (विपणन) यांनी विषय सादर केला असता खालीलप्रमाणे चर्चा झाली.

मा. सुनिल भुसारा - सदच्या ताडपत्र्या खरेदी केंद्रावर पोहोच झाल्यात काय ? याबाबत माहीती द्यावी. ताडपत्री खरेदीबाबतच्या माहीतीसह सदर विषय पुढील सभेत घ्यावा. असे सुचित केले. त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव पारित करणेत आला.

**ठराव क्रमांक ०८** :- सर्वानुमते ठराव पारित करणेत येतो की, मागील तीन वर्षात खरेदी केलेल्या ताडपत्र्याचा अहवाल रकमेसह तसेच संस्था निहाय पोहोच केल्याच्या आकडेवारीसह पुढील सभेत सादर करावा. तद्नंतर मंजुरीबाबत निर्णय घ्यावा.

**सुचक** :- मा. सुनिल भुसारा, संचालक

**अनुमोदक** :- मा. धनराज महाले, संचालक.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक ०९ : हंगाम २०२१-२२ करीता आवश्यकतेनुसार ताडपत्री खरेदी करीता राबविलेल्या ई-निविदेस कार्योत्तर मान्यता मिळणे बाबत.**

हंगाम २०२१-२२ मध्ये आधारभुत किंमत खरेदी योजने अंतर्गत खरेदी होणारे धान साठवणुकीकरीता प्रादेशिक कार्यालय, भंडारा, गडचिरोली, चंद्रपुर या जिल्हयामध्ये गोदामे उपलब्ध नसल्याने खरेदी होणारे धान खुल्याजागेत साठवणुक करण्यात येते. धानाच्या सुरक्षितेकरीता ताडपत्री खरेदीकरीता मा. संचालक सभेत विषय क्र.३३ मंजुर केला होता. त्यानुसार मुख्य कार्यालयांमार्फत दिनांक २८.०२.२०२२ रोजी माहीती व जनसंपर्क अधिकारी, माहीती व जनसंपर्क, मुंबई यांना ताडपत्री खरेदीची जाहीरात प्रसिध्द करणेबाबत टेंडर नोटीस देण्यात आली होती. त्यानुसार दिनांक ०४.०३.२०२२ रोजी लोकमत दैनिक राज्यस्तरीय वृत्तपत्रात व www.mahatender.gov.in ई-निविदा क्र.२०२२_MSTDC_ ७७४७०६_१ प्रसिध्द करण्यात आली होती.

सदर ई-निविदेत ४ निविदाकारांनी भाग घेतला होता. त्यापैकी फक्त ३ निविदाकार तांत्रीक बाबीत पात्र झालेत. ई-निविदा अटी-शर्तीनुसार पात्र झालेल्या निविदाधारकांनी सादर केलेले ३X३ मिटरचे ताडपत्री सॅम्पल स्पेशिफिकेशन तपासणी करीता दिनांक ०५.०४.२०२२ रोजी सिपेट सेंटर फॉर स्किलींग ॲण्ड टेकनिकल सपोर्ट (CSTS) एम.आय.डी.सी.चिखलठाणा, औरंगाबाद यांचेकडे पाठविण्यात आले. त्यांच्याकडुन दिनांक १७.०६.२०२२ रोजी ताडपत्री सॅम्पल तपासणीचा अहवाल प्राप्त झाला असुन त्यात खालील प्रमाणे निविदाधाराकांचे सॅम्पल पात्र/अपात्र झाले. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, यांच्याकडील दिनांक ०१ डिंसेबर,२०१६ च्या शासन निर्णयातील मुद्या क्र.क), एकही नाही अथवा एकच निविदा तांत्रिकदृष्टया पात्र ठरल्यास पुर्ननिविदा काढण्यात यावी. असे नुमद आहे. करीता सदर निविदा रद्द करण्यात येवुन दिनांक २३.०६.२०२२ रोजी अल्पमुदतीची टेंडर नोटीस प्रसिध्द करणेकरीता जाहीरात व्यवस्थापक, लोकमत यांना देण्यात आली.

www.mahatender.gov.in वर १४३३ नग ताडपत्र्या खरेदीकरीता ई-निविदा क्र.२०२२_ MSTDC_८१११७६_१ दि.२३.०६.२०२२ ते ०१.०७.२०२२ पर्यंतचे ऑनलाईन टेंडर टाकण्यात आले असता ३ निविदाकारांनी भाग घेतला आहे. परंतु त्यापैकी फक्त एकाच निविदाकाराने ई-निविदा अटी-शर्तीनुसार दस्तऐवजांची पुर्तता केली होती. त्यामुळे पावसाळा सुरु असल्याने खुल्याजागेत साठविलेल्या धानाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तातळाची बाब असल्याने ई-निविदा अटी-शर्ती मधील वर्ष २०२१-२२ चे उलाढालीचे प्रमाणपत्र व २०२१-२२ मध्ये ताडपत्री पुरवठा केल्याचे प्रमाणपत्र सादर करण्याची अट शिथिल करुन उर्वरीत दोन्ही निविदाकारांना ई-निविदाकरांना पात्र करण्यात आले. त्यानुसार दिनांक ०८/०७/२०२२ रोजी www.mahatender.gov.in या संकेत स्थळावर निविदाकारांनी ऑनलाईन सादर केलेले दरांचे लिफाफे उघडण्यात आले असता मे. सनपॉली तार्प ओवरसिज प्रा.लि. कापशी (भुज) नागपुर यांचे दर न्युनतम प्रति स्क्वे. मिटर रु.७१.८५ असल्याने ते L१ ठरले. त्यामुळे ताढपत्री पुरवठा करणेबाबत दिनांक १९/०७/२०२२ रोजी आदेश देण्यात आला आहे. याबाबत महाव्यवस्थापक (विपणन) यांनी सभेपुढे मांडले असता खालीलप्रमाणे चर्चा झाली.

मा. दुधनाग (संचालक) - सदर निविदा राबविण्यास संचालक मंडळाची मान्यता घेतली होती काय ?

मा. सनिल भुसारा (संचालक) - कार्यालय निहाय प्रत्यक्षात किती खर्च येणार आहे याचा अहवालसह पुढील सभेत विषय ठेवावा. त्यानुसार खालीलप्रमाणे बहुमताने ठराव पारित करणेत आला.

**ठराव क्रमांक ९** :- बहुमताने ठराव पारित करण्यात येतो की, पुढील सभेत कार्यालय निहाय प्रत्यक्षात होणाऱ्या खर्चाचा अहवालासह विषय ठेवण्यात यावा.

**सुचक** :- मा. भरतलाल दुधनाग, संचालक.

**अनुमोदक** :- मा. धनराज महाले, संचालक.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रमांक १० : पाच दिवसांपेक्षा जास्त दिवस प्रलंबीत असलेल्या हुंड्यांच्या रकमेवरील व्याज प्रकरणबाबत.**

उपरोक्त विषयान्वये सादर करणेत येते की, आधारभुत व एकाधिकार खरेदी योजनेंतर्गत करण्यात येणाऱ्या खरेदीच्या हुंड्या अभिकर्ता संस्थांमार्फत जिल्हा बँकांकडे वटवीणेसाठी सादर केल्या जातात. परंतु काही कारणास्तव सदर हुंड्या जिल्हा बँकेकडे ५ दिवसांपेक्षा जास्त प्रलंबित राहील्यास सदर प्रलंबित हुंड्यांच्या व्याजाच्या रकमेची मागणी जिल्हा बँक या कार्यालयाकडे करते.

त्याअनुषंगाने दि ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,ठाणेयांनी पत्र क्र.हिशेब/विभाग/ ६४/९९१४ दि.११/०१/२०२२ अन्वये प्रादेशिक कार्यालय जव्हार यांचेकडील प्रलंबित हुंडी व्याजाची रक्कम रू.५,४६,४६७/-मात्र, दिनांक गडचिरोली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., गडचिरोली यांनी पत्र क्र.लेखा/५ दिवस हुं.व्या.प्रकरणे/६१२७/२०२१-२२ दिनांक १८/११/२०२१ अन्वये प्रादेशिक कार्यालय गडचिरोली यांचेकडील प्रलंबित हुंडी व्याजाची रक्कम रू. ४७,४२,२२५/-मात्र व दि गोंदिया जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., गोंदिया यांनी पत्र क्र.कर्ज बिनाशेती/एका.हुंडी व्याज/२८०२/२०२१-२२/गोंदिया/दिनांक १७/१२/२०२१ अन्वये प्रादेशिक कार्यालय, भंडारा यांचेकडील प्रलंबित हुंडी व्याजाची रक्कम रू.**२,१५,२५,५५५**/-मात्र मंजुर होऊन त्यांचे खात्यास वर्ग करणेची या कार्यालयाकडे विनंती केली आहे.

उपरोक्त प्रलंबित हुंडी व्याजाच्या रक्कमेबाबत या कार्यालयाकडुन प्रादेशिक कार्यालय जव्हार, गडचिरोली व भंडार यांचेकडुन पत्राद्वारे खुलासा मागवीण्यात आला असता प्रलंबित हुंडी व्याज प्रकरणात त्यांचा कोणताही दोष नसल्याचे व प्रलंबित हुंडी व्याजाच्या रकमेस संबंधीत बँक जबाबदार असल्याचे उपरोक्त प्रादेशिक कार्यालयांनी खुलाशाद्वारे स्पष्ट केले आहे.

जिल्हामध्यवर्ती सहकारी बँक लि., ठाणे/गडचिरोली व गोंदिया यांनी या कार्यालयाकडे मागवीलेल्या ५ दिवसांपेक्षा जास्त काळ प्रलंबित राहीलेल्या हुंड्यांवरील व्याजाच्या रक्कमेचा तपशिल खालील प्रमाणे -

| अ.क्र. | जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे नाव | संबंधीत प्रादेशिककार्यालय | हंगाम | प्रलंबित हुंडी व्याजाची रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | ठाणे | जव्हार | २०१६-१७ | ५,४६,४६७/- |
| २. | गडचिरोली | गडचिरोली | २०१५-१६ व २०१६-१७ | ४७,४२,२२५/- |
| ३. | गोंदिया | भंडारा | २०११-१२ते २०१६-१७ | १,६२,३६,८६३/- |
| **एकुण -** | | | - | **२,१५,२५,५५५/-** |

वरील विषयाबाबत खालीलप्रमाणे चर्चा झाली

मा. सुनिल भुसारा :- प्रथम अभ्यास करावा व पुढील सभेत ठेवावा.

त्यानुसार खालीलप्रमाणे बहुमताने ठराव पारित करणेत आला.

**ठराव क्रमांक १०** :- बहुमताने ठराव पारित करणेत येतो, सदर विषयावर महाव्यवस्थापक (विपणन) व महाव्यवस्थापक (वित्त) यांनी MSC बँक यांचेसोबत सदर विषयावर चर्चा करुन योजना निहाय प्रलंबित/खडया हुंडी व्याजाच्या रकमेबाबत अहवाल पुढील सभेत विषय ठेवण्यात यावा.

**सुचक** :- मा. सुनिल भुसारा, संचालक.

**अनुमोदक** :- भरतलाल दुधनाग, संचालक.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक ११ : हंगाम २००९-१० ते २०१४-१५ मधील संस्थास्तरावर व गोदामस्तरावर आलेल्या अवाजवी घट- तुटीचा शासनास सादर केलेल्या प्रस्तावावर चर्चा करणेबाबत.**

आधारभुत किंमत खरेदी योजने अंतर्गत महामंडळामार्फत खरेदी करण्यात येणाऱ्या धानाबाबत हंगाम २००९-१० ते २०१२-१३ या कालावधीत अवाजवी घट-तुटबाबत मा.लोकलेखा समिती पुढे साक्ष सुरु असुन, याबाबत मिलर्सकडे असणाऱ्या रुपये ६३ कोटी प्रलंबित CMR वसुली बाबत मिलर्सविरुध्द ५१ FIR दाखल करणे, ४६ RRC प्रस्ताव दाखल करणे इत्यादी कार्यवाही झालेली आहे. तसेच हंगाम २००९-१० ते २०१५-१६ कालावधीत खरेदी धानाच्या अवाजवी घट-तुट बाबत महामंडळाने कार्यवाही सुरु केली असुन याबाबत वसुली होण्यासाठी महामंडळामार्फत वाजवी घट-तुट निर्लेखित होणेकरीता दिनांक २४/८/२०१८ व दिनांक ९/१०/२०१८ रोजीचे पत्रांन्वये प्रस्ताव सादर केले आहेत. परंतु सदरच्या प्रस्तावाबाबत अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडुन निर्णय दिलेला नाही.

वेळोवेळी झालेल्या मा.लोकलेखा समितीच्या घट-तुट वसुली बाबत विचारणा करण्यात येते. प्रादेशिक कार्यालयांकडुन प्राप्त माहिती अन्वये महामंडळामार्फत अवाजवी घट-तुट बाबत जबाबदार महामंडळाचे ९४ कर्मचारी व १६३ आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था यांच्यावर कार्यवाहीसाठी व त्यांचेवरील रकमेच्या वसुलीसाठी संबंधीतांवर नोटीस बजावने, खुलासे प्राप्त होणे, चौकशी अधिकारी नेमुन रितसर चौकशीची प्रक्रीया पुर्ण करणे, संस्थानिहाय व कर्मचारीनिहाय वसुली आदेश निर्गमित करुन त्याची बजावणी करणे, वसुली करणे या प्रकारे वसुलीबाबत महामंडळाने शासनास व मा.लोकलेखा समितीला अवगत केलेले आहे.

परंतु महामंडळाचे कर्मचाऱ्यांवर व महामंडळाचे उपअभिकर्ता संस्थांवर दाखवलेली वसुली ही योग्य नसुन शासनाचे वेळीच निर्णय न झाल्याने (वाहतुक दर व अपग्रेडेशन चार्जबाबत) धानाची भरडाई विहीत मुदतीत झाली नाही. म्हणुन सदरच्या घटी आलेल्या आहेत.

**शासनाचे वेळीच निर्णय न झाल्याने धानाची भरडाई हंगाम निहाय पुर्ण झाली नाही. त्यामुळे महामंडळाचे उपअभिकर्ता आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था तसेच महामंडळाचे गोदामात मोठया प्रमाणात घटी आलेल्या आहेत. त्या संस्थेच्या/महामंडळाच्या आलेल्या घटीबाबत कारणमिमांसा खालीलप्रमाणे आहे.**

१. महामंडळ शासन निर्णयानुसार धान खरेदीचे काम आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये करते. महांडळाचे क्षेत्राबद्दल वर उल्लेख करण्यात आला आहे. महामंडळाची स्वतः ची गोदामे नसल्याने धान खरेदीपैकी ८०% धान उघडयावर साठविण्यात आला होता. धान हे पिक प्रक्रीया अभावी पडुन राहील्यास तो नैसर्गिकरित्या त्यामध्ये घट येऊन त्याची प्रत सुध्दा खालावते.

२. हंगाम २००९-१० मध्ये संस्थेमार्फत खरेदी झालेले धान ९ महीणे उघडयावर पडुन होते. सदर धान येणाऱ्या पावसाळातील पाण्याने व वादळी वाऱ्यामुळे नुकसान होऊ नये याकरीता माहे जुन, २०१० मध्ये महामंडळाने स्वतःकडील निधीचा उपयोग करुन उघडयावर पडुन असलेल्या एकुण ५.९० लक्ष क्विं. धानाची वाहतुक करुन तो धान भाडेतत्त्वार घेतलेल्या गोदामात साठवण्यात आला. तसेच काही धान हा गोदामातच महामंडळामार्फत खरेदी करण्यात आला होता. तद्नंतर जुलै, २०१३ मध्ये सदर धान शासन निर्णयानुसार विक्री करणेत आला आहे. विलंबाने विक्री झाल्याने त्यात घट आली आहे.

३. हंगाम २०१०-११ मध्ये कमी वाहुतक दर मंजुर झाल्याने खरेदी झालेले धानाची पुर्ण भरडाई झाली नाही. (भरडाईची ३९% आहे) सदर हंगामातील धानाची सुध्दा वर नमुद शासन निर्णयानुसार विक्री करणेत आला आहे. विक्री केलेनंतर सदर धानाची ६ महीण्यापर्यंत उचल सुरु होती. म्हणजेच सदर धान हे ३ ते ३.५ वर्ष (जवळपास ४० महीणे) उघडयावर पडुन होता. या कालावधीमध्ये उन, वारा, पाऊस, उंदीर, घुस व मोकाट जनावरे, तसेच काही ठिकाणी पावसाच्या पाण्याने धान भिजुन सडल्याने त्याची दुर्गंधी आजुबाजुच्या परिसरात पसरली होती, व काही ठिकाणी धानाची झालेली चोरी इत्यादी कारणांमुळे या हंगामातील धानामध्ये मोठया प्रमाणात घट/तुट आलेली आहे. चोरी झालेल्या धानाचे पंचनामा करुन संबंधित पोलिस स्टेशनला गुन्हा नोंदविला आहे.

४. शासन निर्णयानुसार वरील २००९-१०, २०१०-११ व २०११-१२ या हंगामातील दुर्गम भागात गोदामे नसल्याने महामंडळाकडुन उघडयावर धान खरेदी करुन सुध्दा धान खरेदीमध्ये १% तुट मान्य करणेत आली आहे. मात्र

याच हंगाम मध्ये मार्केटींग फेडरेशनची खरेदी गोदामात असुन सुध्दा त्यांना २% तुट मान्य करणेत आली आहे. त्यामुळे महामंडळाची तुट जास्त दिसते. तसचे भरडाईच्या दृष्टीकोणातुन मार्केटींग फेडरेशनची खरेदी केंद्र हे महामंडळाचे खरेदी केंद्रापेक्षा राईस मिलर्सच्या भरडई केंद्राजवळ असल्याने त्यांची भरडाई मोठया प्रमाणात झाली व त्याउलट महामंडळाची भरडाई कमी झाल्याने तुटीचे प्रमाण वाढले.

५. हंगाम २०१३-१४ ते २०१५-१६ पर्यंत सुध्दा वाहतुक दर निश्चित न झाल्याने सदर हंगामांमध्ये सुध्दा धानाची भरडाई पुर्ण झाली नाही. त्यामुळे घट/तुट आली आहे.

वरील सर्व अडचणींबाबत व समस्यांबाबत महामंडळाकडुन शासनाला वेळोवेळी अवगत करण्यात आलेले आहे. याबाबत आविम/विप/आखयो/घट-तुट/४२६५/१८ दिनांक ९/१०/२०१८ अन्वये निर्लेखनाचा प्रस्ताव सादर केला आहे. मात्र शासनाने त्यावर निर्णय दिलेला नाही.

हंगाम २००५-०६ ते २०१५-१६ मधील सादर केलेल्या ऑडीटेड स्टेटमेंट नुसार शासन पत्र क्र.आविम-२०१८/प्र.क्र.१६३/का.०३ दिनांक १७/११/२०२१ अन्वये वित्तीय सल्लागार व उपसचिव, अनापु, मुंबई यांनी हंगाम २००५-०६ ते २०१५-१६ या कालावधीत १% वाजवी घट वजा करुन रु.२२९.६१ कोटीची वसुलपात्र रक्कम दाखविले आहे. पैकी लोकलेखा समितीमध्ये उपस्थित झाल्यानुसार २००९-१० ते २०१५-१६ कालावधीतील तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र.१**

| हंगाम | धान खरेदी वजन क्विं. | जमा तांदुळाचे परावर्तीत धानानुसार भरडाई व क्विं. | भरडाई न झालेले धान वजन क्विं. | १% आर्दता घट वजन क्विं. (१x१/१००) | वसुलीस पात्र धान वजन क्विं. (४-५) | MSP दरानुसार वसुलीस पात्र रक्कम रु. कोटी (६xख.किंमत) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| २००९-१० | १२३९६८९.६९ | ८२९६७०.७८ | ४१००१८.९१ | १२३९६.९० | ३९७६२२.०१ | ३७.७७ |
| २०१०-११ | ११३१९७६.६५ | ४०६३१६.६४ | ७२५६६०.०१ | ११३१९.७७ | ७१४३४०.२४ | ७१.४३ |
| २०११-१२ | १०५६४३१.१७ | ९३५७११.६७ | १२०७१९.५० | १०५६४.३१ | ११०१५५.१९ | ११.९० |
| २०१२-१३ | ११८४६६७.७० | ७६०६४९.०७ | ४२४०१८.६३ | ११८४६.६८ | ४१२१७१.९५ | ५१.५२ |
| २०१३-१४ | १००६५५८.०८ | ८२५८६५.२१ | १८०६९२.८७ | १००६५.५८ | १७०६२७.२९ | २२.३५ |
| २०१४-१५ | १२६८२९५.०७ | ११०६३९५.३२ | १६१८९९.७५ | १२६८२.९५ | १४९२१६.८० | २०.२९ |
| २०१५-१६ | ११३७८३०.०५ | १०९९१९६.१८ | ३८६३३.८७ | ११३७८.३० | २७२५५.५७ | ३.८४ |
| एकुण | ८०२५४४८.४१ | ५९६३८०४.८७ | २०६१६४३.५४ | ८०२५४.४८ | १९८१३८९.०६ | २१९.१२ |

वरीलप्रमाणे हंगाम २००९-१० ते २०१५-१६ पर्यंत धान खरेदी वजा प्रत्यक्ष भरडाई नंतर शिल्लक धान रकाना क्र. ६ मध्ये दर्शविल्यानुसार एकुण १९.८१ लक्ष क्विं. असुन त्याची MSP दराने २१९.१२ कोटी रक्कम होत असुन त्याची संबंधित आविका संस्था/महामंडळाचे कर्मचारी (गोदामपाल) व मिलर्सकडील प्रलंबित असलेल्या धान, व विक्री केलेले धानामधील तोटा इत्यादीबाबतची माहीती खालीलप्रमाणे सादर करण्यात आली आहे.

**तक्ता क्र. २ :-** संस्था स्तरावर आलेल्या घटीची माहीती

| हंगाम | तक्ता क्र.१ मधील ६ नुसार महामंडळाकडे वसुलपात्र धान वजन क्विं. | रकाना क्र.२ पैकी आविवि संस्थांवर आलेली घट वजन क्विं. | संस्थाकडील घटीची MSP दराने किंमत रु. |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| २००९-१० | ३९७६२२.०१ | ४४६८४.६६ | ४२४५०४२९.९४ |
| २०१०-११ | ७१४३४०.२४ | ३७०३७५.८५ | ३७०३७५८५३.५० |
| २०११-१२ | ११०१५५.१९ | ३८८५६.१२ | ४१९६४६०७.७६ |
| २०१२-१३ | ४१२१७१.९५ | २८६३५.४६ | ३५७९४३२८.७५ |
| २०१३-१४ | १७०६२७.२९ | ७१९०२.२५ | ९४१९१९४६.४५ |
| २०१४-१५ | १४९२१६.८० | ५४६३०.७५ | ७४२९७८१९.०५ |
| २०१५-१६ | २७२५५.५७ | १७८५५.९८ | २५१७६९३१.१० |
| **एकुण** | १९८१३८९.०६ | ६२६९४१.०८ | ६८४२५१९१६.५५ |

**वरीलप्रमाणे हंगाम २००९-१० ते २०१५-१६ पर्यंत खरेदी झालेल्या धानापैकी वसुलपात्र एकुण १९.८३ लक्ष क्विं. धानापैकी प्रत्यक्ष संस्थास्तरावर ६.२६ लक्ष क्विं. तुट आलेली असुन त्याची MSP नुसार रु.६८.४२ कोटी होते. सदर तुट ही वरील १ ते ५ प्रमाणे उल्लेख केल्यानुसार त्या कारणांमुळे आलेली आहे.**

**तक्ता क्र. ३ : कर्मचाऱ्यांकडील घटीची माहीती खालीलप्रमाणे**

| हंगाम | तक्ता क्र.१ मधील ६ नुसार महामंडळाकडे वसुलपात्र धान वजन क्विं. | रकाना २ पैकी महामंडळाचे कर्मचाऱ्याकडील गोदामात आलेली घट वजन क्विं. | कर्मचाऱ्यांकडील घटीची MSP दराने किंमत रु. |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| २००९-१० | ३९७६२२.०१ | ५५७६९.६४ | ५२९८११५८ |
| २०१०-११ | ७१४३४०.२४ | १०२७३.१७ | १०२७३१७० |
| २०११-१२ | ११०१५५.१९ | ६६६७.२२ | ७२००५९७ |
| २०१२-१३ | ४१२१७१.९५ | ४१४०.१२ | ५१७५१५० |
| २०१३-१४ | १७०६२७.२९ | ५७२०.३५ | ७४९३६५८ |
| २०१४-१५ | १४९२१६.८० | ६०२५.५५ | ८१९४७४८ |
| २०१५-१६ | २७२५५.५७ | २३२३.३६ | ३२७५९३७ |
| एकुण | १९८१३८९.०६ | ९०९१९.४१ | ९४५९४४२२ |

**वरीलप्रमाणे दर्शविलेले धान हे हंगाम २००९-१० ते २०१५-१६ या कालावधीतील असुन त्यापैकी हंगाम २००९-१० मधील उघडयावरील ५,९०,००० क्विं. शिल्लक धानाची महामंडळामार्फत वाहतुक करुन गोदामात ठेवलेले व काही ठिकाणी खरेदी केलेले होते. सदर धानाची जुलै २०१३ चे शासन निर्णयानुसार विक्री झाली असुन आहे.**

महामंडळाचे ९३ कर्मचाऱ्यांवर घटीची जबाबदारी निश्चित करण्यात आली असुन खालीलप्रमाणे वसुली करणेत आली आहे.

| सेवानिवृत्त कर्म संख्या ५१ | कार्यरत कर्म. संख्या १८ | रोजंदारी कर्म. संख्या १२ | मयत कर्मचारी संख्या १३ | एकुण वसुली |
|---|---|---|---|---|
| ३०,५०,८६१ | १२,०३,२७८ | ८९,०६८ | ५,८०,५७९ | ४९,२३,७८६ |

वरील प्रमाणे एकुण रक्कम रु.४९,२३,७८६/- वसुल करणेत आले आहेत.

सदर कर्मचाऱ्यांपैकी २५ कर्मचाऱ्यांनी न्यायालयात अपिल दाखल केले असुन ८ निकाल महामंडळाचे विरोधात लागले आहेत. त्यामुळे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे उपदान व रजा रोखीकरणाच्या रकमा व्याजासह परत कराव्या लागल्या आहेत. अन्य निकाल विरोधात लागल्यास त्यांच्या रकमा देखिल व्याजासह परत कराव्या लागतील. तसेच कार्यरत कर्मचाऱ्यांकडुन त्यांचे मासिक पगारातुन वरीलप्रमाणे वसुलीची कार्यवाही सुरु आहे. वरील दर्शविल्याप्रमाणे कर्मचाऱ्यांपैकी मयत कर्मचारी तसेच सेवानिवृत्त होऊन ४ वर्षापेक्षा जादा कालावधी झालेले कर्मचारी यांच्याकडुन वसुली करणे अनुषंगाने त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करता येत नाही.

**तक्ता क्र.३ :** जुलै, २०१३ चे शासन निर्णयानुसार विक्री केलेल्या धानाचा तपशिल खालीलप्रमाणे

| हंगाम | तक्ता क्र.१ मधील ६ नुसार महामंडळाकडे वसुलपात्र धान वजन क्विं. | रकाना क्र.२ पैकी विक्री केलेले धान | | प्रत्यक्ष विक्रीतुन प्राप्त व fads कडे जमा रक्कम रु. कोटी |
|---|---|---|---|---|
| | | वजन क्विं. | MSP किंमत | |
| १ | २ | ४ | ५ | ६ |
| २००९-१० | ३९७६२२.०१ | २८२२१९.०५ | २६८१०८०९८ | २३.२५ |
| २०१०-११ | ७१४३४०.२४ | २९७१३३.४७ | २९७१३३४७० | १२.४६ |
| २०११-१२ | ११०१५५.१९ | ५१५४४.२४ | ५५६६७७७९ | १.७९ |
| २०१२-१३ | ४१२१७१.९५ | २६७३.९८ | ३३४२४७५ | ०.२६ |
| २०१३-१४ | १७०६२७.२९ | ७६२९२.५१ | ९९१४३१८८ | ५.९८ |
| २०१४-१५ | १४९२१६.८० | ८८५६०.५० | १२०४४२२८८ | ९.६१ |
| २०१५-१६ | २७२५५.५७ | ६१३१.४५ | ८६४५५३४५ | ०.६९ |
| एकुण | १९८१३८९.०६ | ८०४५५५.२० | ८५३२८२६३४ | ५४.०४ |

वरीलप्रमाणे खरेदी केंद्रावर उघडयावरील व गोदामातील धानाची विक्री जुलै, २०१३ चे शासन निर्णयानुसार करणेत आली आहे. त्यामध्ये विक्री केलेल्या धानाची MSP नुसार किंमत ८५.३२ कोटी असुन विक्रीतुन प्रत्यक्ष ५४.०४ कोटी रक्कम प्राप्त झाली असुन रु.३१.२८ कोटीचा तोटा झाला आहे. सदर तोटा शासनाने सोसणे आवश्यक आहे.

**तक्ता क्र.२ :** मिलर्सकडील शिल्लक धानाचा तपशिल (घेणे तांदुळाचे धानात रुंपातर)

| हंगाम | तक्ता क्र. १ मधील रकाना क्र.६ नुसार वसुलीस पात्र धान वजन क्विं. | प्रत्यक्षात मिलर्सना भरडाईस दिलेले धान वजन क्विं. | तक्ता क्र.१ मधील रकाना क्र. ३ नुसार मिलर्सने जमा केलेल्या तांदुळाचा धान वजन क्विं. | मिलरने भरडाई न केलेले धान वजन क्विं. (३-४) (रकाना २ पैकी शिल्लक) धान | राईस मिलर्सकडुन वसुल केलेली रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| २००९-१० | ३९७६२२.०१ | ८४४६१९.४४ | ८२९६७०.७८ | १४९४८.६६ | २९०५००००० |
| २०१०-११ | ७१४३४०.२४ | ४४२८७४.३९ | ४०६३१६.६४ | ३६५५७.७५ | |
| २०११-१२ | ११०१५५.१९ | ९४८७९९.२८ | ९३५७११.६७ | १३०८७.६१ | |
| २०१२-१३ | ४१२१७१.९५ | ११३७३७१.४६ | ७६०६४९.०७ | ३७६७२२.३९ | |
| २०१३-१४ | १७०६२७.२९ | ८४२५७७.३९ | ८२५८६५.२१ | १६७१२.१८ | ११५३०१४७ |
| २०१४-१५ | १४९२१६.८० | ११०६३९५.३२ | ११०६३९५.३२ | ०.०० | ० |
| २०१५-१६ | २७२५५.५७ | ११००१४०.९६ | १०९९१९६.१८ | ९४४.७८ | १५५६६६७ |
| एकुण | १९८१३८९.०६ | ६४२२७७८.२४ | ५९६३८०४.८७ | ४५८९७३.३७ | ३०३५८६८१४ |

वरील प्रमाणे रकाना क्र.५ मध्ये दर्शविल्यानुसार मिलर्सकडील शिल्लक धानाची वसुली शासन निर्णय क्र. खरेदी-१०१४/प्र.क्र.५५/नापु २९ दिनांक ३१/३/२०१७ अन्वये २००९-१० ते २०१२-१३ या हंगामातील तांदुळाचे दरानुसार केली जात आहे. (म्हणजेच तांदुळाची वसुली) सदरची वसुली ही मिलर्सने सादर केलेल्या धान/तांदुळ

वाहतुक देयके, बँक गॅरंटी इत्यादीतुन केली आहे व करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच ज्या मिलर्सकडे वसुली बाकी आहे, अशा मिलर्सकडुन वसुलीकरीता त्यांचेवर FIR व RRC करणेत आली आहे. सदरची प्रकरणे न्याप्रविष्ठ आहेत. तसेच सदरचे प्रकरण CID नागपुर यांचेकडे वर्ग करण्यात आली आहे. आजमितीस घेण्य असलेल्या तांदुळापोटी रक्कम रु.३०.१७ कोटी देयकातुन व काही रोखीने वसुल करणेत आली असुन सदरच्या रकमा वित्तीय सल्लागार व उपसचिव यांचेकडे समायोजीत करणेत आल्या आहेत.

हंगाम २०१३-१४ ते २०१५-१६ याकालावधीत मिलर्सने भरडाई न केलेल्या म्हणजेच जमा न केलेल्या तांदुळाची वसुली तांदुळाचे दराचे सव्वापटीने करण्यात येत आहे. सदर प्रकरणी महामंडळाचे कर्मचाऱ्यावर खाते चौकशी सुरु असुन राईस मिलर्सवर गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.

**तक्ता क्र.** : प्रत्यक्षात FADS कडील प्राप्त अहवालानुसार एकत्रित वसुलपात्र धानाचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

| हंगाम | मिलरकडे शिल्लक धान | | विक्री केलेले धान | | कर्मचाऱ्याकडील घट | |
|---|---|---|---|---|---|---|
| | वजन क्विं. | MSP किंमत | वजन क्विं. | MSP किंमत | वजन क्विं. | MSP किंमत |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| २००९-१० | १४९४८.६६ | १४२०१२२७ | २८२२१९.०५ | २६८१०८०९८ | ५५७६९.६४ | ५२९८११५८ |
| २०१०-११ | ३६५५७.७५ | ३६५५७७५० | २९७१३३.४७ | २९७१३३४७० | १०२७३.१७ | १०२७३१७० |
| २०११-१२ | १३०८७.६१ | १४१३४६१९ | ५१५४४.२४ | ५५६६७७७९ | ६६६७.२२ | ७२००५९७ |
| २०१२-१३ | ३७६७२२.३९ | ४७०९०२९८८ | २६७३.९८ | ३३४२४७५ | ४१४०.१२ | ५१७५१५० |
| २०१३-१४ | १६७१२.१८ | २१८९२९५६ | ७६२९२.५१ | ९९९४३१८८ | ५७२०.३५ | ७४९३६५८ |
| २०१४-१५ | ०.०० | ० | ८८५६०.५० | १२०४४२२८८ | ६०२५.५५ | ८१९४७४८ |
| २०१५-१६ | ९४४.७८ | १३३२१४० | ६१३१.४५ | ८६४५५३४५ | २३२३.३६ | ३२७५९३७ |
| एकुण | ४५८९७३.३७ | ५५९०२११६७८ | ८०४५५५.२० | ८५३२८२६३४ | ९०९११.४१ | ९४५९४४१९ |

| हंगाम | आविवि संस्थाकडील घट | | एकुण वसलपात्र धान | |
|---|---|---|---|---|
| | वजन क्विं. | MSP किंमत | वजन क्विं. | MSP किंमत |
| | ८ | ९ | १० | ११ |
| २००९-१० | ४४६८४.६६ | ४२४५०४२९.९४ | ३९७६२२.०१ | ३७७७४०९१२ |
| २०१०-११ | ३७०३७५.८५ | ३७०३७५८५३.५० | ७१४३४०.२४ | ७१४३४०२४३ |
| २०११-१२ | ३८८५६.१२ | ४१९६४६०७.७६ | ११०१५५.१९ | ११८९६७६०३ |
| २०१२-१३ | २८६३५.४६ | ३५७९४३२८.७५ | ४१२१७१.९५ | ५१५२१४९४१ |
| २०१३-१४ | ७१९०२.२५ | ९४१९१९४६.४५ | १७०६२७.२९ | २२३५२१७४९ |
| २०१४-१५ | ५४६३०.७५ | ७४२९७८१९.०५ | १४९२१६.८० | २०२९३४८४७ |
| २०१५-१६ | १७८५५.९८ | २५१७६९३१.१० | २७२५५.५७ | ३८४३०३५३ |
| एकुण | ६२६९४१.०८ | ६८४२५१९१६.५५ | १९८१३८९.०६ | २१९११५०६४८ |

उपरोक्त तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे बाब निहाय घटीची व धान विक्रीतील तोटयाची माहीती खालीलप्रमाणे आहे.

अ) धान विक्रीतील तोटा रक्कम रु.३१.२८ कोटी

ब) कर्मचाऱ्यांकडील घटीची रक्कम रु.९.४६ कोटी

क) संस्थांकडील घटीची रक्कम रु.६८.४२ कोटी

ड) मिलर्सकडील वसुली रक्कम रु.६६.६३ कोटी (पैकी वसुल रक्कम रु.३०.३५ कोटी)

वरील बाब निहाय एकुण घटीची व तोटयाची रक्कम रु.१०९.१५ कोटी असुन घटीची वसुली शासनाने दिडपटीने केल्यास कर्मचाऱ्यांकडील वसुली रक्कम रु.१४.१९ होते. व संस्था कडील रु.१०२.६४ इतकी होते.

वरीलप्रमाणे महामंडळामार्फत खरेदी झालेल्या हंगाम २००९-१० ते २०१५-१६ या कालावधीतील असुन त्याचा शासनाचे वेळीच निर्णय न झाल्याने नुकसान झाल्यामुळे महामंडळाकडुन वसुल न करता माफ करणेबाबत तसेच धान विक्रीतील तोटा सुध्दा वर नमुद केल्यानुसार तो शासनाने सहन करावा.

अन्न नागरी पुरवठा विभागाकडील शासन निर्णय क्र.खरेदी१०१४/प्र.क्र.५५/नापु २९ दिनांक २/२/२०१७ च्या नुसार हंगाम २००८-०९ ते २०१२-१३ कालावधीसाठी मिलर्सला CMR जमा करण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत दंड व व्याज माफ करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. महामंडळाचे कर्मचारी व संस्थांना देखील नैसर्गिक न्यायतत्वानुसार अवाजवी घटीच्या वसुलीसाठी धोरणात्मक निर्णय होणे गरजेचे आहे.

वरील हंगाम २००९-१० ते २०१५-१६ मधील संस्था व महामंडळाचे कर्मचाऱ्यांचे ताब्यात असलेल्या मालात आलेल्या घटीबाबत भारताचे लोकनियंत्रक व महालेखाकार यांचे ४६ व्या प्राप्त अहवालानुसार संबंधित घटीबाबत योग्य तो निर्णय घेणेबाबत सुचना आहेत.

सबब सदर वाजवी घट निर्लेखनाचा प्रस्ताव मान्य करणे, आदिवासी अतिदुर्गम भागातील संस्था टिकुन राहण्यासाठी, आदिवासी शेतकरी, संस्था व महामंडळाच्या हिताचे असल्याने हंगाम २००९-१० ते २०१५-१६ कालावधीत आलेली नैसर्गिक घट व धान विक्रीतील तोटयाची रक्कम असे एकुण १०९.१५ कोटी माफ करणेबाबत आदिवासी विकास विभाग यांचेकडे प्रस्ताव दिनांक ०३/१२/२०२१ रोजी सादर करणेत आला असुन त्यांचेमार्फत मा. सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना प्रस्ताव सादर आला आहे. तसेच सदरची कार्यवाही ही मा. लोकलेखा समितीच्या निर्देशानुसार सुरु आहे. यावर खालीलप्रमाणे चर्चा झाली.

मा. अध्यक्ष सो. - लोकलेखा समितीच्या पुढील सभेनंतर सदरच्या विषयावर चर्चा करु.

त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव पारित करणेत आला.

**ठराव क्रमांक ११ :-** बहुमताने ठराव पारित करणेत येतो की, सदर बाब लोकलेखा समितीसमोर ठेवावी. तसेच पुढील लोकलेखा समितीच्या सभेत झालेला निर्णयानुसार वरील विषय पुढील संचालक मंडळ सभेत ठेवावा.

**सुचक** :- मा. सुनिल भुसारा, संचालक.
**अनुमोदक** :- मा. धनराज महाले, संचालक.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

विषय क्रमांक १२ : केंद्रशासनाच्या किमान आधारभुत किंमत (MSP for MFP) गौणवनउपज

**खरेदी योजने अंतर्गत प्रादेशिक कार्यालय यवतमाळ अंतर्गत हंगाम २०१८-१९ मध्ये खरेदी गौणवनउपज माल विक्री प्रस्तावा बाबत.**

प्रादेशिक कार्यालय यवतमाळ अंतर्गत उपप्रादेशिक कार्यालय पांढरकवडा येथे हंगाम २०१८-१९ मध्ये गौणवनउपज माल मोहा बी ३.२० क्विं. खरेदी करण्यात आलेला होता.सदर माल विक्री विना शिल्लक आहे. स दर मालाला ३ वर्ष कालावधी झाला असुन तो बुरशी लागुन रंगहीन झालेला असल्यामुळे सदर मालाला बीईपीनुसार भाव मिळणे शक्य नाही.करीता सदर मोहा बी पांढरकवडा येथील स्थानिक खरेदी करण्यास तयार असले बाबत उप प्रादेशिक कार्यालय पांढरकवडा यांनी मोहा बी माल विक्री बाबतचा प्रस्ताव प्रादेशिक कार्यालय यवतमाळ यांना सादर केलेला आहे.

दिनांक ०७.०४.२०२२ रोजी मा.संचालक यांची मोहा बी विक्री बाबत निर्णय घेण्यासाठी सभा आयोजित करण्यात आली.उप प्रादेशिक कार्यालय पांढरकवडा यांनी स्थानिकांकडुन घेतलेले दर खालील प्रमाणे.१.विशाल मारुती माहुर्ले साखरा-रु.६२५/- प्रति.क्विंटल.२.वसंता केशव मेश्राम करंजी- रु.७००/- प्रति क्विंटल.३.भास्कर माधव कोडापे-रु.६७५/- प्रति क्विंटल.

वरील प्रमाणे दर प्राप्त झाले असुन सर्वाधिक दर वसंता केशव मेश्राम करंजी- रु.७००/- प्रति क्विंटलने मोहा बी खरेदी करण्यास तयार आहेत.सदर मालास बुरशी लागुन माल खराब झालेला आहे. त्यामुळे यापुढे सदर मालास दर मिळणे शक्य नाही.व सदर माल पुर्णपणे खराब होण्याची शक्यता आहे. करीता सदर मोहा बी माल विक्री होण आवश्यक असल्याचे निर्देश मा.संचालक यांनी सभेत दिलले आहेत.

प्रादेशिक व्यवस्थापक यवतमाळ यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार मोहा बी वजन ३.२० क्विं. विक्री केल्यास खालील तपशीलाप्रमाणे तोटा संभवतो.

| वजन क्विं. | केंद्रशासनाचा आधारभुत दर रु.२५००/- प्रति क्विं.नुसार रक्कम रु. | दि.३०.०६.२०२२ अखेर बी.ई.पी | बी.ई.पी. नुसार होणारी रक्कम | दि.०७.४.२०२२ रोजीच्या स्थानिक संचालक यांनी घेतलेल्या सभेत स्थानिक व्यापा-यांकडुन प्राप्त दर वजन क्विं. | दि.०७.४.२०२२ रोजीच्या स्थानिक संचालक यांनी घेतलेल्या सभेत स्थानिक व्यापा-यांकडुन प्राप्त दर रु.७००/- प्रति क्विं.नुसार वजन ३.२० क्विं. वर होणारी रक्कम रु. | तोटा (वजन ३.२० क्विं.) वर | | बोली मंजुर /नामंजुर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | आधारभुत दरानुसार रु. | बीईपीनुसार रु. | |
| ३.२० | ८०००/- | ४४४९/- | १४२३६.८०/- | ७००/- | २२४०/- | ५७६०/- | ११९९६.८०/- | प्रस्ताव मुख्यालयास सादर |

सदर माल विक्री न झाल्यास भविष्यात सदर मालास या दराने सुध्दा विक्री होईल यांची संभावना कमी आहे.असे प्रादेशिक व्यवस्थापक यवतमाळ यांनी त्यांचेकडील प्रस्तावात नमुद केले असुन त्याअन्वये मोहा बी रक्कम रु.७००/ प्रति.क्विं. प्रमाणे विक्री करणेस मंजुरी मिळणे करीता प्रस्ताव सादर केलेला आहे.

केंद्रशासनाच्या दिनांक ०३.०४.२०१४ रोजीच्या मार्गदर्शक सुचनानुसार केंद्र शासन ७५% व राज्य शासन २५% हिस्स्यानुसार तोटा भरपाई मिळण्याची तरतुद केलेली असुन त्यात केंद्र शासन हे तोटा आल्यास फक्त ३३% तोटा भरपाई देणार आहे.तरी माल विक्रीत महामंडळास तोटा आल्यास संपुर्ण तोटा हा केंद्रशासन व राज्यशासन यांचेकडुन भरुन मिळणे आवश्यक आहे.

केंद्रशासनाकडुन ३३% तोटा भरपाई देण्यात येत असुन उर्वरीत तोटा हा राज्यशासनाकडुन भरुन मिळावा जर राज्यशासनाकडुन त्याची प्रतिपुर्ती होत नसेल तर महामंडळाकडे उपलब्ध असलेल्या निधीतुन सदर तोटा भरपाईचे अधिकार महामंडळास देण्यात यावेत.

करीता प्रादेशिक व्यवस्थापक, यवतमाळ कार्यालय अंतर्गत खरेदी करण्यात आलेले गौणवनउपज मोहा बी वजन ३.२० क्विं.ला मिळालेल्या दर रु.७००/- दराप्रमाणे विक्रीस शासनस्तरावरुन मंजुरी तसेच केंद्रशासनाच्या दि.०३.०१.२०१४ रोजीच्या मार्गदर्शक सुचनानुसार केंद्र शासन ७५% व राज्य शासन २५% हिस्स्यानुसार तोटा भरपाईबाबत केंद्र शासनाचे मार्गदर्शक सुचना असल्याचे महाव्यवस्थापक (विपणन) यांनी सभेच्या निदर्शनास आणुन दिले. सदर विषयावर खालीलप्रमाणे चर्चा झाली.

मा. अध्यक्ष - संबंधित अधिकाऱ्यांनी वेळीच निर्णय न घेतल्याने सदरचा साठा शिल्लक राहीला आहे.

ट्रायफेड संचालक (प्रतिनिधी) - महामंडळाकडुन वर्षानुवर्षे उपयोगीता प्रमाणपत्र सादर करण्यात येत नाही.

मा. अध्यक्ष - सदर विषयात दर्शविलेला तोटयाची भरपाई केली जाईल काय ?

ट्रायफेड संचालक (प्रतिनिधी) - उपयोगीता प्रमाणपत्र सादर करण्यास खुप विलंब झाला आहे. त्यामुळे सदरचा तोटा केंद्र शासनाने मंजुर करण्याची शक्यता कमी आहे.

मा. अध्यक्ष - वेळीच निर्णय न घेणाऱ्या कर्मचाऱ्यांर कार्यवाही करावी.

वरील प्रमाणे चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करणेत आला.

**ठराव क्रमांक १२** :- बहुमताने ठराव पारित करणेत येतो की, वरील प्रमाणे शासनास सादर केलेल्या विक्री मालाच्या प्रस्तावास सदर संचालक मंडळ सभा मान्यता देत असुन तोटा प्रतिपुर्ती करीता देखिल शानास प्रस्ताव सादर करावा. तसेच यापुढे नव्याने विक्री समिती व व्यापार समिती तयार करणेकरीता सदस्य नियुक्तीचे अधिकार मा. अध्यक्ष सो. यांना देण्यात येत आहे.

**सुचक** :- मा. अशोक मंगाम, संचालक.

**अनुमोदक** :- मा. मधुकर काठे, संचालक

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक १३ : केंद्रशासनाच्या किमान आधारभुत दरावर आधारीत (MSP for MFP) गौणवनउपज खरेदी योजने प्रादेशिक कार्यालय गडचिरोली अंतर्गत हंगाम-२०१५-१६, मधील खरेदी गौणवनउपजसाठा निर्लेखण करणेबाबत.**

Hq

प्रादेशिक कार्यालय गडचिरोली अंतर्गत हंगाम २०१५-१६ मध्ये केंद्रशासनाच्या किमान आधारभुत दरावर आधारीत (MSP for MFP) गौणवनउपज खरेदी योजने अंतर्गत चिंच बी ४१.३८.५०० क्विं. खरेदी केली होती.सदर चिंच बीसह विक्रीकामी प्रादेशिक व्यवस्थापक गडचिरोली यांनी दि.०७.०७.२०१५, दि.१४.०७.२०१५, २१.०७.२०१५, २८.०७.२०१५ रोजी तसेच वेळोवेळी जाहिर लिलाव घेऊन सुध्दा चिंच बिसहीत ची मागणी अतिशय कमी दराने रु.५००/- प्रति क्विं.खरेदीची मागणी केलेली असुन, सदर चिंच बीसहीत खरेदी होऊन बराच कालावधी झाला असुन विक्री न झाल्यामुळे सदर मालाची प्रत खालावल्याने,Qualichem Laboratories नागपुर येथे प्रत तपासणी करीता पाठविण्यात आलेली होती,सदर लॅब अहवालानुसार चिंच (बीसहीत ची ) प्रत खराब झालेली असुन,खाण्या योग्य नसल्याचे तसेच हंगाम २०१५-१६ च्या वस्तुनिष्ठ लेख्यामध्ये सदर मालाची घट दर्शविण्यात आली असुन लेखा शाखेतुन सुध्दा कमी करण्यात आली असल्याचे तसेच सदर माल निर्लेखित करणे बाबत मुख्यालय स्तरावरुन निर्देश देणे बाबत प्रादेशिक व्यवस्थापक गडचिरोली यांनी प्रस्ताव मुख्यालयास सादर केलेला आहे.

प्रादेशिक व्यवस्थापक गडचिरोली यांचेकडील प्राप्त प्रस्तावानुसार केंद्रशासनाच्या आधारभुत दरानुसार तसेच बीईपीनुसार खालीलप्रमाणे तोटा संभवतो.

| वजन क्विं. | केंद्रशासनाचा आधारभुत दर रु.२२००/- प्रति क्विं.नुसार रक्कम रु. | दि.२७.०७.२०१५ अखेर बी.ई.पी | बी.ई.पी. नुसार होणारी रक्कम | तोटा (वजन ४१.३८.५००क्विं.) वर | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | आधारभुत दरानुसार रु. | बीईपीनुसार रु. |
| ४१.३८.५०० | ९१०४७.०० | २२५४.६० | ९३३०७.०० | ९१०४७.०० | ९३३०७.०० |

केंद्रशासनाच्या दिनांक ०३.०१.२०१४ रोजीच्या मार्गदर्शक सुचनानुसार केंद्र शासन ७५% व राज्य शासन २५% हिस्स्यानुसार तोटा भरपाई मिळणे आवश्यक आहे.

केंद्रशासनाकडुन ३३% तोटा भरपाई देण्यात येत असुन उर्वरीत तोटा हा राज्यशासनाकडुन भरुन मिळावा जर राज्यशासनाकडुन त्याची प्रतिपुर्ती होत नसेल तर महामंडळाकडे उपलब्ध असलेल्या निधीतुन सदर तोटा भरपाईचे अधिकार महामंडळास देण्यात यावेत.

प्रादेशिक कार्यालय गडचिरोली अंतर्गत हंगाम २०१५-१६ मध्ये केंद्रशासनाच्या किमान आधारभुत दरावर आधारीत (MSP for MFP) गौणवनउपज खरेदी योजने अंतर्गत चिंच बी ४१.३८.५०० क्विं.खराब झालेली असुन सदर गौणवनउपज मालास निर्लेखित करणेस तसेच केंद्र शासन ७५% व राज्य शासन २५% हिस्स्यानुसार तोटा भरपाई मिळणेकामी सदरचा विषय मा.संचालक मंडळ यांचे मान्यतेस सविनय सादर.

**ठराव क्रमांक १३** :- बहुमताने ठराव पारित करणेत येतो की, वरील प्रमाणे शासनास सादर केलेल्या विक्री मालाच्या प्रस्तावास सदर संचालक मंडळ सभा मान्यता देत असुन तोटा प्रतिपुर्ती करीता देखिल शानास प्रस्ताव सादर करावा. तसेच यापुढे नव्याने विक्री समिती व व्यापार समिती तयार करणेकरीता सदस्य नियुक्तीचे अधिकार मा. अध्यक्ष सा़ो. यांना देण्यात येत आहे.

**सुचक** :- मा. अशोक मंगाम, संचालक.

**अनुमोदक :-** मा. मधुकर काठे, संचालक

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक १४ : प्रादेशिक कार्यालय, गडचिरोली अंतर्गत हंगाम २०२०-२१ मध्ये आधारभुत किंमत खरेदी योजनेतील शिल्लक धान विक्री करुन प्राप्त होणारी रक्कम शासनाकडे जमा करणेबाबत.**

हंगाम २०२०-२१ मधील धान भरडाईच्या शासन निर्णयानुसार आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये हंगाम २०२०-२१ करीता आधारभुत खरेदी योजने अंतर्गत धान/भरडधान्य खरेदी करण्यात आली आहे. त्यानुसार प्रादेशिक कार्यालय, गडचिरोली अंतर्गत १२,२२,९०९.६५ क्विं. धान खरेदी पैकी ११,४८,५७१.८९ क्विं. धान भरडाई होवून ७४,३३७.८९ क्वि. धान भरडाईविना पुस्तकी साठयानुसार शिल्लक आहे.

हंगाम २०२०-२१ मध्ये आधारभुत खरेदी योजने अंतर्गत गडचिरोली जिल्हयात आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये खरेदी झालेली आहे. मात्र वरील प्रमाणे शिल्लक धानाची शासन निर्णयानुसार निर्धारित वेळेत भरडाई पुर्ण झालेली नाही. प्रादेशिक कार्यालय, गडचिरोली अंतर्गत एकूण १४० राईसमिल करारबध्द असूनही धान भरडाई करण्यांस बहतांशी राईसमिलर्स इच्छूक नसल्याने प्रत्यक्ष धान भरडाई सुरु न झाल्याने शासनाकडे भरडाईबाबत अडचणी मांडण्यात आल्या होत्या, तसेच शासनासोबत झालेल्या व्हिडीओ कॉन्फरंन्स बैठकी नंतर शासनाने धान भरडाई करीता एक वेळची विशेष बाब म्हणून भरडाई अनुदान रुपये १००/- प्रति क्विं. व भरडाई दराच्या रुपये ४०/- व्यतिरिक्त रुपये १०/- असे एकूण रुपये १५०/- प्रति क्विं. धान भरडाई दर शासन परिपत्रक दिनांक १४/०५/२०२१ अन्वये मजुर केल्यानंतर माहे मे, २०२१ अखेरच्या आठवडयात राईसमिलर्स यांनी प्रत्यक्ष धान भरडाई करण्यास सुरुवात केली होती, म्हणजेच मोठया प्रमाणात ७ ते ८ महिने धान साठा पडून होता. तद्नंतर मान्सुनच्या पावसाची सुरुवात झाल्याने उघडयावरील धानसाठा खराब होण्यास सुरुवात झाली.

प्रादेशिक कार्यालय, गडचिरोली अंतर्गत उघडयावरील धान पावसात खराब होऊ नये या करीता जिल्हा प्रशासनाच्या परवानगीने कोरानाच्या प्रार्दुभावामुळे बंद असलेल्या जिल्हा परिषद शाळा, शासकीय आश्रमशाळा, अनुदानित आश्रमशाळा मध्ये अंतर्गत वाहतूक करुन धान सुरक्षितरित्या साठवणून करुन ठेवण्यात आला होता. याबाबत वेळोवेळी मा. सचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांना कळविण्यात आलेले आहे. प्रादेशिक कार्यालय, गडचिरोली अंतर्गत खरेदी झालेल्या धानाच्या भरडाई नंतर प्राप्त तांदूळ मिलर्सकडून जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या अधिनस्त गोदामात जमा करण्यात आलेला होता. परंतू वेळेवर धान भरडाई सूरु न झाल्याने शासनाने दिलेल्या भरडाईच्या मुदती अंती संपूर्ण धानाची भरडाई होऊ शकली नाही. त्यामुळे जिल्हाधिकारी गडचिरोली यांच्या स्तरावरुन शिल्लक धानाचा पंचनामा करणेबाबत निर्देश देण्यात आले होते. जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या तहसिलदार यांना खरेदी केंद्रावर शिल्लक असलेल्या धानाचा पंचनामा करण्यास आदेशित केल्यानुसार संबंधीत तहसिलदार यांनी पंचनामा केल्याने भरडाईविना शिल्लक असलेल्या धानाचा ऑनलाईन लिलाव करण्याचे निर्देश देण्यात आले होते.

प्रादेशिक कार्यालय, गडचिरोली यांना दिलेल्या निर्देशानुसार त्यांनी दिनांक २९/०४/२०२२ रोजी धान वजन ५९,०६९.३८ क्विं. चा ई-लिलाव आयोजित केला होता. ई-लिलावात ठेवलेल्या धानापैकी वजन ४९,६१९.३७ क्विं. ला बोली प्राप्त झाली असून ०६ (सहा) खरेदी केंद्रावरील वजन ९,४५०.०१ क्विं. धानसाठयास व्यापाऱ्यांनी (बोली) दर दिले नसल्याने लिलावाविना शिल्लक आहे. सदर शिल्लक असलेल्या वजन ९,४५०.०१ क्विं. धानसाठयाचा दिनांक २९/०४/२०२२ रोजीच्या ई-लिलावात बोली प्राप्त नसल्याने सदर धान साठयाचा दिनांक १२/०५/२०२२, २६/०५/२०२२, व दिनांक ०८/०६/२०२२ रोजी फेर ई-लिलाव करण्यात आला, परंतू बेस दर (Base Rate) जास्त असल्याने व्यापाऱ्यांनी चारही वेळेस दर दिले नाही. त्यामुळे प्रादेशिक कार्यालय, गडचिरोली यांना बेस दर विरहीत ई-लिलाव आयोजित करण्यास परवानगी देण्यात आली होती.

सदर योजनेत कॉस्टशिट मधील बाबनिहाय खर्च करण्याची व हिशोब सादर करण्याची कार्यपध्दती दिनांक १९ सप्टेंबर, २०१९ च्या शासन परिपत्रकान्वये अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने निश्चित

केली आहे. सदर शासन परिपत्रकातील मुद्दा क्र. १० नुसार शिल्लक राहिलेल्या धानाची जबाबदारी शासनाने अभिकर्ता संस्थावर टाकली असुन शिल्लक धानाची MSP दराच्या सव्वा पटीने वसुली करणेबाबत स्पष्टता आहे. धान भरडाईची मुदत संपल्यानंतर ०७ (सात) दिवसाचे आत शिल्लक धानाचा लिलाव अभिकर्ता स्तरावर करुन प्राप्त होणारी रक्कम शासन खाती जमा करणेबाबत देखिल स्पष्ट निर्देश आहेत.

सदर धान हे पावसामुळे खराब झाल्याने त्याचा हंगाम २०२०-२१ मधील धान भरडाईच्या शासन परिपत्रकामध्ये दिलेल्या सुचनेप्रमाणे करारबध्द असलेल्या Agribazar, Agribid, NCDEX व BSE Beam यांच्या प्लॅटफॉर्मवर ई-लिलावाद्वारे सदर माल विक्री करीता ठेवण्यात आला होता. त्यात Agribazar, Agribid यांच्या कडून एकही बिड प्राप्त झाली नाही, परंतू NCDEX व BSE Beam यांच्याकडून किमान दराप्रमाणे होणारी किंमत रुपये १,७६,५२,६१८-६८ आहे व सदर धानाला ई-लिलावामध्ये प्राप्त झालेल्या उच्चतम बोलीनुसार प्राप्त होणारी रक्कम रुपये ६६,५८,७७५-६१ आहे. या धान विक्री मध्ये अंदाजे रुपये १,०९,९३,८४३-०७ अपेक्षित तोटा दिसत असल्याचे प्रादेशिक कार्यालय, गडचिरोली यांचेकडील प्राप्त प्रस्तावावरुन दिसून येते. ई-लिलाव धारकांकडून प्रत्यक्ष धान उचल झाल्यनंतरच एकूण होणाऱ्या तोटयाची अचूक माहिती उपलब्ध होईल.

या कार्यालयाशी करारबध्द ऑनलाईन कंपनीसोबत केल्या करारानुसार ई-निविदे करीता ठेवलेल्या धानाच्या प्राप्त दरास १० दिवसाच्या आत मंजुरी देणे नियमानुसार बंधनकारक असल्यामुळे सदर प्रस्ताव मा. अध्यक्ष आदिवासी विकास महामंडळ तथा मा. मंत्री, आदिवासी विकास यांच्याकडे मंजुरीसाठी पाठविला होता, परंतू त्यांनी सदर प्रस्ताव मा. संचालक मंडळासमोर ठेवण्याबाबत सुचित केले आहे. सदर साठवणूक केलेला धानाची प्रत खालावली असुन गोदामभाडे पोटी शासनाचे आर्थिक नुकसान होत असून सदर साठविलेल्या धानास यापुढे जास्तीचे दर मिळतीलच याची शाश्वती नाही.

करीता प्रादेशिक कार्यालय, गडचिरोली अंतर्गत हंगाम २०२०-२१ मधील भरडाईविना शिल्लक असलेला धानसाठा विक्रीच्या कार्यवाही बाबतचा प्रस्ताव आपणासमोर मंजूरी करीता सादर करण्यात येत आहे. मंजूरी प्राप्त झाल्यानंतर ई-लिलाव धारकांना धान उचल करणेसाठी डिलीव्हरी आदेशि निर्गमीत करण्यात येतील व धान उचलअंती आलेल्या घटी निश्चित करुन सदर व्यवहारात होणाऱ्या तोटयाचा प्रस्ताव शासनास सादर करता येईल.

**ठराव क्रमांक १४** :- बहुमताने ठराव पारित करण्यात येतो की, वेळीच मालाची उचल न झाल्याने धानसाठा शिल्लक राहतो. तसेच धान भरडाई प्रक्रीयेत जिल्हाधिकारी/जिल्हा पुरवठा विभाग यांचेवर अवलंबुन रहावे लागते. त्यामुळे आधारभुत किंमत खरेदी योजनेअंतर्गत येणारा तोटयाची प्रतिपुर्ती अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने करणेबाबतचा प्रस्ताव पाठवावा.

**सुचक** :- मा. भरतलाल दुधनाग, संचालक.

**अनुमोदक** :- मा. सुनिल भुसारा, संचालक.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक १५ : आर्द्रता मापक यंत्र खरेदी करीता http:/www.mahatenders.gov.in राबविण्यात आलेल्या ई-निविदेस कार्योत्तर मान्यता देणेबाबत.**

हंगाम २०२२-२३ मध्ये आधारभुत किंमत खरेदी योजनेअंतर्गत खरेदी होणाऱ्या धान/भरडधान्याचे आर्द्रता (धान्यातील ओलावा) मापकाकरीता प्रादेशिक कार्यालयांच्या मागणीनुसार २४३ आर्द्रता मापक यंत्र (Moisture Meter) खरेदीची ई-निविदा क्र.MSTDC_७९९९२१_१ दिनांक २०/७/२०२२ रोजी http//mahatenders.gov.in या पोर्टलवर प्रसिध्द करणेत आली होती. ई-निविदा अटी-शर्ती नुसार तसेच शासन निर्णय दिनांक १/१२/२०१६ नुसार ३ निविदाकारांनी भाग घेणे आवश्यक आहे. पंरतु फक्त १ निविदा काराने भाग घेतल्याने सदर निविदेस ८/६/२०२२ रोजी मुदतवाढ देण्यात आली असता ३ निविदाकारांनी भाग घेतल्याचे निदर्शनास आले. सदरचे निविदाकार निविदा अटी-शर्ती नुसार पुर्तता करीत नसल्याने सदर निविदा दिनांक १२/७/२०२२ रोजी रद्द करण्यात आली.

अ) वर नमुद निविदा रद्द करुन पुर्ननिविदा क्र.MSTDC_८१७३६०_१ दिनांक १२/७/२०२२ रोजी http//mahatenders. gov.in या पोर्टलवर प्रसिध्द करणेत आली.

ब) परंतु सदर निविदेत फक्त १ (एक) निविदाकाराने भाग घेतल्याने दिनांक २०/७/२०२२ प्रथम मुदतवाढ देण्यात आली.

क) त्यात देखिल फक्त २ (दोन) निविदाकाराने भाग घेतल्याने दुसऱ्यांदा दिनांक २७/७/२०२२ रोजी मुदतवाढ देण्यात आली होती.

उद्योग, उर्जा व कामगार विभागाकडील शासन निर्णय क्र.भांकस-२०१४/प्र.क्र.८२/भाग III/उद्योग-४ दिनांक १/१२/२०१६ मधील ४.४.३.१ निविदा कालावधी मुदतवाढ बाबत खालीलप्रमाणे निदेर्श आहेत.

निविदा स्पर्धात्मक होण्यासाठी कमीत कमी ३ निविदाकार असणे आवश्यक आहे. ३ पेक्षा कमी निविदाकारांनी भाग घेतला असल्यास संबंधित खरेदी अधिकाऱ्याने प्रथम किमान एक आठवडयाची मुतदवाढ द्यावी. अशी मुदतवाढ दिल्यानंतर देखिल ३ पेक्षा कमी निविदाकारांनी भाग घेतला असल्याचे निदर्शनास आल्यास दुसऱ्यांदा एक आठवडयाची मुदतवाढ द्यावी. त्यानंतर कोणतीही मुतदवाढ देण्यात येऊ नये.

निविदा प्रक्रीया राबवितांना खालीलप्रमाणे परिस्थितीत उद्भवल्यास पुढे नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

अ. तीन किंवा त्यापेक्षा अधिक निविदा तांत्रीक दृष्ट्या पात्र ठरल्यास त्यावर खरेदी विभागास पुढे जाण्यास मुभा राहील.

ब. दोन निविदा तांत्रीक दृष्ट्या पात्र ठरल्यास खरेदीची वास्तविक किंमत व अगोदर ठरलेली अंदाजीत किंमत यामध्ये (-) २०% ते (+) १०% तफावत असल्यास ती मान्य करण्यास खरेदीदार विभागास मुभा राहील. या किंमत श्रेणीमध्ये (Price Band) किंमती न आल्यास फेरनिविदा काढावी.

क. एकही नाही अथवा एकच निविदा तांत्रीक दृष्ट्या पात्र ठरल्यास पुर्ननिविदा काढण्यात यावी.

रुपये दहा (१०) लाखापेक्षा कमि रकमेची निविदा असल्यास फक्त एकदाच मुदतवाढ देण्यात यावी.

कामाची पुर्तता वेळेवर करण्यास महत्त्व देण्यात आले तर, खरेदी अधिकारी (दोन वेळा मुतदवाढ दिल्यानंतर देखिल) ३ निविदा पेक्षा कमी प्रतिसाद मिळाला तरी त्यासह पुढे जाण्याचा निर्णय घेऊ शकेल व त्यासाठी सुसाध्य कारणे नमुद करेल. अश प्रसंगी, किमतीच्या वाजवीपणाची खात्री करण्यासाठी खरेदी समितीला अतिरीक्त काळजी घ्यावी लागेल असे निर्देश आहेत.

पुनर्निविदा क्र.MSTDC_८१७३६०_१ निविदेचे तांत्रीक लिफाफे दिनांक ५/८/२०२२ रोजी उघडण्यात आले. ई-निविदा क्र.२०२२_MSTDC_८१७३६०_१ मध्ये खालीलप्रमाणे निविदाकारांनी भाग घेतला आहे.

१. डुकॉन इन्स्टुमेट्स, बी कमला मार्केट, टिंबर मार्केट अंबाला, हरीयाणा

२. श्रीकृष्णा साईन्टीफीक, ५३०१ पंजाबी मोहल्ला, अंबाला कॅन्ट, अंबाला हरीयाणा

वरीलप्रमाणे निविदेत भाग घेतलेल्या २ निविदाकारांनी ऑनलाईन सादर केलेले दस्तऐवज डाऊनलोड/उघडण्यात येऊन त्याच्या प्रिंट काढण्यात आल्या. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**१. डुकॉन इन्स्ट्रुमेट्स, बी कमला मार्केट, टिंबर मार्केट अंबाला, हरीयाणा**

१. निविदा अटी/शर्तीनुसार निविदा फॉर्म फी रक्कम रुपये ३५४६/- ऑनलाईन भरणा केलेला आहे.

२. ईएमडी डिपॉझिट रक्कम रुपये २२०००/- ऑनलाईन भरणा केलेला आहे.

३. N.A.B.L.Certificate सादर केलेले आहे.

४. वर्ष २०१८-१९ २०१९-२० व २०२०-२१ या तीन वर्षाचे उलाढालाचे सनदी लेखापाल यांचे Certificate सादर केलेले आहे.

५. GST Certificate सादर केलेले आहे.

६. पॅनकार्ड सादर केलेले आहे.

७. Annexure-५ रु.५००/-च्या स्टॅपपेपर वर सादर केलेले आहे.

८. सदर निविदाधारक हा स्वतः मॉईश्चर मिटर उत्पादक आहे.

९. वर्ष २०१८-१९, २०१९-२० व २०२०-२१ मध्ये शासकीय/निमशासकीय कार्यालयाना मॉईश्चर मिटर पुरवठयाचे आदेश जोडण्याबाबत नमुद आहे. मात्र सदर निविदाधारकांनी वर्ष २०२०-२१ या एका वर्षाचे माईश्चर मिटर पुरवठयाचे आदेश जोडलेला आहे.

**२. श्रीकृष्णा साईन्टीफीक, ५३०१ पंजाबी मोहल्ला, अंबाला कॅन्ट, अंबाला हरीयाणा**

१. निविदा अटी/शर्तीनुसार निविदा फॉर्म फी रक्कम रुपये ३५४६/- ऑनलाईन भरणा केलेला आहे.

२. ईएमडी डिपॉझिट भरणा केलेला नसुन ईएमडी सुट मिळणे करीता MSME Registration Certificate सादर केलेला आहे.

३. N.A.B.L.Certificate सादर केलेले नाही.

४. वर्ष २०१८-१९ २०१९-२० व २०२०-२१ या तीन वर्षाचे उलाढालाचे सनदी लेखापाल यांचे Certificate सादर केलेले आहे.

५. GST Certificate सादर केलेले आहे.

६. पॅनकार्ड सादर केलेले आहे.

७. Annexure-५ रु.५००/-च्या स्टॅपपेपर वर सादर केलेले आहे.

८. सदर निविदाधारक हा स्वतः मॉईश्चर मिटर उत्पादक नसुन वितरक आहे.

९. वर्ष २०१८-१९, २०१९-२० व २०२०-२१ मध्ये शासकीय/निमशासकीय कार्यालयाना मॉईश्चर मिटर पुरवठयाचे आदेश जोडण्याबाबत नमुद आहे. मात्र सदर निविदाधारकांनी माईश्चर मिटर पुरवठयाचे आदेश जोडलेला नाही.

उपरोक्त तांत्रिकबाबीची तुलना केली असता अनुक्रमांक १) डुकॉन इन्स्ट्रुमेंट्स, बी कमला मार्केट, टिंबर मार्केट अंबाला, हरीयाणा यांनी वर्ष २०२०-२१ मध्ये पुरवठयाचे आदेश जोडला आहे.

अनुक्रमांक २) श्रीकृष्णा साईन्टीफीक, ५३०१ पंजाबी मोहल्ला, अंबाला कॅन्ट, अंबाला हरीयाणा यांनी माईश्चर मिटर पुरवठा केल्याचे आदेश सादर केलेले नाहीत.

करीता दोन निविदाधारकांनी ई-निविदेत सादर केलेल्या ऑनलाईन केलेल्या दस्तऐवजांचे तपासणी करण्यात आली आहे. परंतु स्पधात्मक दर प्राप्त होणेसाठी अटी-शर्ती शिथील करण्यात येऊन दिनांक २९.०८.२०२२ ऑनलाईन दर डाऊनलोड/उघडण्यात आले असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | प्रति नग दर रुपये | |
|---|---|---|---|
| १. | मे. श्री कृष्णा सॉयन्टीफिक्स, ५३०१ पंजाबी मोहला, अंबाला कॅन्ट, हरीया, (हरीयाणा) | **६६५५.००** | **L१** |
| २. | मे. डुकान इंन्डस्ट्रिज, शॉप नं.८, कमला मार्केट, टिंम्बर बाजार, अंबाला सिटी, (हरीयाणा) | **८५१०.००** | **L२** |

वरीलप्रमाणे अ.क्र.१ यांनी न्युनत्तम दर दिले असुन आर्द्रता मापक यंत्र पुरवठा करणेकामी करारनामा व आदेश देण्याची कार्यवाही सुरु असल्याचे मा. महाव्यवस्थापक (विपणन) यांनी सभेच्या निदर्शनास आणुन दिले. तसेच कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत विनंती केली. त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव पारित करणेत आला.

**ठराव क्रमांक १५ :-** सर्वानुमते ठराव पारित करणेत येतो की, खरेदी केल्या जाणाऱ्या कृषी उपज मालाचे आर्द्रता मापणाकरीता आर्द्रता मापक यंत्र खरेदीकरीता रक्कम रु.१६,१७,१६५/- इतक्या खर्चास मंजुरी देण्यात येत आहे.

**सुचक** :- मा. भरतलाल दुधनाग, संचालक

**अनुमोदक** :- अशोक मंगाम, संचालक

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक १६ : सन २०१७-१८ ते सन २०२२-२३ मधील जी.एस.टी. भरणा करणेकामी सनदी लेखापाल नियुक्त करणेबाबत.**

सन २०१६-१७ पासुन संपुर्ण भारतात तसेच महाराष्ट्र राज्यात जी.एस.टी. कायदा लागु करण्यात आला. त्यानुसार महामंडळामार्फत योजना राबवितांना लागु होणाऱ्या जी.एस.टी. भरणा करणेकामी सनदी लेखापाल यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. परंतु सन २०१७-१८ ते सन २०२२-२३ मधील जी.एस.टी. भरणा करणेकामी सनदी लेखापाल नियुक्त नसल्याने सदर कालावधीतील जी.एस.टी. भरणा करणे प्रलंबित आहे.

सदर बाब विचारात घेता सनदी लेखापाल नियुक्तीच्या अनुषंगाने ई-निविदा अटी शर्ती तयार करणेकामी मे. के.पी.एन., सनदी लेखापाल यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यानुसार ई-निविदा अटी-शर्ती यांनी सादर केलेल्या आहेत. त्यासोबत Institute of CA Of India यांचेकडील दर सुद्धा जोडलेले आहेत. तसेच ई-निविदा प्रसिद्ध न करता Institute of CA Of India यांचेकडील निश्चित केलेल्या दरानुसार दरपत्रक मागवुन सनदी लेखापाल यांची नियुक्त करता येईल, असे देखिल मे. के.पी.एन., सनदी लेखापाल यांनी सुचविले आहे. त्यानुसार दिनांक १७.०६.२०२२ रोजी दैनिक वृत्तपत्रात दरपत्रक मागविणेकरीता जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. दिनांक २८.०६.२०२२ पर्यंत दरपत्रकाचे फॉर्म विक्री करण्यात येवुन ज्या सनदी लेखापाल यांनी दरपत्रकाचे फॉर्म खरेदी केले आहेत, त्यांना दरपत्रकाचे लिफाफे दिनांक ८.०७.२०२२ रोजीपर्यंत सादर करणेबाबत लेखी कळविण्यात आलेले होते. त्यानुसार ७ फर्म्सने बंद लिफाफ्यात दरपत्रक सादर केलेले आहेत. तसेच निविदा अटी-शर्तीनुसार सादर केलेल्या दस्तऐवजानुसार तांत्रीक बाबबींची तुलना केली असता फर्म्स गुण देण्यात आले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | फॅर्मचे/सनदी लेखापाल नांव | प्राप्त गुण |
|---|---|---|
| १ | डी.ए.डी.ॲन्ड कंपनी, नाशिक श्री.अभिजित एस. महाले, सनदी लेखापाल | ६५ |
| २ | एम.ए.पी.एस.व्ही ॲन्ड असोसिएट, नाशिक श्री. विकास किसन हासे, सनदी लेखापाल | १०० |
| ३ | आर.आर.काबरा ॲन्ड बिर्ला, नाशिक श्री. राकेश आर. काबरा, सनदी लेखापाल | २० |
| ४ | मयुर वाघ ॲन्ड असोसिएट, नाशिक श्री. मयुर वाघ, सनदी लेखापाल | ०५ |
| ५ | एन. एस.एस.ॲन्ड कंपनी, नाशिक श्री.निखिल ढेमसे, सनदी लेखापाल | ६० |
| ६ | चेतन आनंद ॲन्ड कंपनी, नाशिक श्री. चेतन बंब, सनदी लेखापाल | १० |
| ७ | ए.वाय.जी. ॲन्ड असोसिएट, नाशिक श्री. योगेश कटारीया | ९० |

वरील अ.क्र.२ यांनी माघार घेतली असुन अं.क्र.१, ५ व ७ यांना ६० पेक्षा जादा गुण मिळाले आहेत. सदर तिनही निविदाकारांचे दरपत्रक उघडयाची कार्यवाही सुरु असुन ज्याचे दर न्यनत्तम असतील अशा फर्म्सला सदनी लेखापाल म्हणुन नियुक्त करण्याबाबत मा. महाव्यवस्थापक (विपणन) यांनी सभेला विनंती केली असता खालीलप्रमाणे ठराव पारित करणेत आला.

**ठराव क्रमांक १६ :-** सर्वानुमते ठराव पारित करण्यात येतो की, प्रलंबित GST कामकाजाकरीता सनदी लेखापाल यांची नियुक्ती करण्यास मा. अध्यक्ष, आदिवासी विकास महामंडळ यांना देण्यात येत आहे. तद्नंतर व्यवस्थापकीय संचालक यांनी कार्यवाही करावी.

**सुचक** :- मा. धनराज महाले, संचालक.

**अनुमोदक** :- मा. भरतलाल दुधनाग, संचालक.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक १७ : केंद्रशासनाच्या किमान आधारभुत किंमत (MSP for MFP) गौणवनउपज योजने अंतर्गत वनधन केंद्रासाठी उपलब्ध करुन दिलेला निधी रु.२,५५,००,०००/- कोटी निधी वर्ग केल्याबाबत.**

उपरोक्त विषयान्वये सादर करणेत येते की, केंद्रशासनाने सन 2018-19 पासुन प्रधानमंत्री वनधन विकास योजना सुरु केली असुन सदर योजनेमध्ये जंगलात उत्पादित होणा-या गौणवनउपजावर आदिवासींचे परंपरागत ज्ञानाचा, कौशल्याचा तसेच त्यासोबत आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग करुन गौणवनउपजावर प्रक्रिया करणे व त्याचे मुल्यसंवर्धन करुन त्याची विक्री करणे त्यामुळे आदिवासीचे जिवनमान उंचावणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. प्रथम सदर योजना राबवीणेकरीता शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या,नाशिक यांची राज्य अभिकर्ता संस्था (SIA) म्हणुन नेमणुक करण्यात आली होती.

दि.१६.०४.२०२० व दि.०४.०६.२०२० रोजीच्या मा.मंत्री महोदय आदिवासी विकास तथा अध्यक्ष महा.राज्य.सह.आदिवासी विकास महामंडळ मर्या,नाशिक यांचे मंजुर टिपणी अन्वये मंजुर २६४ वनधन केंद्रापैकी ४७ वनधन केंद्राना गौणवनउपज खरेदीसाठी प्रत्येकी रु.५/- लक्ष प्रमाणे महामंडळाकडील केंद्रशासनाच्या किमान आधारभुत किंमत (MSP for MFP) गौणवनउपज योजनेतील प्राप्त निधी रक्कम रु.५/-कोटी पैकी रक्कम एकुण रु.२.५५ कोटी निधी ०६ महिन्याकरीता बिनव्याजी स्वरूपात खेळते भांगभांडवलाकरीता शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या,नाशिक यांना वर्ग करण्यात आलेला होता.

प्रधानमंत्री वनधन योजनेची अंमलबजावणी होण्यासाठी शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या,नाशिक ऐवजी आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक यांना राज्य अभिकर्ता संस्था (SIA) म्हणुन ) शासन निर्णय क्र.एमएफपी-२०२०/प्र.क्र.३०/का.३ मंत्रालय मुंबई-३२ दि.२० मे २०२२ अन्वये नेमण्यात आले आहे.

पत्र क्र.आविम/विप/MSP for MFP/निधी.२३९२/२०२२ दि.२१ जुलै २०२२ अन्वये महा.राज्य.सह. आदि.विकास.महा.मर्या, नाशिक यांनी शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या, नाशिक यांना उपलब्ध करुन दिलेला रु.२,५५,००,०००/- कोटी निधी महा. राज्य. सह.आदि. विकास. महा.मर्या, नाशिक यांचेकडे वर्ग करणेबाबत कळविण्यात आलेले होते. त्यानुसार पत्र क्र.आविम/विप/MSP for MFP/निधी.२३९२/२०२२ दि.२१ जुलै २०२२ च्या अनुषंगाने MSP for MFP योजनेचा रु.२,५५,००,०००/- (अक्षरी दोन कोटी पंच्चावन्न लक्ष मात्र.) निधी शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या, नाशिक यांचेकडुन या कार्यालयास वर्ग करण्यात आला आहे.

वरील विषयाच्या अनुषंगाने मा. अध्यक्ष सो. यांनी खालीलप्रमाणे सुचना दिल्या.

अध्यक्ष :- महामंडळाने इतर विभागांना निधी वर्ग करु नये. केला असल्यास सदरचा निधी परत घ्यावा.

मा. सुनिल भुसारा, संचालक - यापुढे निधी अन्य विभागास वर्ग करावयाचा असल्यास संचालक मंडळाची मान्यता घ्यावी. यावर खालीलप्रमाणे ठराव पारित करणेत आला.

**ठराव क्र.१७ :-** सर्वानुमते ठराव पारित करणेत येतो की, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या, नाशिक यांचेकडुन परत घेतलेल्या निधीबाबत केलेल्या कार्यवाहीस मान्यता देत आहे. परंतु यापुढे संचालक मंडळाची मान्यता घेऊनच निधी अन्य विभागास वर्ग करावा.

सुचक :- मा. सुनिल भुसारा, संचालक

अनुमोदक :- मा. धनराज महाले, संचालक

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक १८ : संचालक मंडळ सभा दिनांक १६/०९/२०२२ व वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक ३०/०९/२०२२ रोजीच्या खर्चाबाबत.**

दिनांक ३१/०३/२०२२ रोजी आर्थिक वर्ष संपले असल्या कारणाने महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाची **दिनांक १६.०९.२०२२ रोजी संचालक मंडळ सभा व दिनांक ३०.०९.२०२२ रोजी वार्षिक सर्वसाधारण सभा** आयोजित करण्याचे ठरले आहे.

सदर संचालक मंडळ सभा व वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सभागृह व्यवस्था, संचालक मंडळ साठी निवास व भोजन व्यवस्था,वाहन व्यवस्था इ. खर्चासाठी **अंदाजित रक्कम रुपये १८ लक्ष इतका** खर्च अपेक्षित आहे. तरी सदर खर्चास मान्यतेस सादर.

उपरोक्त विषयाचे महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी सविस्तर वाचन करुन सदर विषय मंजूरी करीता सभेपुढे सादर केला. सदर चर्चेत भाग घेतांना मा. भुसारा साो. संचालक यांनी सुचविले की, आगामी वार्षिक सर्वसाधारण सभा घेणेबाबत ठिकाण मा. अध्यक्ष महोदय यांनी निश्चित करावे. यावर मा. अध्यक्ष महोदय यांनी या वर्षीची वार्षिक सर्वसाधारण सभा ही नाशिक येथेच घेणे बाबत निर्देश दिले. सदर विषयावर सविस्तर चर्चा होवून खालीलप्रमाणे ठराव बहुमताने मंजूर करण्यात आला.

**ठराव क्रमांक १८** : दिनांक १६.०९.२०२२ रोजी संचालक मंडळ सभा व दिनांक ३०.०९.२०२२ रोजी वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी येणाऱ्या अंदाजित रक्कम रु.१८ लक्ष इतक्या खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- मा.श्री. सुनिल भुसारा, संचालक
अनुमोदक :- मा.श्री. भरतसिंग थुकेलसिंग दुधनाग, संचालक.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक १९ : महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक च्या संस्थेचा व्यवस्थापन समितीच्या संरचनेबाबत.**

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या., नाशिक यां सांघिय संस्थेची, महाराष्ट्र राज्य सहकारी अधिनियम १९६० व नियम १९६१ चे कलम ९ (i) अन्वये दि.२२.०३.१९७२ रोजी नोंदणी करण्यात आलेली असुन कायद्यातील कलम १२ (१) नुसार सदर संस्थेचे वर्गीकरण हे सर्वसाधारण संस्था व उपवर्गीकरण इतर संस्था असे करण्यात आले आहे. जुना पोटनियम क्रमांक ४१ व ४२ अन्वये संचालक मंडळ संरचना ही खालीलप्रमाणे आहे.

| संचालक मंडळ (४१) | महामंडळाचा कारभार व व्यवस्थापन संचालक मंडळ चालवेल. संचालक मंडळ खालील प्रमाणे असेल. | |
|---|---|---|
| १. | महाराष्ट्र शासनाने नियुक्त करावयाचे (आठ) त्यापैकी तीन संचालक संख्या राज्य विधिमंडळाचे विद्यमान आदिवासी सभासद असतील... | ०८ |
| २. | संलग्न संस्थांनी निवडून द्यावयाच्या एकूण-१२ संचालकांची संख्या जिल्हावार खालील दर्शविल्याप्रमाणे असेल, मात्र निवडून द्यावयाचे संचालक हे आदिवासीच राहतील... | १२ |
| ३. | अ) ठाणे. | ०२ |

| | | | |
|---|---|---|---|
| | ब) | नासिक. | ०२ |
| | क) | धुळे व जळगांव. | ०२ |
| | ड) | पुणे व रायगड. | ०१ |
| | इ) | अहमदनगर. | ०१ |
| | ई) | अमरावती. | ०१ |
| | फ) | यवतमाळ व नांदेड. | ०१ |
| | ग) | नागपूर व भंडारा. | ०१ |
| | ह) | चंद्रपूर व गडचिरोली. | ०१ |
| | छ) | राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातून महामंडळाच्या सभासद संलग्न संस्थांनी निवडावयाच्या आदिवासी महिला राखीव संचालिका. | ०३ |
| ४. | महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., ने नियुक्त केलेला एक आदिवासी संचालक, आदिवासी संचालक उपलब्ध नसल्यास इतर आरक्षित वर्गातील एक संचालक, इतर आरक्षित वर्गातील संचालक उपलब्ध नसल्यास इतर (जनरल) वर्गातील एक संचालक. | | |
| ५. | राज्य सहकारी अंगिकृत, निमराज्य सहकारी अंगिकृत संस्था अगर स्थानिक संस्था यासाठी शासनाने नियुक्त करावयाचा एक संचालक. | | |
| ६. | सचिव, आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन. | | |
| ७. | केंद्र शासनाने नियुक्त करावयाचे दोन प्रतिनिधी. | | |
| ८. | अपर आयुक्त, आदिवासी विकास ठाणे, नासिक, अमरावती, नागपूर. | | |
| ९. | प्रमुख वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य किंवा त्यांचा प्रतिनिधी. | | |
| १०. | निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य किंवा त्यांचा प्रतिनिधी. | | |
| ११. | कर्मचाऱ्यांचे दोन प्रतिनिधींपैकी किमान एक मान्यताप्राप्त संघटनेचा असावा. | | |
| | व्यवस्थापकीय संचालक, पदसिध्द सदस्य सचिव किंवा त्यांचेकरिता व त्यांचेवतीने उप व्यवस्थापकीय संचालक. | | |
| ४२) अ) | पोटनियम ४१ कलम (२) प्रमाणे निवडावयाचे संचालक हे दर ५ वर्षाने निवडले जातील आणि अशारितीने निवडून आलेले संचालक पहिली सभा ज्या तारखेला घेण्यात येईल त्या तारखेपासून ५ वर्षाच्या मुदतीपर्यंत पदधारण करतील आणि नवीन समितीच्या सदस्यांची पहिली सभा भरण्याच्या निकटपूर्वीपर्यंत ते पदावर राहतील. | | |
| ब) | निवृत्त होणारे संचालक पुन्हा निवडणूकीसाठी पात्र राहतील. | | |
| क) | नियुक्त केलेले, निवडलेले अगर स्विकृत करण्यात आलेले संचालक पुढील शासनाने नियुक्ती करेपर्यंत, निवडेपर्यंत अगर स्विकृत करेपर्यंत त्या जागेवर राहतील. | | |

उपरोक्त पोटनियम क्रमांक ४१ व ४२ नुसार संचालक मंडळाची संरचना आहे. सदर संरचनेनुसार मागील संचालक मंडळ हे दि.०५.०३.२०१० रोजी निवडुन आले असुन पहिली संचालक मंडळ सभा ही दिनांक १८.०३.२०१० रोजी संपन्न झाली असुन सदर तारखेपासमुन दिनांक १७.०३.२०१५ रोजीच्या मुदतीपर्यंत पदधारण करतील अशी उपरोक्त पोटनियमा प्रमाणे तरतुद आहे. दिनांक १७.०३.२०१५ रोजी नंतर सद्यस्थितीतील संचालक मंडळ मुदत हि समाप्त झालेली असुन निवडणुक होणे अपेक्षित होते.

जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी यांचेकडुन निवडणुक कार्यक्रम सन २०१५ मध्ये जाहीर करण्यात आलेला होता. ९७ व्या घटनादुरुस्तीनुसार दि.१४/२/२०१३ रोजी महाराष्ट्र सहकारी अधिनियम १९६० चे कलम ७३ अअअ, ब, क यात केलेल्या दुरंस्तीनुसार उपविधीत दुरुस्ती करून संचालक मंडळ संरचनेत सुधारणा न झाल्याने संचालक मंडळाची निवडणुक घेण्यात आलेली नाही. तसेच सदरील पोट नियम दुरुस्तीबाबतचा विषय संचालक मंडळाचे सन २०१३-१४ व २०१४-१५ च्या सभेत चर्चेस न आल्याने पोट

नियम दुरुस्तीचा निर्णय होवु शकला नाही. तद्नंतर पोटनियम दुरुस्तीचा प्रस्ताव हा वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २९.०९.२०१६ मध्ये पुढे ठेवण्यात आलेला होता. वार्षिक सर्वसाधारण सभेत संचालक सदस्य संरचना दुरुस्ती ही जुना पोटनियम क्रमांक ४१ (२) प्रमाणेच ठेवुन किरकोळ बदलासह उर्वरित सर्व पोटनियम हे बदलण्याकरिता वार्षिक सर्वसाधारण सभा दि.२९.०९.२०१६ मार्फत मंजुरी देण्यात आली. दिनांक २९.०६.२०१६ च्या शासन निर्णयानुसार जुना पोटनियम क्रमांक ४१ (२) जुन्याप्रमाणे ठेवुन सहकार आयुक्तांना मंजुरी करिता पाठविण्यात आले. मा.सहाकार आयुक्तांनी जुना पोटनियम क्रमांक ४१ (२) वगळता उर्वरित सर्व पोटनियमास मा.आयुक्त (सहकार) यांचेमार्फत मंजुरी देण्यात आली.

महाराष्ट्र राज्य सहकारी अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या ९७ व्या घटना दुरुस्तीनुसार पुढील संचालक मंडळ निवडणुक घेणेकामी जुना पोटनियम क्रमांक ४१(२) पोटनियमास मंजुरी मिळणे आवश्यक आहे. उपनिबंधक,सहकारी संस्था (आ.वि.),महाराष्ट्र राज्य,नाशिक यांचे पत्र क्रमांक २०/आविम/निवडणुक व ९७ व्या घटना पोटनियम दुरुस्ती/२०२० दिनांक २२.०९.२०१७ रोजीच्या पत्रानुसार ९७ व्या घटनादुरुस्तीनुसार महामंडळाचा उपविधी क्रमांक २० मध्ये दुरुस्ती करुन उपविधी दुरुस्ती बाबतचा प्रस्ताव मा.सहकार आयुक्त कार्यालयास सादर करण्याचे कळविण्यात आले आहे. **दिनांक २९.०६.२०१६ रोजी आदिवासी विकास विभागामार्फत महामंडळाच्या संचालकांच्या संरचनेबाबत जो शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता, तो शासन निर्णय हा दिनांक २३.०७.२०२०च्या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात आला आहे.** दिनांक २९.०६.२०१६ च्या शासन निर्णया विरोधात मा.उच्च न्यायालय, नागपुर येथे रिट याचिका क्रमांक ३०३/२०१७ दिनांक २०.०१.२०१७ रोजी दाखल करण्यात आली असुन सदर याचिका मा.उच्च न्यायालय मुंबई येथे दिनांक २६.०९.२०१८ रोजी वर्ग करण्यात आली आहे. सदरील याचिकेस WP No. १२९८७/२०१८ असा देण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत सदरील याचिका मा.न्यायालयात प्रलंबित आहे.

९७ व्या घटना दुरुस्तीनुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७३ अअअ, ७३ब व ७३क दुरुस्ती करण्यात आलेली आहे.

त्यानुसार कलम ७३ अअअ नुसार समितीच्या सदस्यांची **कमाल संख्या एकवीसपेक्षा अधिक असणार नाही,** अशी तरतुद करण्यात आलेली आहे.

तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७३ ब मध्ये खालीलप्रमाणे तरतुद करण्यात आलेली आहे.

**७३ ब. संस्थेच्या समित्यांवर सदस्यांसाठी जागा राखून ठेवणे व त्यासाठी निवडणुक घेणे.**

(१) या अधिनियमात किंवा त्याखाली केलेल्या नियमांत किंवा कोणत्याही संस्थेच्या कोणत्याही उपविधी काहीही अंतर्भूत असले तरी, राज्यशासन, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे निदेश देईल, अशा संस्थेच्या किंवा संस्थांच्या वर्गाच्या समितीवर पुढीलप्रमाणे तीन जागा राखून ठेवण्यात येतील

(अ) अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती यांमधील सदस्यांसाठी एक

(अ-१) इतर मागासवर्गातील एक सदस्य आणि,

(अ-२) विमुक्त जाती, भटक्या जमाती किंवा विशेष मागासवर्गीय यांच्यामधील एक सदस्य

(३) यथास्थिती, अनुसूचित जातीच्या किंवा अनुसूचित जमातीच्या किंवा इतर मागासवर्गीय किंवा विमुक्त जाती किंवा भटक्या जमाती किंवा विशेष मागासवर्गीय मधील संस्थेचा कोणताही व्यक्तीगत सदस्य किंवा सदस्य संस्थेच्या समितीच्या कोणताही निर्वाचित सदस्य किंवा सदस्य संस्थेच्या समितीचा कोणताही सदस्य मग तो या कलमान्वये निवडण्यात, स्वीकृत करण्यात किंवा नियुक्त करण्यात आलेला असो राखीव जागेसाठी होणारी निवडणुक लढविण्यास पात्र असेल आणि

समीतीच्या निवडणुकीत मत देण्याचा हक्क असलेल्या प्रत्येक व्यक्तीस अशा कोणत्याही राखीव जागेसाठी निवडणुकीत मत देण्याचा हक्क असेल.

(४) तीन राखीव जागांपैकी कोणत्याही जागेवर कोणत्याही व्यक्तीची निवड न झाल्यास अशी किंवा अशा राखीव जागा, पोट-कलम (३) अन्वये निवडणुक लढविण्याचा हक्क असलेल्या व्यक्तींमधुन नामनिर्देशाद्वारे, भरण्यात येतील.

**७३ क. महिलांकरिता जागा राखून ठेवणे.**

(१) हा अधिनियम, किंवा त्याखाली केलेले नियम यांमध्ये, किंवा कोणत्याही संस्थेच्या उपविधींमध्ये काहीही अंतर्भुत असले तरी, प्रत्येक संस्थेच्या समितीवर महिला सदस्यांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी सदस्य म्हणून व्यक्तींचा अंतर्भाव असणाऱ्या प्रत्येक संस्थेच्या समितीवर महिलांकरिता दोन जागा राखून ठेवण्यात येतील.

(२) संस्थेची कोणतीही महिला सदस्य किंवा सदस्य संस्थेच्या समितीची कोणतीही महिला सदस्य, मग ती निवडून आलेली, स्वीकृत केलेली किंवा नामनिर्दिष्ट केलेली असो, पोट-कलम (१) अन्वये, राखून ठेवण्यात आलेल्या जागेकरता निवडणूक लढवण्यास पात्र असेल.

(३) अशा राखून ठेवण्यात आलेल्या जागांकरिता कोणतीही महिला सदस्य किंवा, यथास्थिती कोणत्याही महिला सदस्य निवडून आलेल्या नसतील त्याबाबतीत, अशी जागा किंवा अशा जागा, पोट कलम (२) अन्वये निवडणुक लढवण्यासाठी पात्र असलेल्या महिला सदस्यामधुन स्वीकृत करुन घेऊन भरण्यात येतील.

(४) केवळ महिला सदस्य असणाऱ्या संस्थेच्या समितीला या कलमातील कोणतीहि गोष्ट लागु होणार नाही.

उपरोक्त ९७व्या घटनादुरुस्तीनुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७३अअअ, ब, क यात तरतुद करण्यात आलेली आलेली आहे.

**तसेच महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक २८मार्च २०२२ प्रसिध्द केल्यानुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० कलम ७३ अअअ मधील पोटकलम १ यांत सुधारणा करण्यात आलेली असुन अपवादात्मक परिस्थितीत, निबंधकास, राज्य शासनाच्या पुर्व मान्यतेने, समितीच्या सदस्यांची संख्या पंचवीस पर्यंत वाढवता येईल, अशी तरतुद करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे सहनिबंधक, सहकारी संस्था, (आ.वि.), महाराष्ट्र राज्य, नाशिक यांचे दि.१८/०८/२०२२ रोजीचे पत्रान्वये सदरील बाबीची माहीती करुन दिलेली आहे. तसेच सदरील दुरुस्तीनसार महामंडळाच्या संचालक मंडळ सदस्यांची संख्या २५ ही गृहीत धरुन या संख्येमध्ये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७३ब आणि क नुसार राखीव जागांची तरतुद करुन सुधारीत उपविधी दुरुस्तीचा प्रस्ताव निबंधकाकडे सादर करणे आवश्यक असलेबाबत कळविलेले आहे.**

येणेप्रमाणे सदरील तरतुदींस अनुसरुन महामंडळाचे उपविधीत बदल करुन त्याप्रमाणे संचालक मंडळाच्या निवडणुका घेणे आवश्यक व गरजेचे आहे.

महाराष्ट्र राज्य सहकारी अधिनियम १९६० मधील तरतुदी नुसार महामंडळाचे उपविधीमध्ये संचालक मंडळाचे संरचनेत दुरुस्ती करुन राखीव जागांबाबत करावयाची तरतुद खालीलप्रमाणे:

| अ.क्र. | तपशिल | संख्या |
|---|---|---|
| १. | महिला आरक्षण | २ |
| २. | इतर मागास वर्गीय | १ |
| ३. | अनुसूचित जाती किंवा जमाती | १ |
| ४. | विमुक्त जाती, भटक्या जमाती किंवा विशेष मागासवर्गीय यांच्यामधील एक सदस्य | १ |

९७ व्या घटनादुरुस्तीनुसार २५ निर्वाचित सदस्य वगळता २ कार्यलक्षी संचालक (कर्मचारी प्रतिनिधी व व्यवस्थापकीय संचालक), २ तज्ञ संचालक (योजनांना अनुसरुन) व २ संचालक हे शासनाचे भाग भांडवल असेल अशा संस्थांचे अधिकारी (भारत सरकार व महाराष्ट्र शासनाचे प्रत्येकी एक) हे संचालक असतील.

उपरोक्त नमुद घटनादुरुस्ती, शासन निर्णय व महामंडळाचे पोटनियम लक्षात घेता, सुयोग्य संरचना प्रस्तावित करावी ज्यात खालील बाबींचा उल्लेख असावा.

| | | |
|---|---|---|
| १) | पोटनियम क्रमांक २३ नुसार महामंडळाचे मा.अध्यक्ष व मा.उपाध्यक्ष हे शासन नियुक्त असतील. * | २ |
| २) | संलग्न संस्थांनी निवडुन द्यावयाच्या एकुण-१८ संचालकांची संख्या जिल्हावार खालील दर्शविल्याप्रमाणे असेल, मात्र अशाप्रकारे निवडुन द्यावयाचे संचालक हे आदिवासीच राहतील... | १८ |
| २) | राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातून महामंडळाच्या सभासद संलग्न संस्थांनी निवडावयाच्या महिला राखीव संचालिका. | ०२ |
| ३) | राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातून महामंडळाच्या सभासद संलग्न संस्थांनी निवडावयाच्या इतर मागासवर्गा मधील एक सदस्य | ०१ |
| ४) | राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातून महामंडळाच्या सभासद संलग्न संस्थांनी निवडावयाच्या विमुक्त जाती, भटक्या जमाती किंवा विशेष मागासवर्गीय यांच्यामधील एक सदस्य | ०१ |
| ५) | राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातून महामंडळाच्या सभासद संलग्न संस्थांनी निवडावयाच्या अनुसूचित जाती किंवा जमाती मधील एक सदस्य | ०१ |

उपरोक्त नमुद अध्यक्ष व उपाध्यक्ष तसेच निवडुन देण्याचे सदस्य वगळता समितीत २ कार्यलक्षी संचालक (कर्मचारी प्रतिनिधी व व्यवस्थापकीय संचालक), २ तज्ञ संचालक (योजनांना अनुसरुन) व २ संचालक हे शासनाचे भाग भांडवल असेल अशा संस्थांचे अधिकारी (भारत सरकार व महाराष्ट्र शासनाचे प्रत्येकी एक) हे संचालक असतील. अध्यक्ष उपाध्यक्ष व निर्वाचित सदस्य वगळता समितीत असलेल्या सदस्यांना संचालक मंडळाच्या सभेमध्ये भाग घेण्याचा अधिकार राहील. मात्र सदरील सदसयांना संचालक मंडळाच्या सभेत मतदान करण्याचा अधिकार असणार नाही.

| | | |
|---|---|---|
| १) | कर्मचाऱ्यांचे दोन प्रतिनिधींपैकी किमान एक मान्यताप्राप्त संघटनेचा असावा. | ०२ |
| २) | तज्ञ संचलांपैकी एक मा.प्रधान सचिव, अन्न व नागरी पुवरठा विभाग, मंत्रालय, मुंबई आणि एक मा.मुख्याधिकारी, भारतीय जनजाती सहकारी विपणन विकास परिसंघ | ०२ |
| ३) | शासनाचे भाग भांडवल असेल अशा संस्थांचे अधिकारी पैकी भारत सरकार व महाराष्ट्र शासनाचे प्रत्येकी एक | ०२ |
| ४) | व्यवस्थापकीय संचालक, पदसिध्द सदस्य सचिव किंवा त्यांचेकरिता व त्यांचेवतीने उप व्यवस्थापकीय संचालक. | ०१ |

संचालक मंडळ सभेची संरचना खालीलप्रमाणे क्षेत्रनिहाय प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | क्षेत्र | प्रादेशिक कार्यालयाचे नाव | जोडलेल्या एकुण संस्था | प्रस्तावित संचालक | प्रती संचालक मतदार संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | पालघर | जव्हार | ८६ | ३ | ६४ |
| | ठाणे | जव्हार | ३१ | | |
| | रायगड | जव्हार | १० | | |
| | | **एकुण संस्था संख्या** | **१२७** | | |
| २ | नाशिक | नाशिक | १६५ | ३ | ८२.५ |
| | | **एकुण संस्था संख्या** | **१६५** | | |
| ३ | पुणे | जुन्नर | २५ | १ | ६४ |
| | अहमदनगर | जुन्नर | ३९ | | |
| | | **एकुण संस्था संख्या** | **६४** | | |
| ४ | नंदुरबार | नंदुरबार | १४४ | ३ | ७२ |
| | | **एकुण संस्था संख्या** | **१४४** | | |
| ५ | धुळे | नंदुरबार | ३९ | १ | ७९ |
| | जळगाव | नंदुरबार | ७ | | |
| | अमरावती | धारणी | ३३ | | |
| | | **एकुण संस्था संख्या** | **७९** | ० | |
| ६ | नांदेड | यवतमाळ | २४ | ३ | ६४ |
| | यवतमाळ | यवतमाळ | ९१ | | |
| | वर्धा | भंडारा | २ | | |
| | नागपुर | भंडारा | ११ | | |
| | | **एकुण संस्था संख्या** | **१२८** | ० | |
| ७ | गोंदिया | भंडारा | ४१ | १ | ६७ |
| | गडचिरोली (कोरची) | गडचिरोली | ९ | | |
| | गडचिरोली (कुरखेडा) | गडचिरोली | १७ | | |
| | | **एकुण संस्था संख्या** | **६७** | ० | |
| ८ | चंद्रपुर | चंद्रपुर | ६३ | १ | ६३ |
| | | **एकुण संस्था संख्या** | **६३** | ० | |
| ९ | गडचिरोली | गडचिरोली | ९१ | २ | ४५ |
| | | **एकुण संस्था संख्या** | **९१** | ० | |
| | **एकुण** | | **९२८** | **१८** | |

कलम ७३ ब आणि क मधील तरतुदीनुसार राखीव जागांचा तपशिल खालीलप्रमाणे

| अ.क्र. | तपशिल | संख्या |
|---|---|---|
| १. | महिला राखीव | २ |
| २. | इतर मागास वर्गीय | १ |
| ३. | अनुसूचित जाती किंवा जमाती | १ |
| ४. | विमुक्त जाती, भटक्या जमाती किंवा विशेष मागासवर्गीय यांच्यामधील एक सदस्य | १ |

सदर चर्चेत भाग घेतांना मा. दुधनाग सो. संचालक यांनी सदरचा विषय न्याय प्रविष्ट असल्याने सदर विषय लवकरात लवकर निकाली काढण्यासाठी मा. उच्च न्यायालयात प्रयत्न करावेत. यावर मा. अध्यक्ष महोदय यांनी निर्देश दिले की, या विषयावर मा. मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री यांचेशी चर्चा करुन मागील संरचनेप्रमाणेच सदस्य निश्चित करणेबाबत सहकार विभागाचे मार्गदर्शन घेऊन निर्णय घेण्यात येईल. तसेच सदरचा विषय मा. न्यायालयाकडुन निकाली काढणेसाठी पाठपुरावा करावा.

**ठराव क्रमांक १९** : या विषयावर मागील संरचनेप्रमाणेच सदस्य निश्चित करणेबाबत सहकार विभागाचे मार्गदर्शन घेऊन निर्णय घ्यावा व मा.न्यायालयाकडुन सदरचा विषय तातडीने निकाली काढणेसाठी प्रयत्न करावे व सदरचा विषय पुढील संचालक मंडळ सभेत ठेवण्यात यावा.

सुचक :- मा.श्री. सुनिल भुसारा, संचालक
अनुमोदक :- मा.श्री. भरतसिंग थुकेलसिंग दुधनाग, संचालक.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक २० : महामंडळाचे कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना व्यवस्थापकीय संचालक यांनी दिलेल्या निकलाविरुध्द अपिलाची मुदत निश्चित करण्यासाठी सेवानियमात तरतुद करणे.**

महामंडळातील अधिकारी/कर्मचारी यांना महामंडळाचे सेवानियम ७९ ड मधील तरतुदीनुसार मा.व्यवस्थापकीय संचालक यांचे आदेशानुसार मा.संचालक मंडळाकडे अपिल दाखल करणेबाबत तरतुद आहे.तथापी सदर सेवा नियमात सदरचे अपिल किती दिवसात सादर करावे याचा उल्लेख नाही.

महाराष्ट नागरी सेवा (शिस्त व अपील) १९७९ (नियम १९) मधील तरतुदी नुसार सदरचे अपिल सक्षम प्राधिकाऱ्यांच्या आदेशा विरोधात ४५ दिवसात अपिल करणेबाबत तरतुद आहे. तरी वरीलप्रमाणे तरतुद सेवानियमात करणे आवश्यक आहे.

उपरोक्त विषयाचे महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी सविस्तर वाचन करुन सदर विषय मंजूरी करीता सभेपुढे सादर केला. सदर विषयावर सविस्तर चर्चा होवून खालीलप्रमाणे ठराव बहुमताने मंजूर करण्यात आला.

**ठराव क्रमांक २०** : उपरोक्त नमुद विषयाबाबत सांगोपांग चर्चा झाली. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) १९७९ (नियम १९) मधील तरतुदी प्रमाणेच व्यवस्थापकीय संचालक यांच्या आदेशा विरोधात ४५ दिवसात मा.संचालक मंडळासमोर अपिल करणेसाठी सेवानियमात तरतुद करणेबाबत शासनास प्रस्ताव पाठविणेस मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक** :- मा.श्री. सुनिल भुसारा, संचालक
**अनुमोदक** :- मा.श्री. भरतसिंग थुकेलसिंग दुधनाग, संचालक.

ठराव सर्वानुमते मंजूर.

**विषय क्रमांक २१ : कोर्ट केसेस साठी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणे.**

महामंडळाचे मुख्य कार्यालय व प्रादेशिक कार्यालयाअंतर्गत विविध न्यायाधिकरणात यापुर्वी दाखल असलेल्या व सुरु असलेल्या केसेस चालविण्यासाठी तसेच, कोर्टकेसच्या अनुषंगाने माहे मार्च २०२१ नंतर खालीलप्रमाणे वकील फी व इतर अनुषांगीक झालेला एकुण खर्च रक्कम रु.१६,६२,२९१/- मात्र (अक्षरी रक्कम रु.सोळा लाख बासष्ट हजार दोनशे एक्यान्नव मात्र) इतक्या खर्चासाठी मान्यता मिळणेबाबत. तसेच, पुढील एक वर्षाच्या कालावधीसाठी अंदाजे २५ लाख रुपयांची तरतुद करणेबाबत.

उपरोक्त विषयान्वये, महामंडळचे विविध प्रादेशिक कार्यालय स्तरावर विविध न्यायालयात महामंडळाविरोधात दावे दाखल केलेले आहेत. सदर दावे चालविणेसाठी वकील फी व त्याकरीता येणारे इतर अनुषांगिक खर्च यांसाठी आवश्यकतेनुसार (किंवा वकीलांच्या मागणीनुसार) हा प्रादेशिक कार्यालयांना निधी देण्यात येतो.

करीता मार्च - २०२१ पासुन आजतागायत यासाठी खालीलप्रमाणे खर्च झालेला आहे.

- वकील फी व न्यायालयील इतर अनुषांगिक खर्चासाठी वकीलांना अदा करण्यात आलेली रक्कम रु.९,७०,९००/- मात्र
- विधी सल्लागार नियुक्तीसाठी झालेला खर्च रक्कम रु.-३१,३९१/-
- ॲड.विशाल महाले (विधी सल्लागार) यांचे मानधन रक्कम रु.६,६०,०००/-
- **एकुण झालेला खर्च रक्कम रु.-१६,६२,२९१/-**

करीता महामंडळाचे मुख्य कार्यालय व प्रादेशिक कार्यालयाअंतर्गत विविध न्यायाधिकरणात दाखल असलेल्या केसेस चालविण्यासाठी उपरोक्त प्रमाणे वकील फी व इतर अनुषांगिक झालेला खर्चासाठी कार्योत्तर मंजुरी मिळावी.

तसेच, प्रादेशिक कार्यालय, नाशिक अंतर्गत ४६ रोजंदारी कर्मचाऱ्यांनी मा.औद्योगिक न्यायालय, नाशिक येथे महामंडळाविरोधात दावे दाखल केलेले असुन, सदर दाव्यांसाठी ॲड.कुलकर्णी यांची नियुक्ती केलेली असुन त्यांनी प्रत्येक दाव्यानिहाय २७,०००/- मात्र (वकील फी २०,०००/- व इतर अनुषांगिक खर्च ७,०००/- अशी एकुण २७,०००/- प्रति दावा) अशा प्रकारे ४६ दाव्यांसाठी १२,४२,०००/- मात्र फी साठी प्रस्ताव सादर केलेला असुन, उपरोक्त संभाव्य वकील फी साठी मान्यता मिळणेस विनंती.

शासनाने प्रादेशिक कार्यालय, नंदुरबार अंतर्गतचे ६ रोजंदारी कर्मचाऱ्यांबाबत मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे दावे दाखल केलेले असुन, सदर दाव्यांमध्ये महामंडळालाही प्रतिवादी केलेले आहेत.

सदर दावे महामंडळाच्या वतीने चालविणेसाठी ॲड.आडसुरे यांची नियुक्ती करण्यात आलेली असुन, त्यांनी ८७,०००/- मात्र (वकील फी ७५,०००/- व इतर अनुषांगिक खर्च १२,०००/- अशी एकुण ८७,०००/- प्रति दावा) अशा प्रकारे ६ दाव्यांसाठी रक्कम रु.५,२२,०००/- चा प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर वकील फी बाबत वाटाघाटी करणेसाठी प्रस्तावित आहे. करीता, उपरोक्त संभाव्य वकील फी साठी मान्यता मिळणेस विनंती.

तसेच, पुढील एक वर्षाच्या कालावधीसाठी अंदाजे २५ लाख रुपयांची तरतुद या कामासाठी ठेवावी, ही विनंती.

उपरोक्त विषयाचे महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी सविस्तर वाचन करुन सदर विषय मंजूरी करीता सभेपुढे सादर केला. सदर विषयावरी सविस्तर चर्चा होवून खालीलप्रमाणे ठराव बहुमताने मंजूर करण्यात आला.

**ठराव क्रमांक २१ :** मागील कोर्टकेसेससाठी झालेल्या खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यात येत आहे. तसेच, ॲड.आडसुरे यांची वकील फी जास्त असल्याने वाटाघाटी करावी व त्यानुसार मा.अध्यक्ष यांचेकडे प्रस्ताव सादर करावा. तसेच, यासाठी मा.उच्च

न्यायालय, मुंबई, नागपुर व औरंगाबाद व क्षेत्रिय कार्यालयस्तरावर वकीलांचे पॅनल तयार करण्यासाठीची कार्यवाही करावी; असा ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

सुचक :- मा.श्री. भरतसिंग थुकेलसिंग दुधनाग, संचालक.
अनुमोदक :- मा.श्री. सुनिल भुसारा, संचालक

ठराव सर्वानुमते मंजूर.

**विषय क्रमांक २२.** **१. श्री.शरद लांडगे, कनिष्ठ सहाय्यक (बडतर्फ), २. श्री.व्ही.एस.कोलेकर, तत्का. विजतंत्री (सेवानिवृत्त), प्रादेशिक कार्यालय, नाशिक, ३. श्री.एन.एस.मांदळे, तत्का.प्रादेशिक व्यवस्थापक, प्रादेशिक कार्यालय, नाशिक, ४. श्री.पी.आर. वाघमारे, तत्का. प्रादेशिक व्यवस्थापक,जव्हार/ धारणी (सेवानिवृत्त), ५. श्री.विवेक नावरकर, तत्का.गोदामपाल (बडतर्फ), प्रादेशिक कार्यालय, नाशिक यांना दिलेल्या शिक्षेविरोधातील दाखल केलेल्या अपिलाबाबत...**

उपरोक्त विषयान्वये, महामंडळातील खालीलप्रमाणे अधिकारी / कर्मचारी यांचेबाबतीत मा.न्या.गायकवाड समिती, चौकशी अहवालाच्या अनुषंगाने व इतर प्रकरणांबाबत विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली होती. सदर विभागीय चौकशी अहवालाच्या अनुषंगाने शिक्षा प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

महामंडळातील अधिकारी / कर्मचारी यांना महामंडळाचे सेवानियम ७९ (ड) मधील तरतुदीनुसार मा.व्यवस्थापकीय संचालक यांचे आदेशाविरोधात मा.संचालक मंडळाकडे अपिल दाखल करता येईल, अशी तरतुद आहे.

सबब खालीलप्रमाणे अधिकारी / कर्मचारी यांनी मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी त्यांना दिलेल्या शिक्षेच्या आदेशाविरुध्द अपिल दाखल केलेले आहे. करीता, निर्णयास्तव सादर...

| अ. क्र. | अधिकारी / कर्मचाऱ्याचे नाव | पद | तपशिल | पारित आदेश | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री.शरद अ. लांडगे | कनिष्ठ सहाय्यक | कार्यालयास अनधिकृतपणे / विनापरवानगी गैरहजर रहाणे | महामंडळाच्या सेवेतुन बडतर्फ करण्यात आले आहे. | (Abscond) |
| २. | श्री. व्ही. एस. कोलेकर | तत्का. विजतंत्री, प्रादेशिक कार्यालय, नाशिक | मा.न्या.गायकवाड समिती अहवालाच्या अनुषंगाने करण्यात आलेली विभागीय चौकशी | महामंडळाच्या अपहाराची रक्कमरु.४,९६,८५,२९८/- ची वसुली | दि.३१/०५/२०२० रोजी सेवा निवृत्त |
| ३. | श्री. एन. एस. मांदळे | तत्का.प्रादेशिक व्यवस्थापक, प्रादेशिक कार्यालय, नाशिक | मा.न्या.गायकवाड समिती अहवालाच्या अनुषंगाने करण्यात आलेली विभागीय चौकशी | महामंडळाच्या अपहाराची रक्कम रु.२,८७,३८,८४९/- ची वसुली | दि.३१/१२/२०१६ रोजी सेवा निवृत्त |
| ४. | श्री. पी. आर. वाघमारे | तत्का.प्रादेशिक व्यवस्थापक, प्रादेशिक कार्यालय, जव्हार | मा.न्या.गायकवाड समिती अहवालाच्या अनुषंगाने करण्यात आलेली विभागीय चौकशी | महामंडळाच्या अपहाराची रक्कम रु.१,८८,०५६/- ची वसुली | दि.३०/१२/२०१४ रोजी सेवा निवृत्त |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५. | श्री. पी. आर. वाघमारे | तत्का.प्रादेशिक व्यवस्थापक, प्रादेशिक कार्यालय, धारणी | मा.न्या.गायकवाड समिती अहवालाच्या अनुषंगाने करण्यात आलेली विभागीय चौकशी | महामंडळाच्या अपहाराची रक्कम रु.२५,८४,६५/- ची वसुली | दि.३०/१२/२०१४ रोजी सेवा निवृत्त |
| ६. | श्री. विवेक नावरकर | तत्का. प्रतवारीकार, उपप्रादेशिक कार्यालय, सुरगाणा | सुरगाणा खरेदी केंद्र धान अफरातफर प्रकरण | बडतर्फ + महामंडळाच्या अपहाराची रक्कम रु. ४३,९६,६१५/- ची वसुली | बडतर्फ |

उपरोक्त विषयाचे महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी सविस्तर वाचन करुन सदर विषय मंजूरी करीता सभेपुढे सादर केला. सदर विषयावर चर्चा करतांना मा. अध्यक्ष महोदयांनी व्यवस्थापकीय संचालक यांचे पारित आदेशाविरोधात अपिल करणारे अधिकारी/कर्मचारी यांचे अपिल अर्जावर सुनावणी घेणेकामी पोटनियम क्रमांक २९ प्रमाणे कर्मचारी समिती गठित करावी. त्यामध्ये महिला संचालक म्हणुन मा.श्रीमती मिनाक्षी वट्टी यांचेसह ३ संचालक प्रतिनिधी नेमण्यात यावेत असे सुचित केले. सदर समितीवर मा.संचालक यांचे नाव निश्चितीचे अधिकार मा.अध्यक्ष महोदय यांना देण्यात येत आहे. सदर समितीने पुढील संचालक मंडळासमोर अभिप्रायासह अंतिम निर्णयासाठी प्रकरणे सादर करावे. सदर विषयावर सविस्तर चर्चा होवून खालीलप्रमाणे ठराव बहुमताने मंजूर करण्यात आला.

**ठराव क्रमांक २२** : उपरोक्त विषयासाठी मा.श्रीमती मिनाक्षी वट्टी, संचालक यांचेसह इतर ३ संचालकांची कर्मचारी सामिती गठीत करणेबाबत ठरले. पोटनियम क्रमांक २९ प्रमाणे संचालक सदस्य नेमणुकीसाठी मा. अध्यक्ष महोदय यांचे मान्यतेनुसार समिती गठीत करणेस सदरची सभा मंजुरी देत आहे. सदर समितीने अपिलासाठी येणाऱ्या प्रकरणांची सुनावणी घेवुन प्रकरण अंतिम निर्णयासाठी मा. संचालक मंडळासमोर सादर करणेस ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक** :- मा.मिनाक्षी वट्टी, संचालक
**अनुमोदक** :- मा.श्री. अशोक भाऊराव मंगाम, संचालक.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक २३ : म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळामार्फत गडचिरोली जिल्ह्यात ७ गोदामे बांधकामाबाबत सद्यस्थिती.**

मा.जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचेकडुन गडचिरोली जिल्ह्यामध्ये गोदाम बांधकामासाठी ७ ठिकाणी जागा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. सदर जागेचे सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) मंडळ, नागपूर यांनी ७ गोदामे बांधकामाचे अंदाजपत्रक तयार करुन निविदा प्रक्रीया पुर्ण केलेली आहे.

निविदा क्रमांक ७३३३ जुलै, २०१९ मध्ये पुर्ण केलेली आहे. निविदेत ठेवलेल्या अंदाजपत्रकीय रक्कम रु.२४,८५,१८,७११/- च्या तुलनेत देकार ५.०६% कमी दराची असल्याने निविदा रक्कम २३,६३,६८,८६०.४३/- ची प्राप्त निविदा सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन स्विकृत करण्यांत आलेली आहे. निविदेनुसार ७ गोदामांची सद्यस्थिती खालील प्रमाणे आहे.

**( रुपये लाखात )**

| अ.नं. | गडचिरोली जिल्ह्यात बांधकामाची ठिकाणे | तालुका | मंत्रालय स्तरावरुन प्रशासकीय मान्यता | निविदेमध्ये प्राप्त किंमत | अद्यावत एकुण खर्च | कार्य. अभियंता चंद्रपुर यांची मागणी | बांधकामाची सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | सोनसरी | कुरखेडा | ५०७.५१ | ३४५.०७ | २८६.०८ | ७८.३५ | विद्युतीककरणाचे काम प्रगतीपथावर इमारत पुर्ण |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | अरततोंडी (k) | कुरखेडा | ५०८.०३ | ३४३.६७ | २५३.७५ | १६७.१० | विद्युतीककरणाचे काम प्रगतीपथावर इमारत महामंडळाकडे हस्तांतर व वापर सुरु |
| ३ | रेगडी | चामोर्शी | ५०७.७७ | ३४६.६९ | २०८.८९ | १६४.१० | विद्युतीककरणाचे काम प्रगतीपथावर इमारत महामंडळाकडे हस्तांतर व वापर सुरु |
| ४ | सिरोंचा | सिरोंचा | ५०७.८४ | ३१७.४१ | १३१.८२ | १९५.१० | गोदामाचे काम पुर्ण RCC Wall काम प्रगतीपथावर |
| ५ | गेवर्धा | कुरखेडा | ५०७.९० | ३४४.१४ | २४६.०९ | १३४.२५ | विद्युतीककरणाचे काम प्रगतीपथावर इमारत महामंडळाकडे हस्तांतर व वापर सुरु |
| ६ | पोटगांव | देसाईगंज | ५०८.१६ | ३४३.६७ | १३१.३७ | २५९.१० | विद्युतीककरणाचे काम प्रगतीपथावर इमारत महामंडळाकडे हस्तांतर व वापर सुरु |
| ७ | झिंगानुर | सिरोंचा | ५०७.६४ | ३२०.३३ | ०.०० | ०.०० | शासकीय आश्रमशाळा, झिंगानूर,ता.सिरोंचा जि. गडचिरोली येथील जागा प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु |
| | **एकुण** | | **३५५४.८५** | **२३६०.९८** | **१२५८.००** | **९९८.००** | |

सद्यस्थितीत उपरोक्त तक्त्यामध्ये अ.क्र. १ ते ६ येथील गोदाम प्रक्रीया हाती घेण्यात आलेली असुन सर्व बांधकामे अंतिम टप्प्यात आहेत. सदर बांधकामासाठी शासनाकडुन अद्याप निधी प्राप्त झालेला नसुन शासनाकडुन निधी प्राप्त होईपर्यंत सा.बां. विभाग यांचे मागणीनुसार अखर्चित निधीपैकी रु. १२६०.०० लक्ष इतका निधी वर्ग करणेत आलेला आहे.

सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) यांचेकडुन मार्च, २०२२ मध्ये रुपये ५.०० कोटी निधीची मागणी केलेली होती. तथापी त्यांचेकडुन प्राप्त निधीचे उपयोगीता प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे निर्णय होऊ शकलेला नाही. सदर मागणीच्या अनुषंगाने ७ गोदामे बांधकाम संदर्भात सद्यस्थिती बाबत आढावा घेण्यासाठी दिनांक २०.०६.२०२२ रोजी मुख्य कार्यालय, नाशिक येथे आढावा बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनुसार सा.बां. विभागास वितरीत केलेल्या निधी रुपये १२६०.०० लक्ष मधुन गोदामनिहाय झालेला खर्च व पुढे होणारा अपेक्षित खर्च याची माहीती सादर करणेस कळविणेत आले होते. त्यानुसार बांधकाम विभाग यांचेकडुन रुपये १२६०.०० लक्ष चे उपयोगीता प्रमाणपत्र सादर केलेले आहे.

तद्नंतर सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग, चंद्रपुर यांनी दिनांक २३.०६.२०२२ चे पत्रान्वये रु. १०००.०० लक्षची मागणी केलेली आहे.

तसेच झिंगानुर ता. सिरोंचा, जि. गडचिरोली येथील आश्रमशाळेच्या ताब्यात असलेली आदिवासी विकास विभागाची जागेपैकी १ एकर जागा महामंडळास हस्तांतरीत करणेचा उप प्रादेशिक कार्यालय, अहेरी यांचेकडील मा. प्रकल्प अधिकारी, अहेरी यांना सादर केलेला प्रस्ताव मा. अपर आयुक्त, नागपुर यांचे मार्फत मा.आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचेकडे सादर करण्यांत आलेला आहे. त्यावर मा. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचे दिनांक २४.०६.२०२२ चे पत्रान्वये कळविले आहे की, सदर जमिनीपेकी (७४.०० x ५५.०० = ४०७० वर्ग मी.) १ एकर जागा उपलब्ध करुन देणे बाबत कळविले आहे. तथापी सदर जागेच्या मोबदल्यात महामंडळामार्फत सिडको, नाशिक येथे सुरु असलेल्या मुलींचे वसतीगृह असलेली इमारत सदर १ एकर जागेच्या बदल्यात देणेत यावी असे कळविले आहे.

वास्तविक पहाता सदर जागेवर बांधकामाची परवानगी व त्यासाठी लागणारे शुल्क, तांत्रिक सल्लागार नेमणुक, निविदा प्रक्रीया इत्यादी सर्व कामे महामंडळामार्फत केलेली आहे. तसेच सदर वसतीगृहाची इमारत बांधकामासाठी जवळपास रुपये ५.०० कोटी खर्च झालेला असुन अद्यापी जवळपास रु. २.५० कोटी इतका खर्च बाकी आहे. तसेच फर्निचरसाठी देखिल जवळपास रुपये २.०० ते ३.०० कोटी खर्च अपेक्षित आहे. म्हणजेच

सदर इमारतीची बांधकाम पुर्ण झालेवर जागेची किंमत वगळुन जवळपास रुपये १०.०० कोटी पर्यंत खर्च जाणार आहे. तसेच सदरचे वसतीगृह भाड्याने घेणेबाबत मा. आयुक्त कार्यालय, आदिवासी विकास, नाशिक तसेच अपर आयुक्त कार्यालय, नाशिक यांनी महामंडळास यापुर्वीच कळविलेले आहे. त्यामुळे गडचिरोली जिल्ह्यातील झिंगानूर सारख्या ग्रामीण भागात देत असलेल्या जागेचे मुल्यांकन केले तर हे व्यवहारीक दृष्ट्या योग्य होणार नाही असे कार्यालयाचे मत आहे. त्यामुळे सदरची जागा महामंडळास हस्तांतरीत करणेसाठी शासन स्तरावरुन पाठपुरावा करणे गरजेचे आहे. त्यासाठी मुल्यांकनानुसार होणारे शासकीय शुल्क नुसार जर सदरची जागा महामंडळास हस्तांतरीत होत असेल तर तेथे गोदाम बांधकाम करणे महामंडळाचे दृष्टीने हितावह ठरेल.

उपरोक्त नमुद ७ गोदामासाठी शासनाकडुन अद्याप निधी प्राप्त झालेला नाही. सदर कामांसाठी भाग भांडवलातुन निधी मागणीसाठी मुख्यालयाचे जा.क्र. २२५१ दिनांक २८.१०.२०२१ व जा.क्र. २३७३ दिनांक ११.११.२०२१ अन्वये शासनास प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.

नसल्याने महामंडळाकडील अखर्चित निधीमधुन अद्यापपर्यंत रुपये १२६०.०० लक्ष इतका निधी विभागीय कार्यालय, नागपुर यांचेमार्फत सां.बा. विभाग, चंद्रपुर यांना वर्ग केलेली आहे. आज अखेर महामंडळाकडे विविध बांधकामासाठी भाग भांडवलापोटी प्राप्त रक्कमेतुन रुपये १८८४.४६ लक्ष इतका निधी शिल्लक आहे.

गडचिरोली जिल्ह्यात ७ गोदामे बांधकामासाठी केलेल्या कार्यवाहीस मान्यता तसेच सा.बां. विभाग यांचे मागणीप्रमाणे निधी वर्ग करणे बाबत सदरचा विषय मा. संचालक मंडळापुढे सादर करणेत येत आहे.

सदर विषयावर चर्चा करतांना मा. अध्यक्ष महोदय यांनी सुचना केली की, गोदाम बांधकामे वेळेत पुर्ण करुन घ्यावीत. मात्र पुर्ण बांधकाम झालेली गोदामांचा पावसाळा कालावधी पुर्ण झाल्यानंतरच ताबा घेण्यात यावा. जेणे करुन जर गोदामात पावसाळ्यात पाणी येते किंवा कसे याबाबत खात्री करता येईल. तसेच गोदामांचा ताबा घेतांना सदर गोदामांची डागडुजी व इतर झालेले नुकसान हे ५ वर्षापर्यंत बांधकाम ठेकेदाराकडुनच करणे बंधनकारक करावे. बांधकामासाठी ठेकेदाराने जमा केलेली सुरक्षा अनामत रक्कम ५ वर्षापर्यंत महामंडळाकडे जमा करुन घ्यावी आवश्यकता वाटल्यास सदर रक्कमेत वाढ करण्यांत यावी. तसेच मा. अध्यक्ष महोदय हे ऑक्टोबर, २०२२ मध्ये गडचिरोली जिल्ह्यात बांधकाम होत असलेल्या गोदामांना प्रत्यक्ष भेट देऊन आढावा घेणार असल्याबाबत सांगीतले. वरील प्रमाणे सविस्तर चर्चा होऊन खालील प्रमाणे ठराव करण्यांत आला.

**ठराव क्रमांक २३ :** गडचिरोली जिल्ह्यात सुरु असलेले गोदाम बांधकामासाठी झालेल्या कार्यवाहीस ही सभा मंजुरी देत आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) यांचे निधी मागणीवर झालेल्या कामाची गुणवत्ता पाहुन व तांत्रिक मान्यता व उपलब्ध निधी यांच्या अनुषंगाने पुढील निधी वितरणासाठी ही सभा मंजुरी देत आहे. यापुढे गोदामांचा ताबा घेतांना ठेकेदाराकडुन गोदामाची दुरुस्ती जबाबदारी ५ वर्षापर्यंत ठेकेदाराची असल्याबाबत बंधनकारक करावे व या कालावधीपर्यंत ठेकेदाराची सुरक्षा अनामत रक्कम महामंडळाकडे जमा ठेण्याबाबत निविदा काढतांना तरतुद करावी.

**सुचक** :- मा.श्री. प्रकाश तुळशिराम दडमल, संचालक
**अनुमोदक** :- मा.श्री. अशोक भाऊराव मंगाम, संचालक.
**ठराव सर्वानुमते मंजूर.**

विषय क्रमांक २४ : महामंडळाचे मालकीचे जुने सिडको, नाशिक योजना क्र. २ मधील भुखंड क्र. P.K. ९ येथे ३७ ते ४६ मधील सुरु असलेल्या मुलींचे वसतीगृह बांधकामा बाबत.

म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळाचे जुने सिडको, शिवाजी चौक, नाशिक येथील महामंडळाच्या जागेवर मुलींचे वसतीगृह बांधण्यासाठी मा. सहकार आयुक्त, पुणे यांचे मान्यतेनुसार महामंडळाचे इमारत निधीमधुन मुख्य कार्यालयाचे दि. २१ ऑगष्ट, २०१४ चे आदेशान्वये मे. कॉम्पॅक्ट बिल्डर्स, नाशिक यांना मुलींचे वसतीगृह इमारतीचे बांधकाम १२ महिन्यांचे आत पुर्ण करणेचे आदेश निर्गमित करण्यांत आलेले आहे.

संचालक मंडळ ठराव

दिनांक ३०.०८.२०१४ रोजीच्या संचालक मंडळ सभेमध्ये ठराव क्र. ४ पारित होवुन महामंडळाचे जुने सिडको, नाशिक येथील जागेवर मुलीचे वसतीगृह बांधण्यासाठी मे मगर जायभावे असोसिएट्स, आर्किटेक्ट, नाशिक यांचेकडुन मुलींचे वसतीगृह बांधकामाचे प्लॅन व अंदाजपत्रक तयार करुन घेवुन पुढील कार्यवाहीचे संपुर्ण अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांना प्रदान करण्यांत आलेले आहेत.

मुलींचे वसतीगृह बांधकामासाठी शासनाकडुन निधी प्राप्त नसल्याने महामंडळाचे राखिव निधीमधुन सदरचा खर्च भागविणेसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व सहकारी संस्था नियम-१९६१ मधील कलम-६६ नुसार पुर्व परवानगी मिळणे बाबत मुख्य कार्यालयाचे पत्र क्र. ६८१ दि. ०६.०६.२०१४ अन्वये मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, म.रा. पुणे यांना प्रस्ताव सादर केला होता. सदरच्या प्रस्तावानुसार मा. सहकार आयुक्त व निबंधक यांनी इमारत निधी व राखीव निधीतुन खर्च भागविणेसाठी परवानगी दिलेली आहे. मुख्य अभियंता, सा.बां.विभाग, नाशिक यांनी मुलींचे वसतीगृह बांधकामासाठी तांत्रिक सल्लागार यांनी तयार केलेल्या अंदाजपत्रकास रुपये ४,६७,३१,३००/- (सर्व खर्च समावेश करुन) इतक्या खर्चास तांत्रिक मंजुरी प्रदान केलेली आहे. महामंडळाने प्रसिध्द केलेल्या इ निविदेत मे. कॉम्पॅक्ट बिल्डर्स आणि डेव्हलपर्स लि., नाशिक यांनी १६% Above हा दर न्युनतम असल्याने त्यांचेशी दिनांक ०७.०६.२०१४ रोजी समिती समक्ष झालेल्या वाटाघाटी अंती ठेकेदारास रु ४,११,८०,७९२.०० या दराच्या १२.५% Above म्हणजेच ( निविदा रक्कम रु ४,११,८०,७९३.०० + १२.५०% Above रु ५१,४७,५९९.०० ) = ४,६३,२८,३९२.०० या रक्कमेमध्ये बांधकाम देण्याचे ठरले, त्यास ठेकेदाराने सहमती दर्शविल्याने बांधकाम ठेकेदार मे.कॉम्पॅक्ट बिल्डर्स आणि डेव्हलपर्स लि., नाशिक यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार १२.५०% Above दरास मान्यता देवुन मे. कॉम्पॅक्ट बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स, नाशिक यांना जा. क्र. १६८५ दि. २१ ऑगष्ट, २०१४ बांधकामाचे कार्यारंभ आदेश (Work Order ) देण्यात आलेला होता. सदर आदेशाप्रमाणे ठेकेदाराशी करारनामा करण्यांत आलेला असुन करारनाम्यातील मुद्दा क्रमांक-२ अन्वये संबंधित विभागाकडुन इमारत परवानगी प्राप्त झालेनंतर १२ महिने इतकी असेल असे नमुद आहे. नाशिक महानगर पालिका यांचेकडुन नाहरकत प्रमाणपत्र जावक दि. १२ मे, २०२१ अन्वये प्राप्त झालेले आहे. बांधकाम ठेकेदार यांनी दिनांक २७.०५.२०२१ च्या पत्रान्वये महामंडळाकडील आदेश क्र. १६८५ दि. २१.०८.२०१४ व केलेल्या करारनाम्यानुसार मागील दरानुसार व अटी/शर्तीनुसार काम करणेस तयार असल्याचे कळविले आहे. बांधकाम आदेशाचा कालावधी हा ५ वर्षापेक्षा अधिक झालेला असुन ठेकेदाराने आदेशामध्ये नमुद दरानुसार काम करणेस सहमती दर्शविल्यामुळे संचालक मंडळाचे निर्णयास अधिन राहुन बांधकाम ठेकेदार यांना मुख्यालयाचे आदेश क्रमांक ४४५ दिनांक २८ मे, २०२१ चे आदेशानुसार सदरहू काम करणेस २१.०८.२०१४ चे आदेशास व करारनाम्यातील अटी/शर्ती नुसार पुढील एक वर्षापर्यंत (दिनांक २७ मे, २०२२ पर्यंत) मुदतवाढ देण्यात आलेली आहे. बांधकाम ठेकेदाराने मुलींचे वसतीगृह बांधकाम मे, २०२१ मध्ये सुरु केले असुन आज अखेर एकुण ६ रनिंग बीलापोटी जीएसटीसह रु. ५,१२,२६,८५६.०० चे देयक अदा केलेले आहे.

आज अखेर बांधकाम ठेकेदारास खालील प्रमाणे देयके अदा केलेली आहेत.

| अ.क्र. | अदा करणेत | अदा करणेत आलेली | जी.एस.टी. वजा जाता कामाची |
|---|---|---|---|

| | आलेली देयक रुपये | जी.एस.टी. रक्कम रुपये | निव्वळ किंमत रुपये |
|---|---|---|---|
| कामाची निव्वळ मंजुर रक्कम रुपये | | | ४६३२८३९२.०० |
| १. | १२७८६६६.०० | १३६९९९.९५ | ११४१६६६.२१ |
| २. | ४९०९०७२.०० | ५३६५३७.८७ | ४४७११४८.९५ |
| ३. | १००२६५०८.०० | १०६३७०२.७९ | ८८६४१८९.८८ |
| ४. | ११६८०३८९.०० | १२५१४७०.२६ | १०४२८९१८.६६ |
| ५. | १२५०५१०४.०० | १३३९८३२.५५ | १११६५२७१.२८ |
| ६. | १०८२७११७.०० | १६५१५९४.०० | ९१७५५२३.०० |
| | **५१२२६८५६.००** | **५९८०१३७.४२** | **४५२४६७१७.९८** |

मुळ निविदेमध्ये एकाच इमारतीचा अंतर्भाव होता परंतु सुधारीत नकाशामध्ये १० इमारती प्रस्तावित असल्याने बांधकामाचे क्षेत्रफळ, फाउंडेशन, पेरीफेरी मध्ये वाढ झाल्याने उर्वरीत काम पुर्ण करणेकरीता बांधकाम ठेकेदार यांनी दिनांक १७.०६.२०२२ चे पत्रान्वये ६ महिन्याची मुदतवाढ मिळणेस विनंती केली आहे. तसेच आदेशात नमुद बांधकाम आदेशाच्या रक्कमेत रुपये २,५४,००,०००/- ( अक्षरी रुपये दोन कोटी चोपन्न लाख मात्र ) इतक्या रक्कमेची वाढ होणार असल्याचे महामंडळाच तांत्रिक सल्लागार मे मगर जायभावे, आर्किटेक्ट, नाशिक यांनी त्यांचकडील पत्र दिनांक ०४.०५.२०२२ अन्वये कळविले आहे. तसेच सदर वसतीगृह बांधकामामध्ये फर्निचर व इलेक्ट्रीक वस्तुंचा अंतर्भाव नसल्याने सदरचा खर्च वाढणार आहे. त्यासाठी तांत्रिक सल्लागार यांचेकडुन अतिरीक्त होणा-या खर्चाबाबत माहीती मागविली आहे.

सबब बांधकाम ठेकेदार यांचे विनंतीनुसार वसतीगृह बांधकामास माहे डिसेंबर, २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यास तसेच केलेल्या कार्यवाहीस मंजुरी मिळणेसह संभाव्य वाढीव खर्चासाठी मा.सहकार आयुक्त, पुणे यांचे परवानगीसाठी प्रस्ताव पाठविणेच्या मान्यतेस सदरचा विषय संचालक मंडळापुढे सादर करणेत येत आहे.

सदर चर्चेमध्ये भाग घेतांना मा. अध्यक्ष महोदय यांनी विचारणा केली की, वसतीगृह बांधकाम करणे हे काम महामंडळाचे नसुन देखिल हे बांधकाम महामंडळामार्फत का करणेत येत आहे. यावर मा.महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी स्पष्टीकरण दिले की, सदर बांधकामाचा विषय हा सन २०१३-२०१४ या वर्षातील आहे. त्यावेळेस सिडको, नाशिक येथे कर्मचा-यांसाठी असलेल्या महामंडळाच्या मालकीच्या सदनिकांची अत्यंत दुरावस्था झालेली असल्याने रिक्त होत्या. दिनांक ३० ऑगष्ट, २०१३ रोजी झालेल्या संचालक मंडळ सभेतील मंजुर ठरावानुसार मुलींचे वसतीगृह बांधकामाचा निर्णय घेण्यात आला. सदरचे वसतीगृह आदिवासी विकास विभाग हे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दरानुसार प्राधान्याने भाडेतत्वावर घेण्यात येईल असे कळविलेले आहे. मात्र नाशिक महानगर पालिका यांचेकडील ना हरकत प्रमाणपत्र दि.१२ मे, २०२१ अन्वये प्राप्त झाल्याने बांधकामास विलंबाने सुरुवात झालेली आहे. तसेच बांधकाम ठेकेदार हे दिनांक २८ ऑगष्ट, २०१४ मध्ये दिलेल्या आदेशातील अटी/शर्ती व दरानुसार काम करण्यास तयार असल्याने त्यांना २८ मे, २०२१ चे आदेशान्वये आदेशाच्या तारखेपासुन पुढे एक वर्षापर्यंत मुदतीत काम करणेस कळविले आहे. तथापी सुधारीत नकाशामध्ये १ ऐवजी १० इमारती झाल्याने खर्चात वाढ होत आहे. तसेच कामाचा कालावधी देखिल वाढत आहे. त्यामुळे बांधकाम ठेकेदार यांचे मागणीप्रमाणे त्यांना डिसेंबर,२०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यास हरकत नसावी. तसेच सदर बांधकामाचे तांत्रिक सल्लागार यांनी कळविलेप्रमाणे रुपये २.५४ कोटी वाढीव खर्चास इमारत निधीमधुन खर्च करणेकरीता मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, म.रा. पुणे यांना पाठवावे लागेल. तसेच सदर इमारत पुर्ण झालेवर तेथील फर्निचर व विद्युतीकरणासाठी देखिल निधीची आवश्यकता भासणार आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन खालील प्रमाणे ठराव पारीत करणेत आला.

**ठराव क्रमांक २४ :** सिडको, नाशिक येथे महामंडळामार्फत सुरु असलेले मुलींचे वसतीगृह बांधकामासाठी आजअखेर केलेल्या कार्यवाहीस ही सभा मंजुरी देत आहे. तसेच संभाव्य वाढीव खर्चासाठी इमारत निधीमधुन खर्च करणेसाठी मा.सहकार आयुक्त, पुणे यांना प्रस्ताव सादर करणेस ही सभा मंजुरी देत असुन सदर बांधकामासाठी दिनांक ३१ डिसेंबर, २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबतचा ठराव सर्वानुमते पारित करण्यात येत आहे.

सुचक :- मा.श्री. धनराज हरिभाऊ महाले, संचालक
अनुमोदक :- मा.श्री. सुनिल चंद्रकात भुसारा, संचालक.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक २५ : तत्का. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ तथा मा. मंत्री, आदिवासी विकास यांचे वापरात असलेल्या वाहनांचे इंधन / ऑईल / दुरूस्ती करीता तसेच त्यांचे शासकीय कार्यालयासाठी व निवासस्थानी साहित्य खरेदी करणेस झालेल्या खर्चास व पुढील लागणाऱ्या संभाव्य खर्चास मंजुरी मिळणेबाबत.**

तत्का. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ तथ मा. मंत्री, आदिवासी विकास यांचे यांचे मंत्रालयीन कार्यालयासाठी /शासकीय कामकाजाकरीता महामंडळाने वाहन (इनोव्हा) क्र. एम एच १५ इपी ००६ व एम एच १५ एए ९९९० हे वाहने वर्ग केलेली असुन आदिवासी विकास विभागाचे वाहन (इनोव्हा) क्र. ०१ एम एच १५ डी पी २७०७ हेही मा. मंत्री मोहदयांच्या वापरात होते. त्याचप्रमाणे मा.उप सचिव, आदिवासी विकास विभाग यांचेकडे वाहन क्र. एच एच १५ एए ४००० हे वाहन वर्ग करण्यात आलेले आहे.

सदर वाहनांचा इंधन/ऑईल/दुरूस्ती इत्यादीचा खर्च महामंडळामार्फत करण्यात येत असुन माहे ऑक्टोबर, २०२१ पासुन ते माहे जुन, २०२२ अखेर रक्कम रूपये.१३,३०,५०४/- एवढा खर्च झालेला असुन सदर खर्च मुख्य कार्यालयाकडुन वर्ग करण्यात आलेला आहे.

तात्का.मा. अध्यक्ष व मा. उपाध्यक्ष, महोदय आदिवासी विकास महामंडळ तसेच उप सचिव आदिवासी विकास यांचे वापाकरीता महामंडळाने वर्ग करण्यात आलेल्या वाहनांचे इंधन/ऑईल करीता लागणाऱ्या खर्चाचा निधी शासनाकडुन उपलब्ध होत नसुन सदरचा खर्च दिनांक १३/०३/२०१२ च्या शासन निर्णयातील तरतूदीपेक्षा जास्त होत असल्याने याबाबत भारतीय लेखा तथा लेखापरिक्षण विभाग, नवी दिल्ली यांनी दिनांक ०९/०६/२०१७ नुसार त्यांच्या लेखापरिक्षण अहवालामध्ये हा मुद्या उपस्थित केलेला आहे. याबाबत या कार्यालयाने मा. मंत्री, आदिवासी विकास विभाग यांचे खाजगी सचिव यांना अवगत करून देण्यात आलेले आहे.

तरी तात्का. मा. अध्यक्ष, आदिवासी विकास तथा मा. मंत्री, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ यांचेकडे वर्ग करण्यात आलेल्या वरील वाहनांचे इंधन/ ऑईल/ दुरूस्ती करीता माहे

ऑक्टोबर, २०२१ ते माहे जुन, २०२२ पर्यंत झालेला खर्च रूपये.१३,३०,५०४/-मात्र खर्चास मंजुरी मिळणेस विषय सविनय सादर.

उपरोक्त विषयावर चर्चा करतांना मा. श्रीमती वट्टी, संचालक यांनी सुचना मांडली की, मागील अनेक वर्षापासुन संचालकांचा बैठक भत्ता व प्रवास भत्ता यामध्ये वाढत्या महागाईच्या दृष्टीने काहीही वाढ झालेली नाही ती वाढवुन मिळावी. यावर मा. महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी माहीती दिली की, सन २०१२ चे शासन निर्णयानुसार बैठक भत्ता रुपये ५००/- व प्रवासासाठी प्रती किमी रुपये ९.०० इतक्या दरानुसार संचालकांस बैठक भत्ता व प्रवास भत्ता अदा केला जातो.

यावर मा. अध्यक्ष महोदय यांनी निर्देश दिले की, सन २०१२ नंतर भत्ता अदायगी बाबत कोणताही शासन निर्णय निर्गमित झालेला नसल्याने अस्तित्वात असलेल्या नियमाचे बाहेर जाऊन निर्णय घेता येणार नाही. तथापी वाढत्या महागाईचा विचार करता बैठक भत्ता व प्रवास भत्ता वाढविणेसंदर्भात सविस्तर प्रस्ताव तयार करुन सदर प्रस्ताव शासनाकडे पाठवावा. तसेच शासनाने दिलेल्या नियमानुसार व खर्चाच्या मर्यादेत महामंडळाचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांना प्रत्येकी एक नवीन इनोव्हा कार खरेदी करणेत यावी.

सदर विषयावरी सविस्तर चर्चा होवून खालीलप्रमाणे ठराव बहुमताने मंजूर करण्यात आला.

**ठराव क्रमांक २५ :** उपरोक्त नमुद कामी आत्तापर्यंत झालेल्या खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली. तसेच दि.१३/०३/२०१२ च्या शासन निर्णयानुसार ७५,०००/- ची मर्यादा आहे. ती मर्यादा वाढवुन घेणेबाबत शासनास प्रस्ताव सादर करावा. मा.संचालकां साठी प्रवासासाठी चा खर्च रक्कम रु.९/- प्रति कि.मी. इतकी तरतुद आहे. सदर तरतुदीत वाढ करणेबाबत शासनास प्रस्ताव सादर करावा. सदर गाड्यांच्या निर्लेखनासाठी शासनास प्रस्ताव सादर करावा. तसेच महामंडळाचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांना प्रत्येकी एक नवीन इनोव्हा क्रीस्टा खरेदी करणेस ही सभा मंजुरी देत आहे.

सुचक :- मा.मिनाक्षीताई अर्जुन वट्टी, संचालक
अनुमोदक :- मा.श्री. भरतसिंग थुकेलसिंग दुधनाग, संचालक.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक २६ : तात्का. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ तथा तात्का.मा. मंत्री आदिवासी विकास यांचे मंत्रालयीन कार्यालयासाठी खरेदी करण्यात आलेल्या स्टेशनरी व इतर साहित्याचे देयकास मंजुरी मिळणे बाबत.**

तत्का. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ तथा मा. मंत्री आदिवासी विकास यांचे मंत्रालय मुंबई येथील कार्यालयास आवश्यक लागणारी स्टेशनरी तसेच इलेक्ट्रॉनिक साहित्य मा. मंत्री महोदय यांचे स्वीय सहाय्यक यांनी वित्तीय नियमान्वये कार्यालयीन पध्दतीचा अवलंब करून त्यांचे स्तरावर खरेदी केले असुन कार्यालयास पुरवठा करून त्याचे देयके अदायगी तथा प्रतिपुर्ती होणेसाठी महामंडळाकडे पाठविलेले आहे. तपशिल खालीलप्रमाणे :

| अ. क्र. | पुरवठा धारकाचे नाव | पत्र क्र. व तारीख | देयक नंबर व तारीख | देयकाची रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | मे. परम एन्टरप्रायजेस, मुंबई - ८६ | ४९५<br>२५/१०/२०२१ | ०१२८<br>२५/१०/२०२१ | Rs.३१,६३५/- |
| | | ३०<br>१६/०२/२०२२ | ०१४८<br>२३/०२/२०२२ | Rs.४८,९६६/- |
| | | ७४/२२<br>२५/०३/२०२२ | ०१६३<br>२६/०३/२०२२ | Rs.२४,७८०/- |
| | | ७५/२२<br>२५/०३/२०२२ | ०१६२<br>२६/०३/२०२२ | Rs.३१,५२४/- |
| | | ६६<br>०५/०४/२०२२ | ००१<br>०५/०४/२०२२ | Rs.१,३१,८४०/- |
| | | **All Total** | - | **Rs.२,६८,७४५/-** |

वरील प्रमाणे खरेदी करण्यात आलेले साहित्य सुस्थितीत मिळाले आहेत असे तत्का. मा. मंत्री, महोदयांचे स्विय्य सहाय्यक यांनी संदर्भिय पत्रामध्ये नमुद केलेले आहे.

सबब वरील तपशिलाप्रमाणे तत्का. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ तथा तात्का.मा. मंत्री आदिवासी विकास यांचे मंत्रालय मुंबई येथील कार्यालयास लागणारी स्टेशनरी व इतर साहित्याची खरेदी करणेस एकुण झालेला खर्च रूपये.२,६८,७४५/- (अक्षरी रक्कम. दोन लाख आडुसष्ट हजार सातशे पंचेचाळीस रूपये मात्र) खर्चास मंजुरी मिळणेकरीता विषय सविनय सादर.

उपरोक्त विषयाचे महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी सविस्तर वाचन करुन सदर विषय मंजुरी करीता सभेपुढे सादर केला. सदर विषयावरी सविस्तर चर्चा होवून खालीलप्रमाणे ठराव बहुमताने मंजूर करण्यात आला.

**ठराव क्रमांक २६ :** उपरोक्त विषयाबाबत सांगोपांग चर्चा झाली तत्कालीन मा. अध्यक्ष तथा मंत्री आदिवासी विकास यांचे कार्यालयीन खरेदीसाठी झालेला खर्च रुपये २,६८,७४५/- इतक्या खर्चास ही सभा मंजुरी देत आहे.

सुचक :- मा.श्री.सुनिल भुसारा, संचालक
अनुमोदक :- मा.श्री. भरतसिंग थुकेलसिंग दुधनाग, संचालक.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक २७ : महामंडळाच्या मालकीची जुनी वाहने (कार/जीप/ट्रक/मिनीट्रक) इ. वाहनांचे निर्लेखन करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

आदिवासी विकास महामंडळ राबवित असलेल्या विविध योजनेच्या माल वाहतुकीच्या कामासाठी त्याचप्रमाणे प्रादेशिक व्यवस्थापक व उप प्रादेशिक व्यवस्थापक यांना कार्यालयीन दौरे व इतर कार्यालयीन कामकाजासाठी महामंडळाने (जीप/पीकअप/ट्रक मीनीट्रक) या प्रकारातील ११९ वाहने वेळोवेळी खरेदी करून प्रादेशिक कार्यालयांना वाटप करण्यात आलेली आहेत.

सदर वाहनांपैकी काही वाहने खरेदी करून १५ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असुन सदर वाहने नादुरूस्त झालेले असल्याने बंद स्थितीत उभे आहेत. तथापी एखादे वाहन निर्लेखन करावयाचे झाल्यास वित्त विभाग शासन निर्णय क्र.विअप्र-१०९१/प्र.क्र.१२/विनियम, मंत्रालय मुंबई ३२ दिनांक ०१ ऑक्टोबर, १९९१ नुसार जीप या वाहनास खरेदी करून १० वर्ष पुर्ण व धावाई २.५० लाख कि.मी. तसेच ट्रक या वाहनाची धावाई २.०० लाख पुर्ण होणे आवश्यक आहे.

तरी महामंडळाकडील जुनी झालेली (जीप/पीकअप/ट्रक मीनीट्रक) असे एकुण ३५ वाहनांचे दिनांक ०१ ऑक्टोबर, १९९१ च्या शासन निर्णयानुसार प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचेकडुन मुल्यांकन प्रमाणपत्र प्राप्त करून सदर वाहनांचे निर्लेखन करणे आवश्यक आहे.

तरी सदर वाहनांचे निर्लेखन करणेस मंजुरी मिळणेस्तव विषय सविनय सादर.

उपरोक्त विषयाचे महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी सविस्तर वाचन करुन सदर विषय मंजूरी करीता सभेपुढे सादर केला. सदर विषयावर चर्चा करतांना मा. अध्यक्ष महोदय यांनी विचारणा केली की, महामंडळाकडे सद्यस्थितीत किती वाहने चालु स्थितीत आहेत व किती बंद अवस्थेत आहेत. जी वाहने निर्लेखन करण्यासारखी असेल त्यांचा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा.

उपरोक्त विषयाचे महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी सविस्तर वाचन करुन सदर विषय मंजूरी करीता सभेपुढे सादर केला. सदर विषयावरी सविस्तर चर्चा होवून खालीलप्रमाणे ठराव बहुमताने मंजूर करण्यात आला.

**ठराव क्रमांक २७ :** उपरोक्त विषयाबाबत सदर वाहने निर्लेखनाबाबत शासन निर्णयानुसार अटी / शर्ती तपासुन सद्यस्थितीत चालु व बंद वाहनांचा आढावा नियमानुसार घेऊन निरुपयोगी वाहने निर्लेखनाबाबत कार्यवाही करणेबाबतचा ठराव पारीत करण्यांत येत आहे.

सुचक :- मा.श्री.सुनिल भुसारा, संचालक
अनुमोदक :- मा.श्री. भरतसिंग थुकेलसिंग दुधनाग, संचालक.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक २८ : आदिवासी विकास महामंडळाकडील व्दार वितरण योजना बंद केल्यामुळे महामंडळाकडील वाहतुकीअभावी बंद उभे असलेल्या ट्रक/मिनीट्रक वाहनांवर होणाऱ्या आर्थिक नुकसानाबाबत.**

शासन निर्णय क्रमांक सावव्य-१०९२/प्र.क्र.६६८९/ जापु-२८, मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२, दिनांक ३ मार्च १९९३ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील आदिवासी डोंगराळ व दुर्गम भागात व क्षेत्रातील तालुक्यात व्दारवितरण योजने अंतर्गत शासकीय गोदाम ते रास्तभाव दुकानापर्यंत रेशनिंग मालाची वाहतुक करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाने वेळोवेळी ६६ वाहने खरेदी केलेली आहे.

शासन निर्णय क्रमांक. शिवाप-१०१०/प्रक्र.१९/नाप- २८ दिनांक २३ फेब्रुवारी, २०१२ च्या शासन निर्णयानुसार जिल्हाधिकारी कार्यालयांमार्फत शासकीय गोदाम ते स्वस्त धान्य दुकानापर्यंत एकाच वाहतुक ठेकेदाराची नेमणुक करण्यात आलेली असल्याने सदर प्रक्रियेव्दारे नाशिक, अहमदनगर, पुणे, रायगड, ठाणे, पालघर, धुळे, नंदुरबार, जळगाव, अमरावती, यवतमाळ, नांदेड, चंद्रपुर, नागपुर, गोंदिया या जिल्हयात खाजगी वाहतुक ठेकेदाराची नेमणुक संबंधित जिल्हाधिकारी यांनी केल्यामुळे त्यांचेमार्फत रेशनिंग मालाचे वितरण करण्यात येत आहे.

त्यामुळे महामंडळाकडील द्वारवितरण योजना बंद झाल्यामुळे महामंडळाचे ६६ वाहने (ट्रक/ मिनीट्रक) व्दारवितरण शिधावस्तु तसेच माल वाहतुकी अभावी उभी आहेत. सदर वाहने वाहतुकी अभावी उभी राहिल्यामुळे खराब होऊन भविष्यात महामंडळाचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

आदिवासी विकास महामंडळाने आदिवासी उपायोजना क्षेत्रात व्दारवितरण योजनेसाठी शिधावस्तु व्दारपोहच करीता वाहने वेळेवर उपलब्ध करून व्दारवितरण योजनेसाठी संपुर्ण आदिवासी उपयोजना क्षेत्रात चांगल्या रितीने शिधावस्तु स्वस्त धान्य दुकानदारांचे व्दार पोहच केलेले आहे.

त्याअनुषंगाणे आदिवासी विकास विकास विभाग अधिसुचना दिनांक १९ ऑक्टोबर, २०१३ नुसार च्या अधिसुचनेत नमुद जिल्हे नाशिक, ठाणे, रायगड, नंदुरबार, अमरावती, चंद्रपुर, नांदेड व गडचिरोली या आठ जिल्हयातील २९ तालुक्यामध्ये संबंधित जिल्हाधिकारी यांनी ठेकेदारांना मंजुर केलेल्या दराने अथवा त्यापेक्षा कमी दराने सुध्दा पुरवठा गोदाम ते रास्त भाव दुकानांपर्यत शिधावस्तु पुरवठा करणेस महामंडळ तयार आहे. तरी आदिवासी विकास महामंडळाकडे व्दारवितरण योजना सुरू करणेबाबत दिनांक १७ सप्टेंबर, २०२१ रोजी संपन्न झालेल्या संचालक मंडळ सभेत मंजुर ठरावानुसार मा. सचिव, आदिवासी विकास तसेच अन्न व नागरी पुरवठा विभाग मंत्रालय मुंबई यांना खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात आलेले आहे.

१. मु.का.नाशिक कडील प्रस्ताव क्र. आविम/प्रशा/वाहन विभाग/४८९७/२०१८ दि.३०/११/२०१८
२. मु.का. नाशिक कडील प्रस्ताव क्र. आविम/प्रशा/वाहन विभाग/२०७१/२०२१ दि.०६/१०/२०२१
३. मु.का.नाशिक कडील प्रस्ताव क्र. आविम/प्रशा/वाहन विभाग/६७३/२०२२ दि.२४/०५/२०२२
४. मु.का.नाशिक कडील प्रस्ताव क्र. आविम/प्रशा/वाहनविभाग/२७४०/२०२२ दि.०५/०५/२०२२

परंतु अद्याप याबाबत शासन स्तरावरून कोणताही निर्णय झालेला नाही.

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाने खरेदी केलेल्या ६६ वाहनांपैकी जवळपास ५० वाहने हे सन २०१२ ते २०१४ या कालावधीतील असुन या वाहनांची आजची स्थिती पाहता सदरची वाहने चांगल्या स्थितीमध्ये आहेत. मात्र व्दारवितरण योजना बंद झाल्यामुळे तसेच महामंडळाकडे इतर वाहतुकीचे कामे नसल्यामुळे मागील चार ते पाच वर्षापासुन सदर वाहने बंद स्थितीत उभी असल्यामुळे खराब होत चाललेली असुन सदर वाहनांचा नियमानुसार प्रत्येक वर्षाला पासिंग, विमा, रोड टॅक्स इ. भरणा करावा लागत असुन एका

वाहनाचा अंदाजे खर्च रूपये.५०,०००/- (अक्षरी रक्कम. पन्नास हजार मात्र) असे एकुण ६६ वाहनांसाठी अंदाजे रूपये.३३ लाख मात्र खर्च लागत आहे. सदरील टॅक्स भरणा वेळेत न केल्यास त्यावर व्याज आकारण्यात येईल असे प्रादेशिक परिवहन कार्यालयाने निर्देश दिलेले आहे.

त्याचप्रमाणे या वाहनांवर रोजंदारी वाहन चालकांच्या तात्पुरत्या स्वरूपात नेमणुका करण्यात आलेल्या होत्या सदर योजना बंद झाल्यामुळे रोजंदारी वाहन चालक हे नियमीत सेवेत सामावुन घेणेकरीता न्यायालयात गेलेले असल्यामुळे सदर कामगारांना कामारून कमी करता आलेले नाही. मात्र रोजंदारी वाहन चालकांची वेतन/मजुरी अदा करणे बंधनकारक असल्यामुळे त्यासाठी प्रत्येक वर्षाला अंदाजे रू.७.५० सात लाख पन्नास हजार मात्र च्या जवळपास खर्च लागत असुन सदर खर्च शासनाकडुन प्राप्त नसल्यामुळे महामंडळाला करणे बंधनकारक असल्याने या खर्चाचा आर्थिक भुर्दंड नाहक महामंडळाला तसेच पर्यायाने शासनाला सहन करावा लागत आहे.

तरी महामंडळाच्या मालकीच्या ६६ ट्रक/मिनीट्रक वाहनांबाबत योग्य तो निर्णय होणेस विषय सविनय सादर.

**ठराव क्रमांक २८ :** उपरोक्त विषयाबाबत सदर वाहनांपैकी जी वाहने वापरण्याजोगी आहेत त्यांची माहीती एकत्रित करुन सदर वाहने कार्यालयास वापरणे किंवा भाडे तत्वावर देणे बाबत प्रस्ताव तयार करावा. किंवा आदिवासी सुशिक्षित, बेरोजगार, परवानाधारक युवकांना व्यवसायासाठी लिलावाद्वारे सदरची वाहने देणेसाठीचा प्रस्ताव शासनास सादर करणेबाबतचा ठराव पारीत करण्यांत येत आहे.

सुचक :- मा.श्री.सुनिल भुसारा, संचालक
अनुमोदक :- मा.श्री. भरतसिंग थुकेलसिंग दुधनाग, संचालक.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक २९ : मुख्य कार्यालय, नाशिक येथे मा. संचालक महोदय मा. महाव्यवस्थापक (प्रशासन) तसेच कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता स्वच्छतागृह तयार करणे तसेच कार्यालयातील प्रशासन/वित्त/विपणन विभागासाठी अभिलेख कक्ष तयार करणेस येणाऱ्या संभाव्य खर्चास मंजुरी मिळणे.**

**अ) मुख्य कार्यालय, नाशिक येथे मा. संचालक महोदय तसेच कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता स्वच्छतागृह तयार करणे.**

आदिवासी विकास भवन नाशिक येथील दुसऱ्या व तीसऱ्या माळ्यावरील स्वच्छतागृह सार्वजनिक सर्व विभागासाठी सार्वजनिक वापरात आहे. सदरच्या स्वच्छतागृहाची महामंडळामार्फत किरकोळ दुरूस्ती कामे करण्यात येत असुन साफसफाई करण्यात येत आहे.

तथापी मुख्य कार्यालय, नाशिक येथे मा. संचालक महोदय कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता स्वतंत्र स्वच्छतागृह असणे आवश्यक असुन सदर स्वच्छतागृह तयार करणेकामी लागणारा खर्च अंदाजे रक्कम रूपये.१०.०० लक्ष मात्र खर्चास मंजुरी मिळणेस विषय सविनय सादर.

**ब) मुख्य कार्यालयातील प्रशासन/वित्त/विपणन विभागासाठी अभिलेख कक्ष तयार करणेस येणाऱ्या संभाव्य खर्चास मंजुरी मिळणेबाबत.**

महामंडळाचे मुख्य कार्यालय, नाशिक अंतर्गत ९ प्रादेशिक कार्यालय व ३५ उप प्रादेशिक कार्यालय असुन १ विभागीय कार्यालय, नागपुर आहे. या सर्व कार्यालयासंबंधी महत्वाचे कामकाज मुख्य कार्यालय, नाशिक येथुन करण्यात येत आहे.

मुख्य कार्यालय, नाशिक येथील महत्वाचे दस्ताऐवज सुरक्षित ठेवण्यासाठी प्रशासन/ वित्त/ विपणन या विभागाकरीता अभिलेख कक्ष तयार करणे आवश्यक असुन त्याकरीता अंदाजे रक्कम रूपये.१५.०० लक्ष मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी वरील प्रमाणे कामे करणेस लागणारा खर्च व्यवस्थापकीय अनुदानातील वेतनेत्तर खर्चातुन अथवा महामंडळाला मिळणारे बँक व्याजाच्या रक्कमेतुन खर्च करणेस मंजुरी मिळणेस विषय सविनय सादर.

उपरोक्त विषयाचे महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी सविस्तर वाचन करुन सदर विषय मंजूरी करीता सभेपुढे सादर केला. सदर विषयावर मा. अध्यक्ष महोदय यांनी सुचना केली कार्यालयात स्वच्छतागृह असणे अत्यंत आवश्यक आहे. यावर चर्चा करतांना मा. भुसारा सो. यांनी सूचना मांडली की, मुख्य कार्यालय, नाशिक येथे कामकाजानिमित्त संचालक येतात तेव्हा त्यांचेसाठी स्वच्छतागृह नसल्याने खुपच अडचण निर्माण होते. त्यावर मा. एम.एम. शर्मा, व्यवस्थापक (लेखा) यांनी माहीती दिली की, सदर कामासाठी इमारत निधीमधुन खर्च करता येईल मात्र त्यासाठी मा. सहकार आयुक्त, पुणे यांची परवानगी घेणे बंधनकारक आहे. सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन खालील प्रमाणे ठराव संमत करण्यांत आला.

**ठराव क्रमांक २९ :** सदर विषयाबाबत सांगोपांग चर्चा झाली. मुख्यालयास अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता स्वच्छतागृह बनविणेस ही सभा मंजुरी देत आहे. सदर कामासाठी संभाव्य खर्चाचे अंदाजपत्रक तयार करुन भागभांडवालातील अखर्चित निधीतुन खर्च करण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

सुचक :- मा.श्री.सुनिल भुसारा, संचालक
अनुमोदक :- मा.श्री. भरतसिंग थुकेलसिंग दुधनाग, संचालक.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक ३० : मुख्य कार्यालय, नाशिक येथील स्वागत कक्ष, संचालक कक्ष व सभागृह या दालनाचे नुतणीकरण करणेस व त्याकरीता येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.**

आदिवासी विकास भवन येथील इमारतीत दुसऱ्या माळयावर महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाचे मुख्य कार्यालय असुन तीसऱ्या माळयावर वित्त विभाग व प्रादेशिक कार्यालय कार्यरत आहे.

तथापी दुसऱ्या माळयावरील मा. व्यवस्थापकीय संचालक सो., यांच्या दालानासमोरील असलेले स्वागत कक्षामध्ये फर्निचर/P.O.P. करण्यात आलेले होते. ते दिनांक ०५/०३/२०१९ रोजी मध्यरात्री अचानक पडलेले असल्याने सदर कक्षाचे नुतणीकरण करणे आवश्यक आहे.

संचालक कक्ष व सभागृहामधील खिडक्यांना नविन पडदे व भिंतींना कलर देणेबाबत मा. संचालक महोदय यांनी निर्देश दिले होते. सबब उपरोक्त दालनाचे दुरुस्ती/नुतनीकरण करणेकामी (अंदाजे रूपये दोन लक्ष मात्र) खर्च अपेक्षित आहे. तरी उपरोक्त दालनाची दुरूस्ती कामे करणेकरीता व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मंजुरी मिळणेस सादर.

उपरोक्त विषयाचे महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी सविस्तर वाचन करुन सदर विषय मंजूरी करीता सभेपुढे सादर केला. सदर विषयावर चर्चा करतांना मा. भुसारा सो. यांनी माहीती दिली की, प्रादेशिक कार्यालय,

जव्हार इमारतीची देखिल खुप दुरावस्था झालेली असुन अद्याप सदर इमारतीचे उद्घाटन झालेले नाही. त्यामुळे सदर इमारतीचे नुतनीकरण करुन मा. अध्यक्ष महोदय यांचे हस्ते उद्घाटन करावे. सदर विषयावरी सविस्तर चर्चा होवून खालीलप्रमाणे ठराव बहुमताने मंजूर करण्यात आला.

**ठराव क्रमांक ३० :** स्वागत कक्ष, संचालक कक्ष व सभागृह या दालनाचे नुतणीकरण करणेस व त्याकरीता येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मंजुरी देण्यात येत आहे. तसेच प्रादेशिक कार्यालय, जव्हार इमारतीचे दुरुस्ती/नुतनीकरणास ही सभा मंजुरी देत असुन त्यासाठी येणा-या संभाव्य खर्चाचे अंदाजपत्रक तयार करुन त्याप्रमाणे अखर्चित निधीमधुन किंवा इमारत निधीतुन खर्च करण्यासाठी मा.सहकार आयुक्त, पुणे यांच्या मंजुरीस अधिन राहुन नुसार काम करण्याचा ठराव सर्वानुमते पारित करण्यात येत आहे.

**सुचक** :- मा.श्री. भरतसिंग थुकेलसिंग दुधनाग, संचालक.

**अनुमोदक** :- मा.श्री.सुनिल भुसारा, संचालक

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक ३१ : महामंडळाच्या कार्यालयासाठी नविन इमारत भाडे तत्वावर घेणेस व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रमाणपत्रानुसार वाढीव कार्यालय भाडे अदायगी करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**(अ) उप प्रादेशिक कार्यालय, तळोदा कार्यालयाचे वाढीव भाडे करारनामा करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

उप प्रादेशिक कार्यालय, तळोदा कार्यालयासाठी श्री. दत्तात्रय तोताराम सुर्यवंशी यांच्या मालकीची इमारत सन २०१५ पासुन दरमहा भाडे रूपये.१००००/- मात्र याप्रमाणे भाडे तत्वावर घेतलेली आहे. सदर कार्यालयाच्या इमारतीचा दिनांक ३१/०३/२०२१ रोजी करारनामा मुदत संपलेली असतांना इमारत मालक श्री. सुर्यवंशी यांनी दिनांक ०१/०४/२०२१ ते दिनांक ३१/०३/२०२३ पर्यंत हा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सुधारीत भाडे प्रमाणपत्रानुसार दरमहा भाडे रूपये.१४,४७०/- याप्रमाणे भाडे करारनामा करणेस प्रादेशिक व्यवस्थापक प्रादेशिक कार्यालय, नंदुरबार कळविलेले आहे.

त्यानुसार उप प्रादेशिक कार्यालय, तळोदा कार्यालयाचा वरील प्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सुधारीत भाडे प्रमाणपत्रानुसार दरमहा भाडे रूपये.१४,४७०/- याप्रमाणे भाडे करारनामा करणेस मंजुरी मिळणेबाबत प्रादेशिक कार्यालय, नंदुरबार यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

**(ब) उप प्रादेशिक कार्यालय, अहेरी कार्यालयाचे वाढीव भाडे करारनामा करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

उप प्रादेशिक कार्यालय, अहेरी कार्यालयासाठी श्री. धर्मरावबाबा भगवंतराव आत्राम, मु.राजवाडा अहेरी ता. अहेरी जि. गडचिरोली यांच्या मालकीची इमारत दिनांक २८/०४/१९९९ पासुन दरमहा भाडे रूपये.५०८०/- मात्र याप्रमाणे भाडे तत्वावर घेतलेली आहे.

उप प्रादेशिक कार्यालयाचे इमारत मालक श्री. आत्राम यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, आल्लापल्ली जि. गडचिरोली यांचेकडील प्रमाणपत्रानुसार निश्चित केलेले दरमहा भाडे रूपये.१९,८२०/- मात्र याप्रमाणे भाडे निश्चित करून मिळणेबाबत विनंती केलेली आहे. त्यानुसार यास मंजुरी मिळणेबाबत उप प्रादेशिक व्यवस्थापक उप प्रादेशिक कार्यालय, अहेरी यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

**क. उप प्रादेशिक कार्यालय, चिमुर कार्यालयासाठी नविन इमारत भाडे तत्वावर घेणेस मंजुरी मिळणेबाबत.**

उप प्रादेशिक कार्यालय, चिमुर कार्यालयासाठी श्री. पाडुरंग हरी डाहुले, रा. बोर्डा, ता. वरोरा जि. चंद्रपुर यांच्या मालकीची इमारत दिनांक ०१/०४/२०१५ पासुन दरमहा भाडे रूपये.९५४०/- मात्र प्रमाणे भाडे तत्वावर घेण्यात आलेली होती. सदर कार्यालयाच्या इमारतीचा माहे मे, २०२२ मध्ये करारनामा संपुष्टात आला असल्याने श्री. डाहुले, यांनी सदर इमारत खाली करणेबाबत उप प्रादेशिक कार्यालय, चिमुर यांना कळविलेले आहे.

त्यानुसार प्रादेशिक व्यवस्थापक, चंद्रपुर यांनी उप प्रादेशिक कार्यालय, चिमुर कार्यालयासाठी नविन इमारतीचा शोध घेऊन श्री. बापुराव उध्दवराव भिडेकर रा. मु.पो. पिंपळनेरी, ता. चिमुर जि. चंद्रपुर यांच्या मालकीची इमारत दरमाहा भाडे रूपये.१६,०००/- प्रमाणे भाडे तत्वावर घेणेस मंजुरी मिळणेबाबत प्रादेशिक कार्यालय, चंद्रपुर यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

**(ड) उप प्रादेशिक कार्यालय, राजुर कार्यालयासाठी नविन इमारत भाडे तत्वावर घेणेस मंजुरी मिळणेबाबत.**

उप प्रादेशिक कार्यालय, राजुर कार्यालयासाठी श्री. विठ्ठल देवराम देशमुख, संचालक आदिवासी विकास महामंडळ यांच्या मालकीची इमारत दरमहा भाडे रक्कम रूपये.११,०००/- प्रमाणे दिनांक ०१ जानेवारी, २०१७ पासुन ते माहे सप्टेंबर, २०१९ पर्यंत भाडे तत्वावर घेण्यात आलेली आहे.

तथापी सदर इमारत ही माहे डिसेंबर, २०२१ पासुन सौ. कांचन अतुल बोऱ्हाडे यांच्या नावे केलेली आहे. सौ. बोऱ्हाडे ह्या माह जानेवारी, २०२२ पासुन सदर इमारत महामंडळाच्या कार्यालयासाठी दरमहा रूपये.१४०००/- प्रमाणे भाडे तत्वावर देणेस तयार आहे.

तरी उप प्रादेशिक कार्यालय, राजुर करीता सौ. कांचन अतुल बोऱ्हाडे, यांची मालमत्ता क्र. ९९९ (इमारत) ही माहे जानेवारी, २०२२ पासुन भाडे तत्वावर घेणेस मंजुरी मिळणेबाबत प्रादेशिक व्यवस्थापक प्रादेशिक कार्यालय, जुन्नर यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

महामंडळाचे उपविधी क्र. २४ (ब) १ नुसार महामंडळाचे कारभार चालविण्या करीता कोणतीही इमारत किंवा जमीन विकत स्वतःच्या मालकीची अगर भाडयाने घेणे, जमीन, इमारती, विकत, खरेदी अगर लिजवर अगर अक्वायर करून कोणा इसमाकडुन घेणे याबाबत संचालक मंडळाला अधिकार आहेत.

तरी उप प्रादेशिक कार्यालय, तळोदा कार्यालयाचा दिनांक ०१/०४/२०२१ ते दिनांक ३१/०३/२०२३ पर्यंत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सुधारीत भाडे प्रमाणपत्रानुसार दरमहा भाडे रूपये.१४४७०/- याप्रमाणे भाडे करारनामा करणेस मंजुरी मिळणेस सविनय सादर.

तसेच उप प्रादेशिक कार्यालय, अहेरी कार्यालयाचे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, आल्लापल्ली जि. गडचिरोली यांचेकडील प्रमाणपत्रानुसार निश्चित केलेले दरमहा भाडे रूपये.१९८२०/- मात्र याप्रमाणे भाडे निश्चित करणेस मंजुरी मिळणेस सविनय सादर.

तसेच उप प्रादेशिक कार्यालय, चिमुर कार्यालयासाठी नविन इमारत दरमहा भाडे रूपये.१६०००/- मात्र याप्रमाणे भाडे तत्वावर घेणेस मंजुरी मिळणेस सविनय सादर.

तसेच उप प्रादेशिक कार्यालय, राजुर करीता सौ. कांचन अतुल बोऱ्हाडे, यांच्या मालकीची इमारत क्र. ९९९) ही माहे जानेवारी, २०२२ पासुन दरमहा भाडे रूपये.१४,०००/- भाडे तत्वावर घेणेस मंजुरी मिळणेस सविनय सादर.

उपरोक्त विषयाचे महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी सविस्तर वाचन करुन सदर विषय मंजूरी करीता सभेपुढे सादर केला. सदर विषयावर चर्चा करतांना मा. भुसारा सो. यांनी सुचना मांडली की, महामंडळाचे बहुतांश कार्यालये ही खाजगी जागेवर भाडेतत्वावर घेण्यात आलेली आहेत व त्यापैकी काही कार्यालयांची दुरावस्था झालेली आहे. त्यामुळे कार्यालय इतर ठिकाणी स्थालांतरीत करावयाचे असल्यास शासकीय जागेचा शोध घ्यावा. शासकीय जागा उपलब्ध न झाल्यास कार्यालयाचे सोईनुसार खाजगी जागेचा शोध घेऊन तसा प्रस्ताव आगामी संचालक मंडळ सभेत सादर करावा. या विषयावर सविस्तर चर्चा होवून खालीलप्रमाणे ठराव बहुमताने मंजूर करण्यात आला.

**ठराव क्रमांक ३१ :** सदर विषयाबाबत सांगोपांग चर्चा झाली. सदर कामासाठी उपरोक्त नमुद कार्यालयांसाठी प्रादेशिक कार्यालय यांचेकडुन प्राप्त प्रस्तावास व पुढील येणाऱ्या प्रस्तावास ही सभा मंजुरी देत असुन सर्व प्रादेशिक कार्यालये / उप प्रादेशिक कार्यालये यांचेकडुन प्रस्ताव मागवुन घेऊन घेऊन आगामी संचालक मंडळ सभेत प्रस्ताव सादर करावा, असा ठराव पारित करण्यात येत आहे.

**सुचक** :- मा.श्री.सुनिल भुसारा, संचालक

**अनुमोदक** :- मा.श्री. भरतसिंग थुकेलसिंग दुधनाग, संचालक.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक ३२ : कार्यालयीन कामकाजासाठी आवश्यक लागणारी स्टेशनरी छपाई करणे व खरेदी करणेसाठी झालेल्या खर्चास व पुढील कालावधीसाठी येणाऱ्या संभाव्य खर्चास मंजुरी मिळणे बाबत.**

**(अ) हंगाम २०२१-२२ करीता लागणारी स्टेशनरी छपाई करणेसाठी झालेल्या खर्चास मंजुरी मिळणेबाबत.**

प्रादेशिक कार्यालय, नाशिक, जव्हार, जुन्नर, नंदुरबार, भंडारा, गडचिरोली, व उप प्रा.का. अहेरी या कार्यालयांनी हंगाम २०२१-२२ करीता ग्रेडींग स्लीप (एम.पी.२), ग्रेडींग रजिस्टर, हिशोब पट्टी / बिल बुक (एम.पी. ३/४), विक्री बिल बुक / विक्री पट्टी, खरेदी रजिस्टर (एम.पी. ५), ट्रान्सफर मेमो (एम.पी. ६), साठा रजिस्टर (एम.पी. ८), ट्रक वाहतुक पास, एम.पी. १० गेट पास, बारदाना रजिस्टर (एम.पी. १२), काटातोल पट्टी / वजनतोल पट्टी, हुंडी फॉर्म नं. १ (आडवा तक्ता), हुंडी फॉर्म नं. २ (हुंडी पुस्तक), बीन कार्ड, शेतकरी नोंदणी फॉर्म (बुक) इ. लागणारी स्टेशनरीची मागणी केलेली होती.

त्यानुसार मा. अध्यक्ष, आदिवासी विकास महामंडळ मर्या., नाशिक यांनी दिलेल्या मंजुरी नुसार कार्यालयीन पध्दतीचा अवलंब करून स्थानिकच्या अधिकृत पुरवठदारांकडुन वरील प्रमाणे नमुद स्टेशनरी छपाई करण्यात आलेली असुन त्याकरीता एकुण रक्कम रूपये.९,१८,७९८/- (अक्षरी रक्कम. नऊ लाख आठरा हजार सातशे अठ्यान्नव रूपये मात्र) खर्च झालेला आहे. तरी सदर खर्चास मंजुरी मिळणेस विषय सविनय सादर.

**(ब) दिनांक ३१ मार्च, २०२२ अखेरचे वस्तुनिष्ठ लेखे करीता लागणारी स्टेशनरी छपाई करणेसाठी झालेल्या खर्चास मंजुरी मिळणेबाबत.**

प्रादेशिक कार्यालय, नाशिक, जव्हार, जुन्नर, नंदुरबार, यवतमाळ, चंद्रपुर, भंडारा, गडचिरोली, धारणी व उप प्रा.का. अहेरी या कार्यालयांना दिनांक ३१ मार्च, २०२२ अखेरचे वस्तुनिष्ठ लेखे तयार करणेसाठी साठा तपासणी प्रमाणपत्र, अ-ब-क, ड,फ, ग, ह, य, न तसेच विक्री पट्टी व बिड शिट इत्यादी स्टेशनरीची मागणी करण्यात आलेली होती.

सदर स्टेशनरी कार्यालयीन पध्दतीचा अवलंब करून स्थानिकच्या अधिकृत पुरवठदारांकडुन करण्यात आलेली असुन त्याकरीता एकुण रक्कम रूपये.९४,७४५/- (अक्षरी रक्कम. चौऱ्यान्नव हजार सातशे पंचेचाळीस रूपये मात्र) खर्च झालेला आहे. तरी सदर खर्चास मंजुरी मिळणेस विषय सविनय सादर.

**(क) सन २०२१-२२ चा वार्षिक अहवाल छपाई करणेस व त्याकरीता येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाचा सन २०२१-२२ चा ४९ वा वार्षिक अहवाल छपाई करावयाचा असुन छपाई केलेला वार्षिक अहवाल सहाकर कायद्यानुसार महामंडळाच्या संलग्न सभासद संस्थांना (आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था) वाटप करणे तसेच शासनास अहवाल पाठविणे बंधनकारक आहे.

तरी सन २०२१-२२ या वर्षाचा ४९ वा वार्षिक अहवाल १०० नग उच्च प्रतिचे व १४०० नग साधारण दर्जाचे असे एकुण १५०० नग छपाई करून घेणेस व त्यासाठी संभाव्य लागणारा खर्च रक्कम रूपये.३.५० लक्ष मात्र खर्चास प्रशासकीय मान्यतेस सादर.

**(ड) मुख्य कार्यालयासाठी सन २०२२-२३ करीता आवश्यक लागणारी कार्यालयीन स्टेशनरी खरेदी करणे व छपाई करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

मुख्य कार्यालयातील तिन्ही विभागाकरीता (प्रशासन/वित्त/विपणन) सन २०२२-२३ मध्ये लागणारी स्टेशनरी खरेदी करण्याचे प्रस्तावित आहे. सदरची स्टेशनरी शासन निर्णयानुसार GeM पोर्टलवरून किंवा दरपत्रके मागवुन खरेदी करावयाची असुन याकरीता अंदाजे रक्कम रूपये.४.५० लक्ष मात्र च्या जवळपास लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तरी कार्यालयीन स्टेशनरी खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या संभाव्य खर्चास प्रशासकीय मान्यतेस सविनय सादर.

**(इ) सन २०२३ ची दैनंदिनी (डायरी), छपाई करणेस व त्याकरीता येणाऱ्या खर्चास मंजुरी मिळणेबाबत.**

महामंडळाची सन २०२३ ची दैनंदिनी छपाई करण्याचे प्रस्तावित असुन यामध्ये मा. मंत्री महोदय, तसेच संचालक महोदय यांच्या नावाच्या प्रत्येकी ५० नग याप्रमाणे तसेच महामंडळाचे अधिकारी यांच्या नावाच्या प्रत्येकी १० नग याप्रमाणे एकुण २५०० नग दैनंदिनी छपाई करण्यात येत असल्याने सदर दैनंदिनी छपाई करणेस अंदाजे खर्च रूपये.४.०० लक्ष मात्र च्या जवळपास खर्च लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तरी महामंडळाची दैनंदिनी छपाई करणेस व त्यासाठी येणाऱ्या संभाव्य खर्चास प्रशासकीय मान्यतेस सविनय सादर.

उपरोक्त विषयाचे महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी सविस्तर वाचन करुन सदर विषय मंजूरी करीता सभेपुढे सादर केला. सदर विषयावरी सविस्तर चर्चा होवून खालीलप्रमाणे ठराव बहुमताने मंजूर करण्यात आला.

**ठराव क्रमांक ३२ :** सदर विषयाबाबत सांगोपांग चर्चा झाली. महामंडळाची दैनंदिनी छपाई करणेस व त्यासाठी येणाऱ्या संभाव्य खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

**सुचक** :- मा.श्री.सुनिल भुसारा, संचालक
**अनुमोदक** :- मा.श्री. भरतसिंग थुकेलसिंग दुधनाग, संचालक.
ठराव **सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक ३३ : महामंडळाचे सर्व प्रादेशिक** कार्यालय **व उप प्रादेशिक कार्यालयांना कार्यालयीन कामकाजाकरीता नविन संगणक , प्रिंटर व झेरॉक्स मशिन तसेच मुख्यालयातील** वित्त/ **विपणन विभागासाठी नविन झेरॉक्स मशिन खरेदी करणेस मंजुरी मिळणे.**

**अ)** महामंडळाचे **सर्व प्रादेशिक** व **उपप्रादेशिक कार्यालयाकरीता कार्यालयीन** कामकाज **करणे करीता संगणक** व **प्रिंटर खरेदी** करणे बाबत.

म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळ ही प्रवर्तक असलेली सेवाभावी संस्था असुन महामंडळाचा मुख्य उद्देश राज्यातील आदिवासींची आर्थिक पिळवणूक थांबून त्यांचा विकास घडवुन आणणे हा आहे. याउद्देशाच्या अनुषंगाने महामंडळाचे एकूण १० प्रादेशिक व ३५ उपप्रादेशिक कार्यालय कार्यरत आहेत.

महामंडळामार्फत आधारभुत खरेदी योजना, एकाधिकार खरेदी योजना, खावटी अनुदानयोजना गौणवन उपज खरेदी योजना व इतर योजना राबविल्या जातात. आधारभुत खरेदी योजना धान खरेदीचे तसेच शेतक-यांचे पेमेंट हे इत्यादी कामाचे NEML Portal वर online राबविण्यात येत आहे.

वरील योजना प्रभावी पणे राबविण्यासाठी सर्व प्रादेशिक व उपप्रादेशिक कार्यालयांना यापुर्वी संगणक व प्रिंटर खरेदी करण्यात आले आहेत. परंतू सदरचे संगणक व प्रिंटर कालबाह्य झाले असल्याने वारंवार नादुरुस्त होत असल्याने कार्यालयीन कामकाज करणे करीता अडजणी निर्माण होत आहे. करीता नविन संगणक व प्रिंटर संच खरेदी करणे आवश्यक आहेत. त्यानुसार खालील प्रमाणे प्रादेशिक कार्यालयाने मागणी नोंदविण्यात आलेली आहे.

**सर्व प्रादेशिक व उपप्रादेशिक कार्यालयाने संगणक व प्रिंटर संचाची मागणी नोंदविली आहे.**

संख्या नगमध्ये

| अ.क्र. | कार्यालयाचेनाव | संगणकमागणी | प्रिंटरमागणी |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| ०१. | प्रादेशिक कार्यालय, नंदुरबार | ११ | ११ |
| ०२. | प्रादेशिक कार्यालय, जुन्नर | ०७ | ०७ |
| ०३. | प्रादेशिक कार्यालय, गडचिरोली | १७ | १० |
| ०४. | प्रादेशिक कार्यालय, चंद्रपुर | १४ | १० |
| ०५. | प्रादेशिक कार्यालय, यवतमाळ | १५ | १५ |
| ०६. | प्रादेशिक कार्यालय, नाशिक | १२ | १२ |
| ०७. | प्रादेशिक कार्यालय, जव्हार | १५ | १५ |
| ०८. | प्रादेशिक कार्यालय, भंडारा | ११ | ११ |
| ०९. | प्रादेशिक कार्यालय, धारणी | ०७ | ०३ |
| १०. | उपप्रादेशिक कार्यालय, अहेरी(उच्चश्रेणी) | ५ | ५ |
| | सर्व प्रादेशिक व उपप्रादेशिक कार्यालयातील संगणक व प्रिंटरची मागणीची एकूण संख्या- | ११४ | ९९ |

वरील प्रमाणे प्रादेशिक कार्यालय- सर्व व त्याअंतर्गत येणा-या उपप्रादेशिक कार्यालयांनी उपरोक्त प्रमाणे एकुण ११४ नग संगणक संचाची व ९९ नग प्रिंटरची संचाची मागणी नोंदविण्यात आली आहे.

दिनांक ३१.०३.२०२१ अखेर माहीती व तंत्रज्ञान (IT) शिर्षका मध्ये ३.०५/-कोटी रुपये निधी शिल्लक आहे. त्यामुळे सदरचा खर्च भागविता येईल. मुख्यालया मार्फ़त केंद्रशासनाच्या GeM पोर्टल वरून सर्वप्रादेशिक व उपप्रादेशिक कार्यालया करीता संगणक व प्रिंटर खरेदीची प्रक्रिया बीड पध्दतीने राबविण्यात यावी असे मत आहे.

दिनांक २२जानेवारी. २०२१ च्या संचालक मंडळ सभेतील मंजुर टराव क्र.३९ अन्वये मुख्य कार्यालयसाठी ऑल इन वन संगणक ३४ नग व ऑल इन वन प्रिंटर ०६ नग खरेदीसाठी केंद्रशासनाचे GeM portal वर निविदा राबविण्यात आली आहे सदर खरेदीसाठी रुपये ३० लाख खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च वगळुन आज अखेर माहीती व तंत्रज्ञान (IT) शिर्षका मध्ये २.७७ कोटी निव्वळ निधी शिल्लक असणार आहे.

वरील प्रमाणे संगणक व प्रिंटर खरेदी करणे करीता खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | तपशिल | नग | अंदाजेदर(प्रतीनग) | एकूणरक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | AllinonePC | ११४ | ७५,०००/- | ८५,५०,०००.०० |
| ०२ | MultiFunctionPrinter | ९९ | ३०,०००/- | २९,७०,०००.०० |
| | | | एकूण | १,१५,२०,०००.०० |

करीता सर्व प्रादेशिक व उपप्रादेशिक कार्यालया यांना ११४ नग संगणक व ९९ नग प्रिंटर खरेदी करणेसाठी अंदाजे एकुण १.१६ कोटी रुपये निधीची आवश्यकता असणार आहे.

तरी कृपया उपरोक्त बाबींचे अवलोकन होऊन सदर संगणक व प्रिंटर खरेदी करणेस व होणा-या खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणे करिता सदरचा विषय संचालक मंडळ सभेपुढे सादर करण्यात येत आहे.

**ब) मुख्यालयातील विपणन, वित्त विभाग व प्रादेशिक कार्यालयासाठी नविन झेरॉक्स मशिन खरेदी करणे बाबत.**

म.रा.सह. आदिवासी विकास महामंडळ ही प्रवर्तक असलेली सेवाभावी संस्था असुन महामंडळाचा मुख्य उद्देश राज्यातील आदिवासींची आर्थिक पिळवणूक थांबून त्यांचा विकास घडवुन आणणे हा आहे. या उद्देशाच्या अनुषंगाने महामंडळाचे एकूण १० प्रादेशिक व ३५ उप प्रादेशिक कार्यालय कार्यरत आहेत.

महामंडळामार्फ़त आधारभुत खरेदी योजना, एकाधिकार खरेदी योजना, खावटी अनुदान योजना गौणवनउपज खरेदी योजना व इतर योजना राबविल्या जातात. आधारभुत खरेदी योजना धान खरेदीचे तसेच शेतक-यांचे पेमेंट हे इत्यादी कामाचे NEML Portal वर online राबविण्यात येत आहे.

वरील योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी मुख्यालयाती प्रशासन, वित्त व विपणन विभाग व सर्व प्रादेशिक कार्यालयांना यापुर्वी सन २०११-१२ मध्ये कॅनन कंपनीचे Image Runner २५२५ मॉडेल असलेले झेरॉक्स मशीन मुख्य कार्यालयातील प्रशासन, वित्त, विपणन व सर्व प्रादेशिक कार्यालय येथे मुख्यालयामार्फ़त खरेदी करुन पुरवठा करण्यात आलेले आहे.

आज अखेरीस सदरचे मशिनवर जवळपास ६ ते ७ लाख प्रिंटस/कॉपीज काढण्यात आल्या आहेत. सदर मशिनचे खरेदी करून १० ते ११ वर्ष येवढा कालावधी झाला असल्याने मशिन वारंवार नादुरुस्त होऊन बंद पडत आहे. व मशिन दुरुस्ती करणे करीता अधिकचा खर्च करावा लागत आहे. मशिन बंद पडत असल्याने कार्यालयीन कामकाज करणे करीता अडचणी निर्माण होत आहे. व वेळेचा देखिल अपव्यय होत आहे.

**खालील प्रमाणे नविन झेरॉक्स मशिन खरेदी करणे बाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.**

(संख्या नग मध्ये)

| अ.क्र. | कार्यालयाचे / विभागाचे नाव | झेरॉक्स मशिन संख्या |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| ०१ | वित्त विभाग, मुख्य कार्यालय, नाशिक | १ |
| ०२ | विपणन विभाग, मुख्य कार्यालय, नाशिक | १ |
| ०३ | प्रादेशिक कार्यालय, नाशिक | १ |

| | | |
|---|---|---|
| ०४ | प्रादेशिक कार्यालय, जुन्नर | १ |
| ०५ | प्रादेशिक कार्यालय, जव्हार | १ |
| ०६ | प्रादेशिक कार्यालय, नंदुरबार | १ |
| ०७ | प्रादेशिक कार्यालय, यवतमाळ | १ |
| ०८ | प्रादेशिक कार्यालय, गडचिरोली | १ |
| ०९ | प्रादेशिक कार्यालय, धारणी | १ |
| १० | प्रादेशिक कार्यालय, चंद्रपुर | १ |
| ११ | उप प्रादेशिक कार्यालय, अहेरी (उच्च श्रेणी) | १ |
| | **एकूण** | **११ नग** |

वरील प्रमाणे मुख्यालयात विपणन, वित्त विभाग व प्रादेशिक कार्यालयांना उपरोक्त प्रमाणे एकुण **११ नग इझेरॉक्स मशिन संचाची आवश्यक्ता आहेत.**

**झेरॉक्स मशिनचे Specification खालील प्रमाणे.**

| Sr.No. | Specification | Image Runner २६२५ | Image Runner ४७२५ |
|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ |
| ०१ | Print, Copy Scan | Yes (with Send) | Yes (with Send, Storage ) |
| ०२ | PPM | २५ (A४) | २५ (A४) |
| ०३ | RAM | २.०GB | ३.०GB |
| ०३ | Storage | None | ३२०GB (Up to १TB) |
| ०४ | Duplex | Yes Standard | Yes Standard |
| ०५ | WI-FI | Yes | Yes |
| ०६ | USB | Yes ३.० | Yes ३.० |
| ०७ | Fax | Yes (option) | Yes (option) |
| ०८ | Ethernet | Yes | Yes |
| ०९ | File Support | Yes, PDF,TIFF,JPEG,XPS | Yes, PDF,TIFF,JPEG,XPS |
| १० | Drum Unit Print Capacity | १,७०,००० | ३,१४,००० |
| ११ | Toner Cartridge Print | ३०,००० | ४२,१०० |
| १२ | Approx Machine Life (Copy) | १०,००,००० | १२,००,००० |
| १३ | **अंदाजे किंमत** | १,८५,०००/- | २,६०,०००/- |

दिनांक ३१.०३.२०२२ अखेर MSP योजने अंतर्गत प्रशासकीय खर्च शिर्षकामध्ये १०/-कोटी रुपये निधी शिल्लक आहे. त्यातुन सदरचा खर्च भागविता येईल.

मुख्यालयामार्फ़त केंद्र शासनाच्या GeM पोर्टलवरून वरिल प्रमाणे झेरॉक्स मशिन खरेदीची प्रक्रिया बीड पध्दतीने राबविण्यात यावी असे मत आहे.

**नविन झेरॉक्स मशिन खरेदीचा तपशिल खालील प्रमाणे.**

| **अ.क्र.** | **कंपनीचे नाव** | **मॉडेल** | **नग** | **प्रति नग किंमत** | **अंदाजे किंमत** |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | कॅनन | Image Runner २६२५ | ०९ | १,८५,०००/- | **१६,६५,०००.००** |
| ०२ | | Image Runner ४७२५ | ०२ | २,६०,०००/- | **५,२०,०००.००** |
| | | | | एकुण | **२१,८५,०००.००** |

केंद्र शासनाच्या GeM पोर्टलवर वरील झेरॉक्स मशिन उपलब्ध असुन त्याचे अंदाजित खर्चाचे २२ लाख रु आहे.

मुख्यालयातील वित्त व विपणन विभागाच्या कार्यालयीन वापराच्या/ सोईच्या व आधीच्या मशिनच्या दृष्टीने उच्च प्रतिचे असल्याने अ.क्र. ०३ मधील Canon Image Runner ४७२५ (एकूण ०२ नग) हे योग्य असुन प्रादेशिक कार्यालयासाठी अ.क्र. ०२ मधील Canon Image Runner २६२५ (एकूण ०९ नग) मशिन खरेदी करणे उचित राहील असे वाटते.

तरी कृपया उपरोक्त बाबींचे अवलोकन होऊन सदर झेरॉक्स मशिन खरेदी करणेस व होणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणे करिता सदरचा विषय संचालक मंडळ सभेपुढे सादर करण्यात येत आहे.

उपरोक्त विषयाचे महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी सविस्तर वाचन करुन सदर विषय मंजूरी करीता सभेपुढे सादर केला. सदर विषयावर सविस्तर चर्चा झाली. उपरोक्त विषयाचे महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी सविस्तर वाचन करुन सदर विषय मंजूरी करीता सभेपुढे सादर केला. सदर विषयावर चर्चा करतांना मा. भुसारा सो. यांनी सूचना मांडली की, मागील कोरोना कालावधी पुर्वी सर्व संचालकांसाठी लॅपटॉप संगणक खरेदी करण्यांत आले होते. मात्र संचालकांना अद्यापपावेतो Laptop भेटलेला नाही. यावर महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी माहीती दिली की, सहकार विभागाकडुन माहीती घेतली असता पोटनियमानुसार संचालकांना भेटवस्तु स्वरुपात काही देता येणार नाही. तथापी त्यांचे कार्यकालावधी पर्यंत कार्यालयीन कामासाठी लॅपटॉप देता येईल. तसेच त्या कालावधीत कोराना संक्रमण कालावधीमुळे सभा न झाल्याने तसेच लॅपटॉपची वारंटी संपत आल्या कारणाने सदरचे लॅपटॉप वर्क फ्रॉम होम कालावधीतील कामकाजासाठी मुख्यालयातील कर्मचारी कार्यालयीन कामकाजासाठी सदरचे लॅपटॉप वापरत आहेत. यावर मा.श्री.भुसारा सो. यांनी सद्याच्या काळात अनेक वेळा व्हिडीओ कॉन्फरन्सींगद्वारे बैठका आयोजित केल्या जातात. अनेक संचालकांकडे ॲन्ड्रॉइड फोन नसल्याने मिटींगला हजेरी लावता येत नाही. त्यामुळे सर्व संचालकांना I-Pad / Laptop खरेदी करावे, अशी सुचना मांडली. यावर मा. अध्यक्ष महोदय यांनी सूचीत केले की, मा. संचालकांना त्यांचे कार्यकाळ समाप्त झाल्यावर परत करण्याच्या अटीवर Laptop उपलब्ध करुन द्यावे, तथापी यावर मा. भुसारा सो. यांनी म्हटले की, लॅपटॉप नेहमी सोबत घेऊन फिरणे अवघडीचे असल्याने कार्यरत संचालक सदस्यांना प्रत्येकी एक आयपॅड खरेदी करुन देण्यात यावा. सदर विषयावर सांगोपांग चर्चा होऊन खालील प्रमाणे ठराव संमत करण्यांत आला.

**ठराव क्रमांक ३३ :** वरीलप्रमाणे नमुद सर्व खरेदीसाठी खरेदीसाठी शासनाच्या नियमानुसार (शासन निर्णयानुसार) कार्यवाही करणेसाठी मंजुरी देण्यात येत आहे. तसेच, मा. संचालकांना त्यांचे कार्यकाळ समाप्त झाल्यावर परत करण्याच्या अटीवर आय पॅड / Laptop खरेदी करुन उपलब्ध करुन द्यावे, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात येत आहे.

**सुचक** :- **मा.श्री.अशोक मंगाम, संचालक**

**अनुमोदक** :- मा.श्री. भरतसिंग थुकेलसिंग दुधनाग, संचालक.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक ३४ : महामंडळातील कर्मचाऱ्यांना सन २०२१-२२ साठी बोनस व सानुग्रह अनुदान मंजुर करणेबाबत.**

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळासाठी बोनस प्रदान अधिनियम- १९६५ पासून लागू असल्याने महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना बोनस प्रदान अधिनयम- १९६५ च्या कलम - १० नुसार आणि

संदर्भिय पत्रातील शिफाशीनुसार कमीतकमी ८.३३% इतका बोनस देणेची तरतुद आहे. शासनाने आदिवासी विकास विभागाचे पत्र क्र. संकीर्ण- १०८७/प्र.क्र.५७/का.३ दिनांक ११.०२.१९८८ अन्वये तसे महामंडळास कळविले असून, त्यानुसार ८.३३% दराने कर्मचाऱ्यांना बोनस देण्यास शासनाचे पत्र आहे. तसेच शासनाचे वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र.शायाक्र.१०९८/प्र.क्र.२७/९८सा.दु.दिनांक ०३.१०.१९९८ नुसार शासनाने बोनसअधिनियम- १९६५ लागू असलेल्या उपक्रमांनी कायद्यानुसार बोनस अदा करणेस कळविले असून, त्यासाठी शासनाच्या पूर्वसंमतीची आवश्यकता असणार नाही असेही कळविले आहे. त्यानुसार बोनस ॲक्टप्रमाणे ८.३३% बोनस तसेच नफयाच्या २५% सानुग्रह अनुदान मंजुर करावे, अशी महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ कर्मचारी संघटना, नाशिक यांनी त्यांचे पत्र क्र.४५/२०, दिनांक ०७.०९.२०२२ नुसार विनंती केली आहे.

कर्मचारी संघटनेने त्याचे पत्रात नमुद केल्याप्रमाणे महामंडळास बोनस सप्रदान अधिनियम- १९६५ हा महामंडळास लागू आहे. तसेच शासनानेही परिच्छेद क्र. १ मध्ये नमुद केलेल्या शासनाचे पत्राप्रमाणे ८.३३% दराने बोनस अदा करण्यास मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार बोनस निनियमातील तरतुदीनुसार पात्र कर्मचाऱ्यांना रुपये ३५००/- बोनस मागील वर्षी (सन २०१८-२०१९) अदा केला आहे. त्यानुसार सन २०२१-२२ या वर्षासाठी पात्र कर्मचाऱ्यांना महामंडळास होणाऱ्या नफयाच्या अनुषंगाने बोनस व सानुग्रह अनुदान मंजुरी होवुन मिळणेकरीता सदरचा विषय मा.संचालक मंडळास सविनय सादर.

उपरोक्त विषयाचे महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी सविस्तर वाचन करुन सदर विषय मंजूरी करीता सभेपुढे सादर केला. यावर मा. गणेश सुकाळे, संचालक, कर्मचारी संघटना प्रतिनीधी यांनी सूचना मांडली की, सन २०१९-२० व सन २०२०-२१ या कालावधीतील बोनस व सानुग्रह अदायगीस संचालक मंडळाने मंजुरी दिलेली आहे. इतिवृत्त मंजुर असुन देखिल पात्र अधिकारी/कर्मचारी यांना त्याचा लाभ मिळालेला नाही. यावर मा. अध्यक्ष महोदय यांनी विचारणा केली की, सदरचे लाभ देण्यासाठी महामंडळाकडे पुरेसा निधी उपलब्ध आहे का, यावर श्री.एम.एम. शर्मा, व्यवस्थापक (लेखा) यांनी माहीती दिली की, सदरचा लाभ देण्यासाठी महामंडळाकडे निधी शिल्लक आहे. मा. अध्यक्ष महोदय यांनी विचारणा केली की, जर इतिवृत्त मंजुर आहे तर अद्याप त्याचा लाभ अधिकारी/कर्मचारी यांना दिला का नाही. यावर मा. महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी माहीती दिली की, मागील इतिवृत्तावर मंजुरी उशिराने मिळाल्याने अद्याप बोनस व सानुग्रह चा लाभ अधिकारी / कर्मचारी यांना देणे बाकी आहे.

सदर विषयावरी सविस्तर चर्चा होवून खालीलप्रमाणे ठराव बहुमताने मंजूर करण्यात आला.

**ठराव क्रमांक ३४** : सदर विषयाबाबत सांगोपांग चर्चा झाली. सदर २०२१-२२ या वर्षासाठी पात्र कर्मचाऱ्यांना महामंडळास होणाऱ्या नफ्याच्या अनुषंगाने बोनस व सानुग्रह अनुदान देण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे. तसेच, मागील २ वर्षांचा बोनस व सानुग्रहाचा लाभ पात्र कर्मचाऱ्यांना देण्यासाठी मंजुरी देण्यात आली असल्याने त्यांना मागील २ वर्षांचा (२०१९-२०, २०२०-२१), या वर्षाचा असे एकुण ३ वर्षांचा लाभ या दिवाळीत अदा करण्यासाठी सदरची सभा मंजुरी देत आहे.

**सुचक** :- मा.श्री.सुनिल भुसारा, संचालक
**अनुमोदक** :- मा.श्री. भरतसिंग थुकेलसिंग दुधनाग, संचालक.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक ३५ : महामंडळातील अधिकारी /कर्मचारी यांचे १ वर्षावरील प्रवास दैनंदिनीस मंजुरी देणे.**

आदिवासी विकास महामंडळ मर्या.प्रादेशिक व्यवस्थापक यांच्या २०१४-१५ ते आक्टोंबर २०२१ पर्यंत च्या प्रवास दैनंदिनी प्रलंबित आहे.त्यांची यादी सोबत जोडली आहे.

| अ क्र | अधिकाऱ्यांचे नाव व पदनाम | प्रादेशिक कार्यालयाचे / उपप्रादेशिक कार्यालयाचे नाव सादर दिनांक | प्रवास दैनंदिनींचा कालावधी | त्रूटीस्तव परत पाठविलेल्या प्रवास दैनंदिनी |
|---|---|---|---|---|
| १. | श्री.एन.एन. रणमाळे, प्रा.व्य.धारणी | प्रादेशिक कार्यालय नंदुरबार | जानेवारी २०१४ ते सप्टेंबर २०१५ | प्रा.का.नंदुरबार जा.क्र.१५९/२०२२ दि: २६/०५/२०२२ |
| | | प्रादेशिक कार्यालय, यवतमाळ | आक्टोंबर २०१५ ते मे २०१८ | प्रा.का.यवतमाळ च पत्र क्रमांक:५१६/२०१९ दिनांक:०६/०७/२०१९ |
| | | प्रादेशिक कार्यालय जव्हार | जुलै २०१८ ते आक्टोंबर २०१८ | प्रा.का.जव्हारचे पत्र क्रमांक ११७८/२०२१ दिनांक: १७/०८/२०२१ |
| २. | श्री.एन.झेड. येरमे, महा.व्य.गोंडवन | प्रादेशिक व्यवस्थापक यवतमाळ | मार्च २०२० ते डिसेंबर २०२० | प्रा.का.यवतमाळ यांचे पत्र क्रमांक:१०८९/२०२० दिनांक:३१/१२/२०२० |
| | | महाव्यवस्थापक गोंडवन | जानेवारी २०२१ ते डिसेंबर २०२१ | वि.का.नागपुरचे पत्र क्रमांक:९६६/२०२१ दिनांक: ०७/०४/२०२१ |
| ३. | श्री.एस.एम. अंबाडकर, प्रा.व्य.यवतमाळ | | डिसेबर २०१९ ते मार्च २०२० | प्रा.का.चंद्रपुर यांचे पत्र क्रमांक :२५३/२०२० दिनांक: २९/०५/२०२० |
| | | | माहे मे २०१९ ते जुलै २०१९ | प्रा.का.भंडारा यांचे पत्र क्रमांक :१६७६/२०१९ दिनांक: २१/०९/२०१९ |
| | | | जानेवारी २०२१ ते सप्टेंबर २०२१ | प्रा.का.यवतमाळ यांचे पत्र क्रमांक:५४१/२०२१ दिनांक:२२/०७/२०२१ |
| ४ . | श्री.जे.एस.राठोड प्रा.व्य.नाशिक | | जानेवारी २०१९ ते डिसेंबर २०१९( सादर केली आहे) | प्रा.का.नाशिक चे पत्र क्रमांक ५७२/२०२० दिनांक: ०६/१०/२०२० |
| ५. | श्री.व्हि.एस.गांगुर्डे प्रा.व्य.जव्हार तथा महा.व्य.विपणन | १)७७५/२०१९ १९/११/२०१९ वि.का.नागपुर | आक्टोंबर २०१८ ते फेब्रुवार २०१९ | प्रा.का.जुन्नर पत्र क्र.४४५/२०१९ दि:१९/११/२०१९ |
| | | २) ७७५/२०१९ १९/११/२०१९ प्रा.का.जुन्नर | फेब्रुवारी २०१९ ते आक्टोंबर २०१९ | प्रा.का.जुन्नर पत्र क्र.४४५/२०१९ दि:१९/११/२०१९ |
| | श्री.जे.पी.राजुरकर | उपप्रादेशिक कार्यालय गोंडपिपरी | माहे एप्रिल २०१९ ते सप्टेंबर २०१९ | प्रा.का.चंद्रपुरचे पत्र क्रमांक १५१४/२०२० दि:०६/०२/२०२० |
| | | प्रादेशिक कार्यालय गडचिरोली/चंद्रपंर | माहे आक्टोंबर २०१९ ते मार्च २०२० | प्रा.का.चंद्रपुरचे पत्र क्रमांक ४२/२०२० दि:१३/०४/२०२० |
| ७. | श्री.एस.एस.संबारे | प्रादेशिक कार्यालय धारणी | माहे मार्च २०१६ ते डिसेंबर २०१६ | प्रा.का.धारणीचे पत्र क्रमांक ४१ /२०१६ दिनांक १२/०४/२०१६ |
| | | मुख्य कार्यालय नाशिक | माहे जानेवारी २०१७ ते मे २०१७ | श्री.एस.एस.संबारे याचे पत्र दिनांक १९/७/२०१९ |
| | | प्रादेशिक कार्यालय भंडारा | माहे सप्टेंबर २०२१ ते आक्टोंबर २०२१ | प्रा.का.भंडारा पत्र क्रमांक १०५/२०१६ दिनांक ०६/४/२०२२ |

उपरोक्त नुसार प्रादेशिक व्यवस्थापक यांच्या प्रलंबित प्रवास दैनंदिनी मंजुरी मिळावी करीता आगामी मा.संचालक मंडळ सभेत सदरचा विषय सादर करण्याच्या मान्यतेस सादर.

उपरोक्त विषयाचे महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी सविस्तर वाचन करुन सदर विषय मंजूरी करीता सभेपुढे सादर केला. सदर विषयावर सविस्तर चर्चा झाली. सदर मा.संचालकांना रक्कम रु.९/- प्रति कि.मी. एवढा प्रवास भत्ता मंजुर आहे. मात्र, सदरचा प्रवास भत्ता खुप वर्षांपासुन तोच आहे. आज रु.९/- इतका प्रवास भत्ता परवडत नाही. म्हणुन मा.संचालकांनाही सदरचा प्रवास भत्ता वाढवुन मिळणेबाबत मा.अध्यक्ष महोदय यांनी सुचित केले.

**ठराव क्रमांक ३५ :** सदर विषयाबाबत सांगोपांग चर्चा झाली. सदर विषयात नमुद असलेल्या प्रादेशिक व्यवस्थापक यांच्या प्रलंबित प्रवास दैनंदिनी मंजुरी देण्यात येत आहे. तसेच, मा.संचालकांनाही त्यांना देय असलेल्या प्रवास भत्यात वाढ करणेबाबत प्रस्ताव तयार करुन शासनास पाठविणेच्या दृष्टीने आगामी सभेत विषय ठेवणे बाबत मंजुरी देण्यात येत आहे.

**सुचक** :- मा.सौ.मिनाक्षीताई वट्टी, संचालक
**अनुमोदक** :- मा.श्री.मधुकर निंबाजी काठे, संचालक.
**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक ३६ : म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळास सन २००९-१० ते सन २०१५-१६ पर्यंत भागभांडवलातुन प्राप्त रक्कमेच्या विनियोजना बाबत.**

म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळास सन २००९-२०१० ते २०१५-१६ पर्यंत भागभांडवलापोटी एकुण रुपये ४१८१.६५ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. त्यामध्ये विविध ठिकाणची गोदामे बांधकाम, गोदाम व कार्यालय दुरुस्ती, गोदामांस संरक्षक भिंत बांधणे तसेच अवसायनातील संस्थांकडील गोदामे व जागा खरेदी, संगणक खरेदी इत्यादी बाबींचा समावेश होता.

प्राप्त निधीपैकी आज अखेर खालील बाबींवर खर्च झालेला आहे.

( रु. लाखात )

| अ.क्र. | निधी प्राप्त वर्ष | तपशिल | झालेला खर्च |
|---|---|---|---|
| १. | २००९-१० | आरमोरी, नवेगांव व राजापुर पॅच (बोरी ) जिल्हा गडचिरोली गोदाम बांधकाम | ६३४.८८ |
| २. | २०११-१२ | प्रादेशिक कार्यालय जव्हार संरक्षक भिंत व कार्यालय दुरुस्ती | ३२.०० |
| ३. | | मुख्यालय व क्षेत्रिय कार्यालयांसाठी संगणक व इतर उपवस्तु खरेदी | ६१.७९ |
| ४. | | कोरची जि. गडचिरोली येथे शासकीय जागा उपलब्ध होत नसल्याने प्राप्त रक्कम शासन मान्यतेने गडचिरोली जिल्ह्यात ७ ठिकाणी शासकीय जागा खरेदीसाठी शासकीय शुल्क | २५३.१९ |
| ५. | २०१२-१३ | प्रादेशिक कार्यालय, भंडारा विभागात अवसायनातील ३ संस्थांची गोदामे खरेदीसाठी प्रादेशिक कार्यालयास रक्कम वर्ग | १२.१२ |
| ६. | १०१३-१४ | प्रादेशिक कार्यालय, जुन्नर विभागात अवसायनाती २ संस्थांची गोदामे व जागा खरेदीसाठी व मोजणी साठी निधी वर्ग | ४०.४१ |
| ७. | | प्रादेशिक कार्यालय, नाशिक विभागात अवसायनाती ४३ संस्थांची गोदामे व जागेची मुल्यांकन फी | २.८० |
| | | **एकुण झालेला खर्च झालेला निधी** | **१०३७.१९** |

उपरोक्त खर्च झालेल्या निधीचा तपशिल खालील प्रमाणे

(रुपये लाखात)

| अ.क्र. | तपशिल | प्राप्त रक्कम | झालेला खर्च | शिल्लक रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | सन २००९-१० ते २०१५-१६ मध्ये एकुण प्राप्त रक्कम | ४१८१.६५ | १०३७.१९ | ३१४४.४६ |
| २. | गचिरोली जिल्ह्यात ७ पैकी ६ ठिकाणी सुरु असलेल्या गोदाम बांधकामासाठी सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) यांना शिल्लक रक्कमेतुन निधी वर्ग | | १२६०.०० | १८८४.४६ |

२.. सन २०१५-१६ साठी शासनाने भागभांडवलातुन महामंडळास रुपये १०.०० कोटी वितरीत केलेले आहेत. त्यामधुन शासन निर्णय क्र. आविम-२०१५/प्र.क्र.२१/का.३ दि. ०३ जुलै, २०१७ अन्वये देवरी जि. गोंदिया येथे गोदाम बांधकामासाठी रु. ३.०० कोटी विनियोजनास मान्यता देण्यात आलेली आहे. तथापी उर्वरीत रु. ७.०० कोटी महामंडळाकडे शिल्लक असलेल्या रक्कमेच्या विनियोजनास शासनाकडे वारंवार पाठपुरावा करुन देखिल मान्यता अप्राप्त आहे.

सदर रुपये ७.०० कोटी मधुन शासनास कळविण्यांत आलेल्या खर्चाच्या बाबी खालील प्रमाणे आहेत.

| अ.नं. | तपशिल | प्रशासकीय मान्यतेसाठी रक्कम रुपये लाखात |
|---|---|---|
| १. | मुख्य कार्यालय व क्षेत्रिय कार्यालयांसाठी नवीन संगणक व प्रिंटर्स खरेदी रुपये ११७.०७ लक्ष, सी.एम.एस. वर आधारीत नवीन वेबसाईट तयार करणे रु. १०.०० लक्ष व योजनेचे संगणक आज्ञावली विकसित करणे करणेसाठी रु. ५०.०० लक्ष तसेच महामंडळाचे क्षेत्रिय कार्यालयामध्ये शासन निर्णय दि.२७.१०.२०१० अन्वये बायोमॅट्रीक मशिन बसविणे रु.८.६० लक्ष | १८५.६७ |
| २. | प्रादेशिक कार्यालय गडचिरोली कार्यालय, एम.आय.डी.सी. नवेगांव गडचिरोली येथील गोदामाशेजारी कार्यालय बांधकाम करणेसाठी रु. १५०.३८ लक्ष | १५०.३८ |
| ३. | अ) प्रादेशिक कार्यालय, नाशिक येथील नुतनीकरण तसेच मुख्य कार्यालय, नाशिक येथे संचालक कक्ष व मा. मंत्री तथा अध्यक्ष यांचे दालन, नाशिक रुपये १४५.०० लक्ष<br>ब) प्रादेशिक कार्यालय, जव्हार नुतनीकरणासाठी रु. ८८.०० लक्ष<br>क) प्रादेशिक कार्यालय, यवतमाळ येथे एम.आय.डी.सी. कडुन खरेदी करण्यांत आलेले कार्यालय नुतनीकरणासाठी रु.२५.०० लक्ष | २५८.०० |
| ४. | मुख्य कार्यालय व सर्व क्षेत्रिय कार्यालयास (गोदामासह) रेकॉर्ड ठेवण्यासाठी रॅक रुपये ५५.०० लक्ष, रेकॉर्डरुम व अनुषंगीक खर्च रुपये ५०.९५ लक्ष | १०५.९५ |
| | एकुणांत | ७००.०० |

सबब गडचिरोली जिल्ह्यात ६ गोदामे बांधकामासाठी शासनाकडुन अद्यापपर्यंत निधी प्राप्त न झाल्यामुळे उपरोक्त प्रमाणे शिल्लक रुपये ३१४४.४६ लक्ष मधुन सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) मंडळ, नागपूर यांना रुपये १२.६० कोटी इतका निधी वर्ग केलेला आहे. त्यास संचालक मंडळाची मान्यता असावी.

तसेच सन २०१५-१६ मध्ये भांगभांडवलातुन प्राप्त निधीपैकी शिल्लक रु. ७००.०० लक्ष मधुन उपरोक्त प्रमाणे बाबींस मान्यता असावी. सदर विषयावर सांगोपांग चर्चा होऊन खालील प्रमाणे ठराव संमत करण्यांत आला.

**ठराव क्रमांक ३६** : सदर विषयात नमुद बाबींवर निधीची विनियोजनास शासनास पाठविणेच्या प्रस्तावास ही सभा मंजुरी देत आहे. तसेच अखर्चित निधीमधुन केलेल्या खर्चास ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक** :- मा.श्री. सुनिल चंद्रकांत भुसारा

**अनुमोदक** :- मा.श्री. भरतसिंग थुकेलसिंग दुधनाग, संचालक.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्र.३७ : सन २०२१-२०२२ चे दिनांक ३१.०३.२०२२ अखेरचे वार्षिक हिशोबपत्रके, व्यापारी पत्रक, नफा तोटा पत्रक, ताळेबंद व वार्षिक अहवालास मंजूरी मिळणे बाबत.**

महामंडळाचे आर्थिक वर्ष सन २०२१-२०२२ (दिनांक ०१.०४.२०२१ ते ३१.०३.२०२२) या कालावधीचा आर्थिक अहवाल सादर करण्यात येत आहे.

महामंडळ राबवित असलेल्या उपक्रमाचे सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाचे हिशोबपत्रके तयार करुन ती स्वतंत्र सात भागात दर्शविण्यात आलेली आहे.

१. एकाधिकार खरेदी योजना व सामान्य योजनेची एकत्रित परिणाम

२.आधारभूत किंमत खरेदी योजना

३. गौणवनोपज किमान आधारभूत किंमत खरेदी योजना (केंद्रशासन)

४. किंमत स्थिर योजना (नाफेड तुर)

५. खावटी कर्ज वाटप योजना

६. न्युक्लियस बजेट कर्ज वाटप योजना

७. खावटी अनुदान योजना

खावटी कर्ज वाटप व न्युक्लियस बजेट योजना शासन समप्रवर्तक निधीवर आधारीत असल्यामुळे सदर दोन्ही योजनांची आर्थिक हिशोबपत्रके स्वतंत्रपणे दर्शविण्यात आलेली आहे.

सन २०२१-२०२२ मध्ये शासनाने खावटी अनुदान योजनेचे कीट महामंडळा मार्फत वाटप करण्यात आले, हि योजना देखिल शासनाच्या समप्रर्वतक निधीवर आधारीत असल्यामुळे सदरचे योजनांचे आर्थिक हिशोब पत्रके अहवालात स्वतंत्रपणे दर्शविण्यात आलेली आहे.

तथापी आधारभूत किंमत खरेदी योजना राज्य शासनाचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे अभिकर्ता म्हणून महामंडळामार्फत राबविण्यात येत असल्यामुळे या योजनेतील खरेदी केलेल्या मालाचे हस्तांतरण शासनाचे निर्देशाप्रमाणे होत असल्यामुळे व त्यावर मिळणारा तात्पुरता स्वरुपात अनुषंगिक खर्चही (Incidential Charges) शासनाकडून निश्चित केलेल्या दराने अभिकर्त्यास दिला जातो त्यामुळे आधारभूत किंमत खरेदी योजनेचे लेखे वार्षिक अहवालात स्वतंत्र दर्शविण्यास आलेले आहेत.

तसेच गौणवनोपज किमान आधारभूत किंमत खरेदी योजना (केंद्रशासन) या योजनेत तोटा आल्यास ७५% केंद्र शासन व २५% राज्य शासनाकडून प्रतिपूर्ती होणार असल्यामुळे या योजनेचे हिशोबपत्रके स्वतंत्र दर्शविण्यात आले आहेत.

खरिप पणन हंगाम मध्ये केंद्र शासनाच्या किंमत स्थिर योजने अंतर्गत नाफेड मार्फत हमी दराने अभिकर्ता म्हणुन महामंडळा मार्फत तुर खरेदी करण्यात आली असल्याने व नाफेड कडुन याची प्रतीपुर्ती होणार असल्याने या योजनेचे हि...बपत्रके सुध्दा स्वतंत्र दर्शविण्यात आले आहेत.

**योजनानिहाय तरतूदीपूर्वी झालेला व्यापारी व निव्वळ नफा खालील प्रमाणे आहे.**

| अ. क्र | उपक्रमाचे नाव | व्यापारी नफा | व्यापारी तोटा | निव्वळ नफा |
|---|---|---|---|---|
| १ | एकाधिकार खरेदी योजना | ०.०० | (-) ७,०७,५९,१०३.९७ | ५,४१,६८,३९७.१५ |
| | सामान्य योजना | ०.०० | (-) ५३,०५०.०० | ५,३५,९९८.१८ |
| | **एकूण अ** | **०.००** | **(-) ७०८१२१५३.९७** | **५,४७,०४,३९५.३३** |
| २ | आधारभूत किंमत खरेदी योजना | ३,८५,७९,३३४.४३ | ०.०० | ३,४८,३६,६५६.३३ |
| | **एकूण ब** | **३,८५,७९,३३४.४३** | **०.००** | **३,४८,३६,६५६.३३** |
| ३ | **केंद्र शासन गौणवनोपज किमान आधारभुत किंमत खरेदी योजना.** | | **(-) २१,३४३.९०** | **(-) २७५४६.८०** |
| ४ | **किंमत स्थिर योजना (नाफेड तुर)** | **०.००** | **०.००** | **०.००** |

१) एकाधिकार खरेदी योजना व सामान्य योजनेत खालीलप्रमाणे तरतूदी प्रस्तावित करण्यात येत आहेत. आर्थिक वर्ष २०२१-२०२२ अखेर तरतूदी करणेचे प्रस्तावित करण्यात येत असून त्यास मान्यता मिळावी.

| अ.क्र | योजना | तपशिल | निव्वळ नफयातून तरतूदीची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | एकाधिकार खरेदी योजना व सामान्य योजनेतील एकत्रित झालेल्या नफयातून मुख्य कार्यालय एकाधिकार खरेदी योजनेच्या लेख्यांमध्ये घ्यावयाची तरतूद | रिझर्व्ह फंड खाते (राखीव निधी) २५% | १,३५,००,०००.०० |
| | | भागभांडवल विमोचन निधी | १४,००,०००.०० |
| | | इमारत निधी १०% | ५४,७०,०००.०० |
| | | वस्तू विकास निधी २०% पैकी Adhoc तरतुद | ५,००,०००.०० |
| | | संशयित व बुडीत कर्ज निधी | १,००,००,०००.०० |
| | | कर्ज निवारण निधी | ५,००,०००.०० |
| | | व्यापारी चढ उतार निधी | ५,००,०००.०० |
| | | माहिती व तंत्रज्ञान निधी | ५,००,०००.०० |
| | **एकूण तरतूदीची रक्कम** | | **३,२३,७०,०००.००** |

वरीलप्रमाणे एकाधिकार खरेदी योजना व सामान्य योजनेतील एकत्रित केलेल्या तरतूदीस मान्यतेनंतर शिल्लक निव्वळ नफा रु.२,२३,३४,३९५.३३ (अक्षरी रु. दोन कोटी तेवीस लाख चौतीस हजार तीनशे पंच्यान्नव रुपये व तेहतीस पैसे मात्र) येतो.

२) आधारभूत किंमत खरेदी योजनेत (PSS) खालीलप्रमाणे तरतूदी प्रस्तावित करण्यात येत आहेत.

| अ.क्र | तपशिल | व्यापारी नफ्यातून तरतूदीची रक्कम | निव्वळ नफ्यातून तरतूदीची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | संशयित व बुडीत खर्च तरतुद | ०.०० | ३,००,००,०००.०० |
| २ | अनुषंगिक खर्च तरतूद | ०.०० | ४५,००,०००.०० |
| | **एकूण तरतूद** | **०.००** | **३,४५,००,०००.००** |

३) खावटी कर्ज वाटप योजना, न्युक्लियस बजेट कर्ज वाटप योजना व खावटी अनुदान योजनेचे समवर्तक निधी व कर्ज येणे तपशिल खालीलप्रमाणे :

(रु.कोटीत)

| अ.क्र | योजना | समवर्तक निधी | कर्ज येणे |
|---|---|---|---|
| १ | खावटी कर्ज योजना | ४.९७ | निरंक |
| २ | न्युक्लियस बजेट योजना | २.०९ | ४.९७ |
| ३ | खावटी अनुदान योजना | ४१.०१ | निरंक |

उपरोक्तप्रमाणे सन २०२१-२०२२ चे हिशोबपत्रकात प्रस्तावित तरतूदी घेण्यास मान्यता मिळावी. वरीलप्रमाणे तरतूदीनंतर शिल्लक नफा खालीलप्रमाणे :

| अ.क्र | योजना | शिल्लक नफा / तोटा |
|---|---|---|
| १ | एकाधिकार गौणवनोपज व सामान्य योजना | २,२३,३४,३९५.३३ |
| २ | आधारभूत किंमत खरेदी योजना | ३,३६,६५६.३३ |
| ३ | किमान आधारभूत किंमत खरेदी योजना (MSP MFP) निव्वळ तोटा | **(-) २७,५४६.८०** |
| ४ | किंमत स्थिर योजना (नाफेड तुर) (NAFED) | ०.०० |
| | **एकुण नफा** | **२,२६,४३,५०४.८६** |

योजनानिहाय व्यापारी पत्रक, नफा-तोटा पत्रक व ३१.०३.२०२२ अखेरचे ताळेबंद पत्रक ४९ व्या वार्षिक अहवालात समाविष्ट आहे.

एकाधिकार खरेदी योजना व सामान्य योजनेच्या एकत्रित व्यापारी व नफा तोटा पत्रकानुसार गोषवारा खालीलप्रमाणे :-

(रु.कोटीत)

| आरंभीसाठा, खरेदी खर्च व नफा | रक्कम | विक्री शिल्लकसाठा व उत्पन्न | रक्कम |
|---|---|---|---|
| आरंभीसाठा | १३.७९ | विक्री | ३.३६ |
| खरेदी | ०.०० | इतर उत्पन्न | १५.२० |
| व्यापारी खर्च | ०.९१ | व्यवस्थापकीय अनुदान | २८.७२ |
| व्यवस्थापकीय खर्च | २८.७३ | शिल्लकसाठा | ४.२८ |
| घसारा (नियमीत) | २.६६ | | |
| तरतूदीपूर्वी नफा | ५.४७ | | |
| **एकूण** | **५१.५६** | **एकूण** | **५१.५६** |
| तरतूदी | ३.२४ | | |
| निव्वळ नफा | २.२३ | | |
| **एकूण** | **५.४७** | | |

एकाधिकार खरेदी योजना व सामान्य योजनेचे एकत्रित हिशोबपत्रकानुसार महामंडळास आर्थिक वर्षात निव्वळ नफा रु.५.४७ कोटी झालेला आहे. त्यामधून रु.३.२४ कोटीच्या तरतूदी केल्यानंतर शिल्लक नफा रु.२.२३ कोटी आहे.

उपरोक्तप्रमाणे सादर केलेल्या आर्थिक वर्ष २०२१-२०२२ चा वार्षिक अहवाल, व्यापारी पत्रक, नफा-तोटा पत्रक व दिनांक ३१.०३.२०२२ अखेरचे ताळेबंद मंजूरी करीता सादर करण्यात येत आहे, त्यास मंजूरी मिळावी.

उपरोक्तप्रमाणे सादर केलेल्या आर्थिक वर्ष २०२१-२०२२ चा वार्षिक अहवाल, व्यापारी पत्रक, नफा-तोटा पत्रक व ३१.०३.२०२२ अखेरचे ताळेबंद मंजूरी करीता सादर करण्यात येत आहे, त्यास मंजूरी मिळावी, असे सविस्तर वाचन महाव्यवस्थापक (वित्त) यांनी केले. सदर विषयावर सविस्तर चर्चा होवुन खालील प्रमाणे ठराव बहुमताने मंजुर करण्यात आला.

**ठराव क्र. ३७ :** सर्वानुमते ठराव समंत करण्यात येतो की, दि.३१/०३/२०२२ अखरेचे महामंडळ राबवित असलेल्या सर्व योजनांचे वार्षिक हिशोब पत्रके, उपरोक्त प्रस्तावित केलेल्या तरतुदी घेऊन सन २०२१-२०२२ च्या ४९ वा वार्षिक अहवाल , व्य .री पत्रक , नफा-तोटा पत्रक व दि.३१/०३/२०२२ रोजीचा ताळेबंदास सदर सभा मंजुरी देत आहे.

सुचक :- मा श्री. भरतलाल थुकेलसिंग दुधनाग
अनुमोदक :- मा श्री. मधुकर निबाजी काठे
ठराव सर्वानुमते मंजुर.

**विषय क्र.३८ सन २०२२-२०२३ वर्षासाठी लेखापरिक्षकाची नेमणुक करणे व लेखापरिक्षक शुल्क निश्चित बाबत.**

सहकार कायदा १९६० च्या ९७ व्या घटना दुरुस्तीतील अनुच्छेद २४३ झेड एम व महाराष्ट्र शासन अध्यादेश दि.१४.०२.२०१३ ला अनुसरुन कलम ८१ मधील सुधारणा शासन पत्र क्र. सगृयो-२०१३/३८९/प्र.क्र.५५/१४-स, सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग मंत्रालय, मुंबई दि.०४.०३.२०१३ अनुसार तसेच सहकार कायदा १९६० चे कलम ७५ (२अ) नुसार "प्रत्येक संस्था आपल्या अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीत, राज्य शासनाने मान्यता दिलेल्या नामिकेमधुन, कलम ८१ मध्ये निर्धारीत केल्याप्रमाणे लेखापरिक्षकाची किंवा लेखापरिक्षण करणाऱ्या संस्थेची चालु वित्तीय वर्षासाठी नेमणुक करायची आहे.

सहकार पणन व वस्त्रोद्योग विभागाचे शासन निर्णय क्र.सगृयो-२०१२/मुमंस१७/प्र.क्र.३६/१४-स मंत्रालय, मुंबई दि. २९/१०/२०१४ व क्र.सगृयो-२०१२/मुमंस१७/प्र.क्र.३६/१४-स मंत्रालय, मुंबई दि. २९/१०/२०१४ मधील अ.क्र. १० मध्ये म.रा.सह.आदिवासी विकास महामंडpazळ मर्या., नाशिक चे शुल्क खालील प्रमाणे नमुद आहे.

| Sr. No. | Type of Society | As per new notification | | |
|---|---|---|---|---|
| | | Scale of Fees | | |
| | | Details of Parameters | Amount as per Parameters | Maximum amount limit |
| 10 | Maharashtra State co-operative Tribal Development Corporation Ltd. | Procurement & Processing of per quintle | | 2500000 |
| a | For Government Procurement | | 0.50 | |
| b | For Service Supply | Per unit | 10000 | |
| c | In liquidation | | | 20000 |

उपरोक्त शासन निर्णयाला मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपिठ औरंगाबाद यांचे दि.०२/०५/२०१६ च्या निकाला नुसार स्थगिती (Stayed) आहे.

महामंडळाचे सन २०२२-२०२३ महामंडळाचे आर्थिक वर्षाचे सतत व समवर्तक (Current & Con-Current) पध्दतीने संवैधानिक लेखापरीक्षण करणे करीता नाशिक, पालघर, ठाणे, पुणे, नंदुरबार, धुळे, अमरावती, यवतमाळ, नागपुर, भंडारा, गडचिरोली, चंद्रपुर, औरंगाबाद, अ.नगर येथिल विषेश लेखापरिक्षक, सहकारी संस्था, वर्ग-१, यांना पत्र क्र. जा. क्र. आविम / लेखापहरीक्षण / २०२२-२०२३/ २९१९ / २०२२. नाशिक-२ दि.२४/०८/२०२२ नुसार सन २०२२-२०२३ चे संवैधानिक लेखापरीक्षण करेणे बाबत पत्र देण्यात आले होते. करीता इच्छुक विषेश लेखापरीक्षक, सहकारी संस्था यांना आपले अर्ज / संमत्ती पत्र या कार्यालयस दि.०५/०९/२०२१ पुर्वी पाठवणे बाबत सुचित केले होते. करीता दि.१०/०९/२०२२ अखेर विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था, वर्ग-१ यांचा अर्ज / संमत्ती पत्र प्राप्त झालेले नाहीत.

सन २०२२-२०२३ महामंडळाचे आर्थिक वर्षाचे सतत व समवर्तक (Current & Con-Current) पध्दतीने संवैधानिक लेखापरीक्षण करणे करीता दि.१०/०९/२०२१ अखेर खालील प्रमाणे सनदी लेखापाल व सनदी लेखापाल संस्था यांचे अर्ज प्राप्त झालेले आहे.

| अ. क्र. | सहकार पॅनल क्र. | लेखापरीक्षकाचे नाव | सहकार पॅनल वर्ग |
|---|---|---|---|
| १ | १४२०२ | के.पी.एन. ॲण्ड कंपनी, नाशिक | अ-१ |
| २ | १७८२७ | ए. एस. के. वाय. ॲण्ड कंपनी, पुणे. | अ-१ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | १४३५३ | वामु अ‍ॅण्ड असोसिएट, पुणे. | अ-१ |
| ४ | १४३७२ | मंत्री मालु अ‍ॅण्ड असोसिएट, पुणे | अ-१ |
| ५ | १७४२५ | धोंगडेपाटील गोधाणी अँण्ड कंपानी, नाशिक | अ-१ |
| ६ | १०११४४३ | तुषार बाजीराव पगार, नाशिक | अ-१ |

उपरोक्त तपशिला प्रमाणे सदर संस्था हया सन २०२२-२०२३ संवैधानिक लेखापरीक्षण करणे करीता इच्छुक आहे याबाबत तपशिल खालिल प्रमाणे.

"दि.२९/१०/२०१४ च्या शासन निर्णयातील अट क्र.२(२) एक लेखापरीक्षक एकाच संस्थेचे सलग तीन वर्षापेक्षा जास्त मुदती साठी लेखापरीक्षण करु शकत नाही." असे नमुद आहे. यापुर्वी ज्या सनदी लेखापाल फर्मने लेखापरिक्षण केले आहे त्याच्या तपशिल शेरा रकान्यात नमुद केला आहे.

प्राप्त झालेल्या सनदी लेखापालांचा अर्जाचा सविस्तर तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | लेखापरीक्षकाचे नाव | पॅनल क्र. | सहकार पॅनल वर्ग | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | के. पी. एन. अ‍ॅण्ड कंपनी, नाशिक | १४२०२ | अ-१ | यापुर्वी लेखापरीक्षण केलेले नाही. |
| २ | ए. एस. के. वाय. अ‍ॅण्ड कंपनी, पुणे. | १७८२७ | अ-१ | सन २०१८-२०१९, सन २०२०-२०२१ व सन २०२१-२०२२. |
| ३ | वामु अ‍ॅण्ड असोसिएट, पुणे. | १४३५३ | अ-१ | सन २०१५-२०१६, सन २०१६-२०१७ व सन २०१७-२०१८. |
| ४ | मंत्री मालु अ‍ॅण्ड असोसिएट, पुणे | १४३७२ | अ-१ | यापुर्वी लेखापरीक्षण केलेले नाही. |
| ५ | धोंगडेपाटील गोधाणी अँण्ड कंपानी, नाशिक | १७४२५ | अ-१ | सन २०१९-२०२० |
| ६ | तुषार बाजीराव पगार, नाशिक | १०११४४३ | अ-१ | सन २०१२-२०१३, सन २०१३-२०१४ सन २०१४-२०१५ |

करीता महामंडळाचे उपरोक्त क्र.१ व ६ पैकी एका सनदी लेखापरीक्षकाची सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण करण्याकरीता लेखापरिक्षक म्हणुन नेमणुक करणे व लेखापरिक्षण शुल्क ठरविण्याचा प्रस्ताव धोरणात्मक निर्णयास सादर.

सदरचा विषय महाव्यवस्थापक (वित्त) यांनी सभे समोर सादर केला. सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन खालील प्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव क्र.३८ :** सर्वानुमते ठराव करण्यात येतो की, सन २०२२-२०२३ या वर्षाचे लेखापरीक्षण करणेकामी तुषार बाजीराव पगार, नाशिक सनदी लेखापाल, ________ यांची नियुक्ती करणे व नियमा नुसार लेखापरीक्षण फी निश्चित करण्या करीता, वार्षिक सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यात येत आहे.

**सुचक** :- मा.श्री.केवलराम तुळशीराम काळे.
**अनुमोदक** :- मा.श्री. धनराज हरिभाऊ महाले.
ठराव सर्वानुमते मंजूर.

**विषय क्र.३९ : दि.०१/०९/२०२१ ते ३१/०७/२०२२ या कालावधीत महामंडळाने केलेली गुंतवणूक/फेरगुंतवणूक याचा अहवाल सादर करणे बाबत.**

दि.६.५.२००६ रोजीच्या संचालक मंडळ सभेतील ठराव क्रमांक १० नुसार महामंडळाकडून करण्यात येणा-या एक वर्षापर्यंतचे गुंतवणूकीचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांना प्रदान करण्यात आलेले असुन,केलेल्या गुंतवणूकीच्या कार्यवाहीचा अहवाल संचालक मंडळापुढे सादर करावयाचा आहे. महामंडळ राबवित असलेल्या योजनेतील निधीची उपलब्धता पाहुन रक्कमा गुंतवणूक केल्या जातात.

संचालक मंडळ सभा दि.१७/०९/२०२१ चे विषय क्र.०६ मध्ये दि.०१/०३/२०२१ ते ३१/०८/२०२१ पर्यत गुंतवणुक अहवाल मंजुर करण्यात आलेला असुन त्यापुढील **दि.०१/०९/२०२१ ते ३१/०७/२०२२** पर्यत गुंतवणूकीच्या कार्यवाही अहवालचा तपशील खालील प्रमाणेः-

| अ. क्र. | बँकेचे नाव | गुंतवणूक तारीख | मुदत | व्याज दर % | मुदत ठेव रक्कम | योजना |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र ग्रामीण बँक | २२.०९.२०२१ | १ वर्ष | ५.२० | १९९९९००० | |
| २ | युनियन बँक ऑफ इंडिया | २२.०९.२०२१ | १ वर्ष | ५.०० | १९९९९००० | |
| ३ | पंजाब अॅण्ड सिंध बँक | २२.०९.२०२१ | १ वर्ष | ५.०५ | १९९९९००० | |
| ४ | आय.डी बी आय बँक | २२.०९.२०२१ | १ वर्ष | ५.०५ | १९९९९००० | |
| ५ | युनियन बँक ऑफ इंडिया | २२.०९.२०२१ | १ वर्ष | ५.०० | १९९९९००० | |
| ६ | युनियन बँक ऑफ इंडिया | २२.०९.२०२१ | १ वर्ष | ५.०० | १९९९९००० | |
| ७ | युनियन बँक ऑफ इंडिया | २२.०९.२०२१ | १ वर्ष | ५.०० | १९९९९००० | |
| ८ | युनियन बँक ऑफ इंडिया | २२.०९.२०२१ | १ वर्ष | ५.०० | १९९९९००० | |
| ९ | इडियन बँक | २२.०९.२०२१ | १ वर्ष | ५.०० | १९९९९००० | |
| १० | बँक ऑफ इडिया | २२.०९.२०२१ | १ वर्ष | ५.०० | १९९९९००० | |
| ११ | महाराष्ट्र ग्रामीण बँक | २३.०९.२०२१ | १ वर्ष | ५.२० | १९९९९००० | |
| १२ | युनियन बँक ऑफ इंडिया | २३.०९.२०२१ | १ वर्ष | ५.०० | १९९९९००० | |
| १३ | पंजाब अॅण्ड सिंध बँक | २३.०९.२०२१ | १ वर्ष | ५.०५ | १९९९९००० | |
| १४ | आय डी बी आय | २३.०९.२०२१ | १ वर्ष | ५.०५ | १९९९९००० | |
| १५ | युनियन बँक ऑफ इंडिया | २३.०९.२०२१ | १ वर्ष | ५.०० | १९९९९००० | |
| १६ | युनियन बँक ऑफ इंडिया | २३.०९.२०२१ | १ वर्ष | ५.०० | १९९९९००० | |
| १७ | युनियन बँक ऑफ इंडिया | २३.०९.२०२१ | १ वर्ष | ५.०० | १९९९९००० | |
| १८ | युनियन बँक ऑफ इंडिया | २३.०९.२०२१ | १ वर्ष | ५.०० | १९९९९००० | |
| २० | युनियन बँक ऑफ इंडिया | २३.०९.२०२१ | १ वर्ष | ५.०० | १९९९९००० | एकाधिकार खरेदी योजना |
| २१ | इडियन बँक | २३.०९.२०२१ | १ वर्ष | ५.०० | १९९९९००० | |
| २२ | बँक ऑफ इंडिया | २३.०९.२०२१ | १ वर्ष | ५.०० | १९९९९००० | |
| २३ | महाराष्ट्र ग्रामीण बँक | २४.०९.२०२१ | १ वर्ष | ५.२० | १९९९९००० | |
| २४ | इडियन बँक | २३.०९.२०२१ | १ वर्ष | ५.०० | १९९९९००० | |
| २५ | युनियन बँक ऑफ इंडिया | २४.०९.२०२१ | १ वर्ष | ५.०० | १९९९९००० | |
| २६ | पंजाब अॅण्ड सिंध बँक | २४.०९.२०२१ | १ वर्ष | ५.०५ | १९९९९००० | |
| २७ | आय डी बी आय | २४.०९.२०२१ | १ वर्ष | ५.०५ | १९९९९००० | |
| २८ | युनियन बँक ऑफ इंडिया | २४.०९.२०२१ | १ वर्ष | ५.०० | १९९९९००० | |
| २९ | युनियन बँक ऑफ इंडिया | २४.०९.२०२१ | १ वर्ष | ५.०० | १९९९९००० | |
| ३० | युनियन बँक ऑफ इंडिया | २४.०९.२०२१ | १ वर्ष | ५.०० | १९९९९००० | |
| ३१ | युनियन बँक ऑफ इंडिया | २४.०९.२०२१ | १ वर्ष | ५.०० | १९९९९००० | |
| ३२ | युनियन बँक ऑफ इंडिया | २४.०९.२०२१ | १ वर्ष | ५.०० | १९९९९००० | |
| ३३ | इडियन बँक | २४.०९.२०२१ | १ वर्ष | ५.०० | १९९९९००० | |
| ३४ | बँक ऑफ इंडिया | २४.०९.२०२१ | १ वर्ष | ५.०० | १९९९९००० | |
| ३५ | आय डी बी आय | ४.०२.२०२२ | १ वर्ष | ५.०५ | १९९९९००० | |
| ३६ | पंजाब अॅण्ड सिंध बँक | ४.०२.२०२२ | १ वर्ष | ५.०५ | १९९९९००० | |
| ३७ | युनियन बँक ऑफ इंडिया | ४.०२.२०२२ | १ वर्ष | ५.०० | १९९९९००० | |
| ३८ | युनियन बँक ऑफ इंडिया | ४.०२.२०२२ | १ वर्ष | ५.०० | १९९९९००० | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३९ | आय डी बी आय | ८.०२.२०२२ | १ वर्ष | ५.०५ | १९९९९००० | |
| ४० | पंजाब व सिंध बँक | ८.०२.२०२२ | १ वर्ष | ५.०५ | १९९९९००० | |
| ४१ | आय डी बी आय | ९.०२.२०२२ | १ वर्ष | ५.०५ | १९९९९००० | |
| ४२ | पंजाब ॲण्ड सिंध बँक | ९.०२.२०२२ | १ वर्ष | ५.०५ | १९९९९००० | |
| ४३ | युनियन बँक ऑफ इंडिया | ९.०२.२०२२ | १ वर्ष | ५.०० | १९९९९००० | |
| ४४ | युनियन बँक ऑफ इंडिया | ९.०२.२०२२ | १ वर्ष | ५.०० | १९९९९००० | |
| ४५ | युनियन बँक ऑफ इंडिया | ९.०२.२०२२ | १ वर्ष | ५.०० | १९९९९००० | |
| ४६ | युनियन बँक ऑफ इंडिया | ९.०२.२०२२ | १ वर्ष | ५.०० | १९९९९००० | |
| ४७ | आय डी बी आय | १०.०२.२०२२ | १ वर्ष | ५.०५ | १९९९९००० | |
| ४८ | पंजाब ॲण्ड सिंध बँक | १०.०२.२०२२ | १ वर्ष | ५.०५ | १९९९९००० | |
| ४९ | युनियन बँक ऑफ इंडिया | १०.०२.२०२२ | १ वर्ष | ५.०० | १९९९९००० | |
| ५० | पंजाब व सिंध बँक | २२.४.२०२२ | १ वर्ष | ५.०५ | १९९९९००० | |
| ५१ | युनियन बँक ऑफ इंडिया | २०.०६.२०२२ | १ वर्ष | ६.०२ | १२०००००० | |
| ५२ | बँक ऑफ बडोदा | ३०.०६.२०२२ | १ वर्ष | ५.५० | २०५००००० | |
| ५३ | बँक ऑफ बडोदा | ३०.०६.२०२२ | १ वर्ष | ५.५० | २०५००००० | |
| ५४ | बँक ऑफ बडोदा | २९.०७.२०२२ | १ वर्ष | ६.५० | ५०००००००० | |
| ५५ | बँक ऑफ बडोदा | २९.०७.२०२२ | १ वर्ष | ६.५० | ५०००००००० | |
| **एकुण** | | | | | **१२४०९५१०००** | |
| १ | युनियन बँक ऑफ इंडिया | २३.११.२०२१ | १ वर्ष | ५.०० | १९९९९९९९ | |
| २ | युनियन बँक ऑफ इंडिया | २३.११.२०२१ | १ वर्ष | ५.०० | १९९९९९९९ | किमान आधारभुत खरेदी योजना (गौणवनोपज योजना) |
| ३ | युनियन बँक ऑफ इंडिया | २३.११.२०२१ | १ वर्ष | ५.०० | १९९९९९९९ | |
| ४ | युनियन बँक ऑफ इंडिया | २३.११.२०२१ | १ वर्ष | ५.०० | १९९९९९९९ | |
| ५ | आय डी बी आय बँक | २४.११.२०२१ | १ वर्ष | ५.०५ | १९९९९९९९ | |
| ६ | युनियन बँक ऑफ इंडिया | ०८.०२.२०२२ | १ वर्ष | ५.०० | १९९९९००० | |
| **एकुण** | | | | | **११९९९८९९५** | |
| १ | आय डी बी आय | २३.११.२०२१ | १ वर्ष | ५.०५ | १९९९९९९९ | |
| २ | पंजाब आणि सिंध बँक | २४.११.२०२१ | १ वर्ष | ५.०५ | १९९९९९९९ | |
| ३ | बँक ऑफ इंडिया | २३.११.२०२१ | १ वर्ष | ५.०० | १९९९९९९९ | |
| ४ | युनियन बँक ऑफ इंडिया | २३.११.२०२१ | १ वर्ष | ५.०० | १९९९९९९९ | |
| ५ | युनियन बँक ऑफ इंडिया | २३.११.२०२१ | १ वर्ष | ५.०० | १९९९९९९९ | |
| ६ | युनियन बँक ऑफ इंडिया | २३.११.२०२१ | १ वर्ष | ५.०० | १९९९९९९९ | |
| ७ | युनियन बँक ऑफ इंडिया | २३.११.२०२१ | १ वर्ष | ५.०० | १९९९९९९९ | |
| ८ | युनियन बँक ऑफ इंडिया | २३.११.२०२१ | १ वर्ष | ५.०० | १०००००००० | |
| ९ | युनियन बँक ऑफ इंडिया | ०२.०२.२०२२ | १ वर्ष | ५.०० | १९९९९९९९ | |
| १० | युनियन बँक ऑफ इंडिया | ०२.०२.२०२२ | १ वर्ष | ५.०० | १९९९९९९९ | एकाधिकार खरेदी योजना (गौणवनोपज योजना) |
| ११ | आय डी बी आय बँक | ०२.०२.२०२२ | १ वर्ष | ५.०५ | १९९९९९९९ | |
| १२ | आय डी बी आय बँक | १८.०४.२०२२ | १ वर्ष | ५.०५ | १९९९९००० | |
| १३ | पंजाब आणि सिंध बँक | १८.०४.२०२२ | १ वर्ष | ५.०५ | १९९९९००० | |
| १४ | बँक ऑफ बडोदा | १८.०४.२०२२ | १ वर्ष | ५.०० | १९९९९००० | |
| १५ | युनियन बँक ऑफ इंडिया | १८.०४.२०२२ | १ वर्ष | ५.०० | १९९९९००० | |
| १६ | युनियन बँक ऑफ इंडिया | १८.०४.२०२२ | १ वर्ष | ५.०० | १९९९९००० | |
| १७ | युनियन बँक ऑफ इंडिया | १८.०४.२०२२ | १ वर्ष | ५.०० | १०००५००० | |
| १८ | पंजाब आणि सिंध बँक | १९.०४.२०२२ | १ वर्ष | ५.०५ | १९९९९००० | |
| १९ | आय.डी.बी.आय बँक | १८.०४.२०२२ | १ वर्ष | ५.०५ | १९९९९००० | |
| २० | पंजाब आणि सिंध बँक | १८.०४.२०२२ | १ वर्ष | ५.०५ | १९९९९००० | |
| २१ | बँक ऑफ बडोदा | १८.०४.२०२२ | १ वर्ष | ५.०० | १९९९९००० | |
| २२ | युनियन बँक ऑफ इंडिया | १८.०४.२०२२ | १ वर्ष | ५.०० | १९९९९००० | |
| २३ | युनियन बँक ऑफ इंडिया | १८.०४.२०२२ | १ वर्ष | ५.०० | १९९९९००० | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २४ | युनियन बँक ऑफ इंडिया | १८.०४.२०२२ | १ वर्ष | ५.०० | १०००५००० | |
| २५ | पंजाब आणि सिंध बँक | १९.०४.२०२२ | १ वर्ष | ५.०५ | १९९९९००० | |
| | | एकुण | | | ४६९९९७९९० | |
| १ | महाराष्ट्र ग्रामीण बँक | ०१.१०.२०२१ | १ वर्ष | ५.२० | १९९९९००० | |
| २ | आय डी बी आय बँक | ०१.१०.२०२१ | १ वर्ष | ५.०५ | १९९९९००० | |
| ३ | पंजाब आणि सिंध बँक | ०१.१०.२०२१ | १ वर्ष | ५.०५ | १००००००० | उपदान निधी |
| ४ | महाराष्ट्र ग्रामीण बँक | २३.११.२०२१ | १ वर्ष | ५.२० | १९९९९९९९ | |
| ५ | महाराष्ट्र ग्रामीण बँक | २३.११.२०२१ | १ वर्ष | ५.२० | १९९९९९९९ | |
| | | एकुण | | | ८९९९७९९८ | |
| १ | बँक ऑफ इंडिया | ०६.०१.२०२२ | १ वर्ष | ५.०० | ३५३५०१४ | कर्मचारी कल्याण निधी |
| २ | युनियन बँक ऑफ इंडिया | ०९.०२.२०२२ | १ वर्ष | ५.०० | ४६२७४८० | |
| | | एकुण | | | ८१६२४९४ | |
| १ | युनियन बँक ऑफ इंडिया | ०६.१०.२०२१ | ९१ दिवस | ३.७५ | १९९९९९०० | |
| २ | बँक ऑफ इंडिया | ०६.१०.२०२१ | | ३.८५ | १९९९९९०० | |
| ३ | युनियन बँक ऑफ इंडिया | ०६.१०.२०२१ | | ३.७५ | १९९९९९०० | |
| ४ | युनियन बँक ऑफ इंडिया | ०६.१०.२०२१ | | ३.७५ | १५७९४९९३ | |
| ५ | युनियन बँक ऑफ इंडिया | ०६.०१.२०२२ | | ३.७५ | १६५०८३३७ | |
| ६ | बँक ऑफ इंडिया | ०६.०१.२०२२ | | ३.८५ | १९९९९९९० | |
| ७ | युनियन बँक ऑफ इंडिया | ०६.०१.२०२२ | | ३.७५ | १९९९९९९० | खावटी अनुदान योजना |
| ८ | पंजाब आणि सिंध बँक | ०६.०१.२०२२ | | ३.९० | १९९९९९९० | |
| ९ | बँक ऑफ बडोदा | १८.०७.२०२२ | ९१ दिवस | ५.०० | ३७९६५८८२ | |
| १० | बँक ऑफ बडोदा | १८.०७.२०२२ | | ५.०० | ४००००००० | |
| | | एकुण | | | २३०२६८८८२ | |
| १ | युनियन बँक ऑफ इंडिया | २१.०६.२०२२ | १ वर्ष | ६.१० | १००१००००० | |
| २ | युनियन बँक ऑफ इंडिया | २२.०६.२०२२ | १ वर्ष | ६.२० | १००१००००० | |
| ३ | युनियन बँक ऑफ इंडिया | २३.०६.२०२२ | १ वर्ष | ६.२० | १३००००००० | |
| ४ | बँक ऑफ बडोदा | २८.०६.२०२२ | १ वर्ष | ५.५० | २०१००००० | सामान्य योजना |
| ५ | बँक ऑफ बडोदा | २८.०६.२०२२ | १ वर्ष | ५.५० | २०१००००० | |
| ६ | युनियन बँक ऑफ इंडिया | ३०.०६.२०२२ | १ वर्ष | ६.४५ | ११२५००००० | |
| ७ | बँक ऑफ बडोदा | ११.०७.२०२२ | १ वर्ष | ६.०५ | २३०००००० | |
| | | एकुण | | | ४०५९००००० | |
| | | एकुणांत | | | २६६५२७७३५९ | |

माहितीस्तव व अवलोकनार्थ मंजुरीस्तव सादर.

वरील प्रमाणे महाव्यवस्थापक (वित्त) यांनी संचालक मंडळ सभा दि.०१/०९/२०२१ ते दि.३१/०७/२०२२ या कालावधीत महामंडळाने केलेली राष्ट्रीयकृत बँकेतील गुंतवणुक / फेर गुंतवणुक माहिती सादर केली. मा.श्री.भुसारा, संचालक यांना दि.१३ मार्च, २००६ व दि २७ ऑक्टोंबर, २०१५ च्या शासन निर्णया नुसार सदरची कार्यवाही करण्यात येते किंवा कसे याबाबत विचारणा करण्यात आली. मा.महाव्यवस्थापक (वित्त) यांनी सदर शासन निर्णयानुसारच कार्यवाही करण्यात येते व सर्व मुदत ठेव पावतीची गुंतवणुक राष्ट्रीयकृत बँकेतच करण्यात येत असल्याचे संचालक मंडळास अवगत कले.

मा. सुनिल भुसारा, संचालक, यांनी विचारणा केली की, गुंतवणुकीचे अधिकार कोणाला आहेत. यावर महाव्यवस्थापक (वित्त) यांनी सांगितले की, सदर शासन निर्णया नुसार १ वर्षा पर्यंतचे गुंतवणुकीचे / फेरगुंतवणुकीचे अधिकार व्यवस्थापकीय संचालकांना देण्यात आले आहे. यावर मा. सुनिल भुसारा, संचालक, यांनी सांगितले की, गुंतवणुकीचे सर्व अधिकार मा.अध्यक्ष यांना देण्यात यावे, यावर महाव्यवस्थापक (वित्त) यांनी निदर्शनास आणुन दिले की, अशी पध्दत अवलंबील्यास गुंतवणुकीस विलंब होईल व पर्यायाने महामंडळाचे व्याजाचे आर्थिक नुकसान होईल. त्यावर सर्व संचालकांनी असे सांगितले की, गुंतवणुकीचे सर्व अधिकार मा. अध्यक्ष यांनाच देण्यात यावे. सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन खालिल प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

ठराव क्र.३९ :- सर्वानुमते ठराव मंजुर करण्यात येतो कि, दि.०१/०९/२०२१ ते दि.३१/०७/२०२२ या कालावधीत महामंडळाने मुख्य कार्यालय स्तरावरुन राष्ट्रीयकृत बँकेत केलल्या गुंतवणुकीस / फेर गुंतवणुकीस सदर सभा मान्यता देण्यात येत आहे. व सदर गुंतवणुकीची ही सभा नोंद घेत आहे.

**सुचक :-** मा श्री. सुनिल भुसारा.
**अनुमोदक :-** मा श्री. भरतलाल दुधनाग.
**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**विषय क्र.४० : महामंडळाच्या सर्व कार्यालयातील अधिकारी /कर्मचारी यांचे वेतनातील आयकर (24Q), व्यवसायकर व विविध पार्टीचे आयकर (26Q) यांचे सनदी लेखापाल यांचेमार्फत रिटर्न भरणा करणेबाबतच्या कार्यवाहीस मंजूरी मिळणेबाबत.**

माहे एप्रिल २०१७ पासून महामंडळातील सर्व कर्मचाऱ्यांचे वेतन मुख्य कार्यालय स्तरावरुन अदा करण्यात येत असून सन २०२२-२३ मध्ये सर्व अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे वेतनातील कपात केलेला आयकर, व्यवसायकर सनदी लेखापाल यांचेमार्फत ऑनलाईनने भरणा करुन (24Q) सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांना Form No.16 मुख्य कार्यालय स्तरावरुनच स्थानिक पातळीवरील सनदी लेखापाल यांचेमार्फत द्यावयाचे आहेत.

तसेच महामंडळाकडे येणा-या विविध पार्टीचे अदा केल्या जाणा-या बिलातून कपात करण्यात आलेला आयकर सनदी लेखापाल यांचेमार्फत ऑनलाईनने भरणा करुन (26Q) सर्व विविध पार्टयांना Form No.16 A मुख्य कार्यालय स्तरावरुनच स्थानिक पातळीवरील सनदी लेखापाल यांचेमार्फत देण्यात येतात.

उपरोक्तनुसार सर्व कर्मचाऱ्यांचे वेतनातील कपात केलेला आयकर (24Q), व्यवसायकर व विविध पार्टीचे अदा केल्या जाणा-या बिलातून कपात करण्यात येणारा आयकर (26Q) ऑनलाईनने भरणा करण्याचे कामकाज करुन घेण्यासाठी उद्योग उर्जा कामगार विभाग मंत्रालय,मुंबई शासननिर्णय क्र.भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४,दि.०१/१२/२०१६ नुसार स्थानिक पातळीवरील सनदी लेखापालांकडून खर्चाचे दरपत्रके मागविण्यात आलेले आहेत. सदर दर पत्रकात ए.वाय.जी.असोसिएटस, सनदी लेखापाल, नाशिक यांचे (24Q) साठी खालील कामकाजासाठी सर्व करांसह सर्वात कमी दर प्राप्त झालेले आहेत.

| अ.नं. | कामांचा तपशिल | दर रूपये. |
|---|---|---|
| अ | **नियमित कामकाज** | |
| १. | अधिकारी/कर्मचारी यांचे मासिक वेतनातून कपात केलेल्या आयकराचे तिमाही रिटर्न (२४ Q) सादर करणे. महामंडळात आज अखेर एकूण ५०० च्या आत अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत.(दि.०१/०४/२०२२ ते ३०/०६/२०२२, ०१/०७/२०२२ ते ३०/०९/२०२२, ०१/१०/२०२२ ते ३१/१२/२०२२ व ०१/०१/२०२३ ते ३१/०३/२०२३ या प्रमाणे तिमाही रिटर्न सादर करणे.) | Rs.२,९७,०००/- + GST as per Applicable Rates |
| २. | महामंडळाच्या अधिकारी/कर्मचारी यांचेकडून प्राप्त झालेल्या आयकर विवरणपत्रांची तपासणी करून देणे. | |
| ३. | फॉर्म नं. १६ तयार करून महामंडळास सादर करणे. | |
| ४. | महामंडळाचे सन २०२२-२०२३ चे व्यवसाय कर विवरणपत्र सादर करणे. | |
| ब | महामंडळास शासकीय करांबाबत अद्यावत माहिती देणे व वेळोवेळी आवश्यक असल्यास सल्ला/ मत देणे. | Rs.३,०००/- + GST(Per Matter) |
| क | आयकर व व्यवसाय कर बाबत संबधित विभागांकडून पत्रव्यवहार केला जात असेल तर त्यावेळी महामंडळाचा प्रतिनिधी म्हणून महामंडळाची बाजू मांडण्यासाठी समक्ष उपस्थित राहणे, तसेच त्याबाबत आवश्यक तो पत्रव्यवहार करणे. | Rs.१०,०००/- + GST Per Hearing Representation |
| ड | म.रा.सहकारी आदिवासी विकास महामंडळाचे आयकर कायद्यानुसार आर्थिक | Rs.२५,०००/- + |

| | | |
|---|---|---|
| | वर्षनिहाय आयकर रिटर्न दाखल करणे.(एका आर्थिक वर्षाकरीता) | GST |
| इ | आयकर सल्ला/ इतर लेखाविषयक व वित्तीय बाबींविषयक सल्ला देणे. आयकर कपात करणेबाबत कायदेशीर व इतर बाबींकरीता सल्ला देणे. (प्रती सल्ला दर) | Rs.३,०००/- + GST |

तसेच के.पी.एन अँड कंपनी., सनदी लेखापाल, नाशिक यांचे (26Q) साठी खालील कामकाजासाठी सर्व करांसह सर्वात कमी दर प्राप्त झालेले आहेत.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | |
|---|---|---|
| अ | नियमित कामकाज | दर रूपये. |
| १. | व्यापारी/पुरवठेदार यांचे देयकातून कपात केलेल्या आयकराचे तिमाही रिटर्न (२६Q) सादर करणे. (दि.०१/०४/२०२२ ते ३०/०६/२०२२, ०१/०७/२०२२ ते ३०/०९/२०२२, ०१/१०/२०२२ ते ३१/१२/२०२२ तसेच ०१/०१/२०२३ ते ३१/०३/२०२३ या प्रमाणे तिमाही रिटर्न सादर करणे.) | Rs.५०,०००/- + GST |
| २. | फॉर्म नं १६ A तयार करून महामंडळास सादर करणे. | |
| ब | महामंडळास शासकीय करांबाबत अद्यावत माहिती देणे व वेळोवेळी आवश्यक असल्यास सल्ला/मत देणे. | Rs.३,०००/- + GST (Per Matter) |
| क | आयकराबाबत संबधित विभागाकडून पत्रव्यवहार केला जात असेल तर त्यावेळी महामंडळाचा प्रतिनिधी म्हणून महामंडळाची बाजू मांडण्यासाठी उपस्थित राहणे, तसेच त्याबाबत आवश्यक तो पत्रव्यवहर करणे. | Rs.१०,०००/-+GST (Per matter Hearing) |
| ड | म.रा.सहकारी आदिवासी विकास महामंडळाचे आयकर कायद्यानुसार आर्थिक वर्षनिहाय आयकर रिटर्न दाखल करणे.(एका आर्थिक वर्षाकरीता) | Rs.२५,०००/- + GST |
| इ | आयकर सल्ला/ इतर लेखाविषयक व वित्तीय बाबींविषयक सल्ला देणे. (व्यापारी/पुरवठेदार यांचे देयकांची अदायगी करतांना आयकर कपात करणेबाबत कायदेशीर व इतर बाबींकरीता सल्ला देणे.) (प्रती सल्ला दर) | Rs.३,०००/- + GST (Per Matter) |

त्यानुसार ए.वाय.जी.असोसिएटस, सनदी लेखापाल, नाशिक यांना (24Q) व के.पी.एन अँड कंपनी., सनदी लेखापाल, नाशिक यांना (26Q) साठी माहे एप्रिल २०२२ पासून सदर कामाकाजांचा आदेश देण्यात आलेला आहे. त्यांनी आदेशानुसार एप्रिल २०२२ पासून कामकाज सुरु केलेले आहे.

करीता महामंडळाच्या सर्व कार्यालयातील अधिकारी /कर्मचारी यांचे वेतनातील आयकर (24Q), व्यवसायकर व मुख्य कार्यालय स्तरावरील विविध पार्टीचे आयकर (26Q) यांचे सनदी लेखापाल यांचेमार्फत रिटर्न भरणा करणेबाबतच्या केलेल्या कार्यवाहीस मंजूरी मिळणेसाठी सादर.

वरील प्रमाणे महाव्यवस्थापक (वित्त) यांनी सदर विषय सादर केला. सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन खालिल प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव क्र.४० :-** सर्वानुमते ठराव मंजुर करण्यात येतो कि, महामंडळाच्या सर्व कार्यालयातील अधिकारी /कर्मचारी यांचे वेतनातील आयकर (24Q), व्यवसायकर व विविध पार्टीचे आयकर (26Q) दाखल करण्यासाठी सनदी लेखापाल यांच्या नेमणुकीस व उपरोक्त त्यांच्या फी करीता सदर सभा मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :-** मा श्री. अशोक भाऊराव मंगाम.
**अनुमोदक :-** मा श्री. भरतलाल दुधनाग.
**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**विषय क्र.४१ हंगाम २०२२-२०२३ करीता महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. प्रादेशिक कार्यालय, नाशिक येथे आधारभुत किंमत खरेदी योजना धान व भरडधान मालाच्या हुंडया चालु खाते क्र.१०७६३/१, १०७६३/१२ व १०७६३/१३ वर वटविणे बाबत.**

महाराष्ट्र शासनाने अन्न व नागरी पुरवठा विभागाचे मुख्य अभिकर्ता म्हणुन आधारभुत किंमत खरेदी योजना हंगाम २०००-२००१ पासुन महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत आहे.

शासनाचे निर्देश प्राप्त झाल्यास हंगाम २०२२-२०२३ मध्येही आधारभुत किंमत खरेदी योजना महामंडळास राबवावी लागणार आहे.

अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे कडुन हंगामात प्राप्त होणारा अग्रीम व खरेदी केलेल्या मालाचे साप्ताहीक विवरण (ज्या विवरणावर संबधित जिल्हाधिकारी यांची स्वाक्षरी असते) सादर केल्यांनंतर प्राप्त होणारी १००% खरेदी किंमत तसेच धान व भरडधान्यावरील अनुषंगिक खर्च तसेच धान व भरडधान्याची उर्वरीत किंमत सदर खात्यात भरणा केली जाते. यातुन हंगामात खरेदी केलेल्या धान व भरडधानाच्या हुंडया वटविण्यात येतात.

महामंडळाने खालील प्रमाणे हंगाम निहाय हुंडया वटविण्यासाठी खाते उघडेलेले आहे.

| अ.क्र. | हंगाम | खाते क्रमाक | शेरा |
|---|---|---|---|
| १. | २०००-०१ ते २०१४-१५ | १०७६३/०१ | |
| २. | २०१५-१६ | १०७६३/१२ | |
| ३. | २०१६-१७ | १०७६३/१३ | |

वरील खातेवर मागील वर्षी प्रमाणे यापुढेही बँक खाते चालु ठेवण्यास व त्या खात्यावर व्यवहार करण्यास मान्यता मिळणेबाबत संचालक मंडळ मान्यतेस सादर तथा हंगाम २०२२-२०२३ (दि.०१/१०/२०२२ ते दि.३१/०३/२०२३) व आर्थिक वर्ष २०२३-२०२४ (दि.०१/०४/२०२३ ते दि.३०/०९/२०२३) मधील आधारभुत किंमत खरेदी मालाच्या हुंडया खाते क्र.१०७६३/१३ वर वटविणेकरीता संचालक मंडळाच्या मान्यतेस सादर.

वरील प्रमाणे महाव्यवस्थापक (वित्त) यांनी सदर विषय सादर केला. सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन खालिल प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव क्र.४१ :** सर्वानुमते ठराव करण्यात येतो की, वरील खातेवर मागील वर्षी प्रमाणे यापुढेही बँक खाते चालु ठेवण्यास व त्या खात्यावर व्यवहार करण्यास तथा हंगाम २०२२-२०२३ (दि.०१/१०/२०२२ ते दि.३१/०३/२०२३) व आर्थिक वर्ष २०२३-२०२४ (दि.०१/०४/२०२३ ते दि.३०/०९/२०२३) मधील आधारभुत किंमत खरेदी मालाच्या हुंडया खाते क्र.१०७६३/१३ वर वटविणेकरीता संचालक मंडळ मान्यता देत आहे.

**सुचक** :- मा.श्रीमती. ताराबाई शंकर माळेकर.
**अनुमोदक :-** मा.श्री. विठ्ठल देवराम देशमुख.
**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्र.४२** **केंद्र शासनाच्या किमान आधारभुत गौणवनोपज खरेदी योजनाच्या (MSP MFP) हुंडया महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. प्रादेशिक कार्यालय, नाशिक येथे स्वतंत्र खाते क्र.१०७६३/१४ वर वटविणे बाबत.**

भारत सरकार जनजाती कार्य मंत्रालय यांचे पत्र क्र.२/२१/२०१३-CP&R दि.२४.०३.२०१४ अन्वये गौणवनोपज आधारभुत किंमत (M.S.P.- Minimum Support Price) माध्यमातुन गौणवनोपज M.F.P. विपणन आणि मुल्य साखळी विकास यंत्रणेच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाकडुन ७५% हिस्सापोटी रु.८,२५,००,०००/- व राज्य शासनाच्या २५% हिस्सापोटी रु. १,३३,८३,७५०/- असा एकुण निधी रु. ९,५८,८३,७५०/- महामंडळाला सन २०१४-१५ पर्यंत प्राप्त झाला आहे.

सदरची योजना अंमलबजावणीकरीता महामंडळाकडे पुरेसा निधी उपलब्ध असल्याने कर्जाद्वारे स्वतंत्र निधी उभारण्याची आवश्यकता नाही. हंगाम २०२०-२०२१ मध्ये किमान आधारभुत गौणवनोपज खरेदी योजनाच्या हुंडया महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. प्रादेशिक कार्यालय, नाशिक येथील स्वतंत्र चालु खाते क्रमांक २०६३२/१४ वर वटवण्यात आल्या आहेत. हंगाम २०२१-२०२२ मध्ये खरेदी निरंक असल्याने हुंडया वटविण्यात आलेल्या नाही.

करीता आर्थिक वर्ष २०२२-२०२३ (दि.०१/१०/२०२२ ते दि.३१/०३/२०२३) व आर्थिक वर्ष २०२३-२०२४ (दि.०१/०४/२०२३ ते दि.३०/०९/२०२३) मध्ये गौणवनोपज आधारभुत किंमत खरेदी योजनाच्या मालाच्या हुंडया महामंडळाकडील उपलब्ध निधीतुन महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या., प्रादेशिक कार्यालय येथे स्वतंत्र चालु खाते क्र.२०६३२/१४ वर वटविण्याचे मान्यतेस सादर व त्याखात्यावर व्यवहार करण्यास मान्यता मिळावी.

तथापी सदर योजना राबविण्यासाठी इतर बँके कडुन कोणताही खर्च न घेता संगणक आज्ञावली (Software) खरेदी करीता तयार करुन दिले तर बँकेत नवीन खाते उघडुन नवीन खात्यावर हुंडया वटविण्याचे मान्यतेस सादर.

वरील प्रमाणे महाव्यवस्थापक (वित्त) यांनी सदर विषय सादर केला. सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन खालिल प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव क्र.४२ :** सर्वानुमते ठराव करण्यात येतो की, केंद्र शासनाच्या किमान आधारभुत गौणवनोपज खरेदी योजनाच्या (MSP MFP) हुंडया महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. प्रादेशिक कार्यालय, नाशिक येथे स्वतंत्र खाते क्र.१०७६३/१४ वर वटविणे बाबत संचालक मंडळ मान्यता देत आहे.

**सुचक** :- मा.श्री. अशोक भाऊराव मंगाम.
**अनुमोदक** :- मा.श्री. विकास दुलाजी वळवी.
**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्र.४३ महामंडळाचा गौणवनोपज योजनेचे ऐच्छिक खरेदीच्या हुंडया महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. प्रादेशिक कार्यालय, नाशिक येथे स्वतंत्र खाते क्र.१०७६३/११ वर वटविणे बाबत.**

एकाधिकार खरेदी योजना अंतर्गत गौणवनोपज योजनेचे एच्छिक खरेदी करीता महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाकडे रु.२६/- कोटी एवढा निधी उपलब्ध आहे. हंगाम २०२२-२०२३ मधील एकाधिकार खरेदी योजनेअंतर्गत गौणवनोपज खरेदी करीता पुरेसा निधी उपलब्ध आहे.

हंगाम २०२१-२०२२ मध्ये एकाधिकार खरेदी योजना अंतर्गत गौणवनोपज योजनेचे एच्छिक खरेदी मालाच्या हुंडया महामंडळाकडील उपलब्ध निधीतुन महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. प्रादेशिक कार्यालय, नाशिक येथील चालु खाते क्रमांक १०७६३/११ वर हंगाम २०२१-२०२२ मध्ये खरेदी निरंक असल्याने हुंडया वटविण्यात आलेल्या नाही. सदर योजनेसाठी कर्जाद्वारे स्वतंत्र निधी उभारण्याची आवश्यकता भासलेली नाही. त्यामुळे कर्जावरील व्याजाची बचत झालेली आहे.

करीता हंगाम २०२२-२०२३ मध्ये खरेदी झाल्यास, आर्थिक वर्ष २०२२-२०२३ (दि.०१/१०/२०२२ ते दि.३१/०३/२०२३) व आर्थिक वर्ष २०२३-२०२४ (दि.०१/०४/२०२३ ते दि.३०/०९/२०२३) मधील एकाधिकार खरेदी योजना अंतर्गत गौणवनोपज योजनेचे एच्छिक खरेदीच्या हुंडया वटविणेकरीता महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. प्रादेशिक कार्यालय, नाशिक येथील चालु खाते क्र.१०७६३/११ यापुढेही चालु ठेवण्यास व त्या खात्यावर व्यवहार करण्यास मान्यता मिळणेबाबत संचालक मंडळाच्या मान्यतेस सादर.

तथापी सदर योजना राबविण्यासाठी इतर बँके कडुन कोणताही खर्च न घेता संगणक आज्ञावली (Software) खरेदी करीता तयार करुन दिले तर बँकेत नवीन खाते उघडुन नवीन खात्यावर हुंडया वटविण्याचे मान्यतेस सादर.

वरील प्रमाणे महाव्यवस्थापक (वित्त) यांनी सदर विषय सादर केला. सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन खालिल प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव क्र.४३ :** सर्वानुमते ठराव करण्यात येतो की, महामंडळाचा गौणवनोपज योजनेचे ऐच्छिक खरेदीच्या हुंडया महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. प्रादेशिक कार्यालय, नाशिक येथे स्वतंत्र खाते क्र.१०७६३/११ वर वटविणे बाबत संचालक मंडळ मान्यता देत आहे.

**सुचक** :- मा.श्री. धनराज हरिभाऊ महाले.

**अनुमोदक** :- मा.श्री. केवलराम तुळशीराम काळे.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्र.४४ आधारभुत किंमत खरेदी योजनेचे हंगाम २०२१-२०२२ मध्ये होणाऱ्या खरेदी करीता ICICI Bank, नाशिक येथिल मुख्य कार्यालय खाते क्र.002705014855 व प्रादेशिक कार्यालयाचे खात्यावर हुंडया वटविणे बाबत.**

महाराष्ट्र शासनाने अन्न व नागरी पुरवठा विभागाचे मुख्य अभिकर्ता म्हणुन आधारभुत किंमत खरेदी योजना हंगाम २०००-२००१ पासुन महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत आहे.

शासनाचे निर्देश प्राप्त झाल्यास हंगाम २०२२-२०२३ मध्येही आधारभुत किंमत खरेदी योजना महामंडळा मार्फत राबवीण्यात करीता,

अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे कडुन हंगामात प्राप्त होणारा अग्रीम व खरेदी केलेल्या मालाचे साप्ताहीक विवरण (ज्या विवरणावर संबधित जिल्हाधिकारी यांची स्वाक्षरी असते) सादर केल्यानंतर प्राप्त होणारी १००% खरेदी किंमत तसेच धान व भरडधान्यावरील अनुषंगिक खर्च तसेच धान व भरडधान्याची उर्वरीत किंमत सदर खात्यात भरणा केली जाते. यातुन हंगामात खरेदी केलेल्या धान व भरडधानाच्या हुंडया वटविण्यात येतात.

मगील हंगाम २०२१-२०२२ मध्ये आधारभुत किंमत खरेदी योजनेमध्ये शेतकऱ्याची धान खरेदीची अदायगी शासन नियुक्त एन.ई.एम.एल.(NeML) यांचे संगणक अज्ञावली व्दारे Publice Finance Management System (PFMS) करण्यात आली आहे. यासाठी खालील प्रमाणे ICICI Bank, शरणपुर रोड शाखा, नाशिक येथे मुख्य कार्यालय व प्रादेशिक कार्यालयांचे खाते उघडण्यात आले व त्यावर व्यवहार करण्यात आले आहे.

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | खाते क्रमाक |
|---|---|---|
| १ | मुख्य कार्यालय, नाशिक | ००२७०५०१४८५५ |
| २ | प्रादेशिक कार्यालय, नाशिक | ००२७०५०१४८६९ |
| ३ | प्रादेशिक कार्यालय, जव्हार | ००२७०५०१४८७४ |
| ४ | प्रादेशिक कार्यालय, नंदुरबार | ००२७०५०१४८६८ |
| ५ | प्रादेशिक कार्यालय, धारणी | ००२७०५०१४८९३ |
| ६ | प्रादेशिक कार्यालय, भंडारा | ००२७०५०१४८६५ |
| ७ | प्रादेशिक कार्यालय, गडचिरोली | ००२७०५०१४८६२ |
| ८ | प्रादेशिक कार्यालय, चंद्रपुर | ००२७०५०१४८६४ |
| ९ | प्रादेशिक कार्यालय, जुन्नर | ०९५४०५००१६८८ |
| १० | उपप्रादेशिक कार्यालय, अहेरी | ३८९८०५५००३६० |

करीता हंगाम २०२२-२०२३ मध्ये आधारभुत किंमत खरेदी योजनेच्या खरेदीच्या हुंडया वटविणेकरीता ICICI Bank, शरणपुर रोड शाखा, नाशिक येथे मुख्य कार्यालय व सर्व प्रादेशिक कार्यालयांचे खाते येथील उपरोक्त तपशिला प्रमाणे चालु खाते यापुढेही चालु ठेवण्यास व त्या खात्यावर व्यवहार करण्यास व मुख्य कार्यालयाचे बँक खाते महाव्यवस्थापक (वित्त) व मा. व्यवस्थापकीय संचालक यांचे वतीने महाव्यवस्थापक (प्रशासन) व व्यवस्थापक (प्रशासन), प्रादेशिक कार्यालयाचे संबधित प्रादेशिक व्यवस्थापक व व्यवस्थापक (लेखा) यांचे संयुक्तीक स्वाक्षरीने हाताळण्याचे मान्यता मिळणेबाबत संचालक मंडळाच्या मान्यतेस सादर.

वरील प्रमाणे महाव्यवस्थापक (वित्त) यांनी सदर विषय सादर केला. यांबाबत अन्न नागरी पुरवठा विभाग यांना राष्ट्रीयकृत बँके मार्फत अथवा युनियन बँक ऑफ इंडीया यांच्या मार्फत सदरच्या हुंडया वटविण्याचा

शिफारशीचा प्रस्ताव सादर करण्यात यावा. सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन खालिल प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव क्र.४४ :** सर्वानुमते ठराव करण्यात येतो की, आधारभुत किंमत खेरदी योजनेचे हंगाम २०२२-२०२३ मध्ये होणाऱ्या खरेदी करीता ICICI Bank, नाशिक येथिल मुख्य कार्यालय खाते क्र.००२७०५०१४८५५ व प्रादेशिक कार्यालयाचे खात्यावर हुंडया वटविणे किंवा राष्ट्रीयकृत बँके मार्फत अथवा युनियन बँक ऑफ इंडीया यांच्या मार्फत सदरच्या हुंडया वटविण्याचा शिफारशीचा प्रस्ताव सादर करण्यात यावा, बाबत संचालक मंडळ मान्यता देत आहे.

**सुचक** :- मा.श्रीमती. जयश्री नामदेव तळपे.
**अनुमोदक :-** मा.श्री. भरतलाल दुधनाग.
**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्र.४५ केंद्र शासनाच्या किमान आधारभुत किंमत खेरदी योजनेचे (नाफेड तुर खरेदी) (PSF) बाजार हस्तक्षेप तुर खरेदी योजना हंगाम २०२२-२०२३ मध्ये होणाऱ्या खरेदी करीता ICICI Bank, नाशिक येथिल मुख्य कार्यालय खाते क्र. ००२७०५०१४५२५ खात्यावर हुंडया वटविणे बाबत.**

हंगाम २०१८-२०१९ मध्ये केंद्र शासनाचे किमान आधारभुत किंमत खेरदी योजनेचे (नाफेड तुर खरेदी) (PSF) बाजार हस्तक्षेप तुर खरेदी करण्यात आली होती. सदर खरेदीच्या हुंडया ICICI Bank, नाशिक येथिल मुख्य कार्यालय खाते क्र. 002705014525 खात्यावर हुंडया वटविण्यात आल्या होत्या. हंगाम 2020-2021 व 2021-2022 मध्ये शासनाचे निर्देश प्राप्त नसल्याने नाफेड तुर खरेदी करण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर खातेवर व्यवहार नाही.

ही खरेदी आता होत नसल्याने हे खाते बंद करावे असे प्रस्तावित करण्यात येत आहे.

वरील प्रमाणे महाव्यवस्थापक (वित्त) यांनी उपरोक्त प्रमाणे विषय सादर केला, मा.संचालक श्री.अशोक मंगाम यांनी विचारणा केली की, मागील व्यवहार पुर्ण झाले आहे का?

त्या महाव्यवस्थापक (वित्त) यांनी सांगीतले की, अजुन संपुर्ण हिशोब होणे व निधी प्राप्त होणे बाकी आहे.

याबाबत चर्चा होऊन, सदर योजनो भविष्यात जर महामंडळास मिळाली तर, सदर खाते पुन्हा नव्याने उघडावे लागेल. सदर खाते चालु ठेवावे असे ठरले.

वरील प्रमाणे महाव्यवस्थापक (वित्त) यांनी सदर विषय सादर केला. यांबाबत अन्न नागरी पुरवठा विभाग यांना राष्ट्रीयकृत बँके मार्फत अथावा युनियन बँक ऑफ इंडीया यांच्या मार्फत सदरच्या हुंडया वटवीण्याचा शिफारशीचा प्रस्ताव सादर करण्यात यावा. सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन खालिल प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव क्र.45** :- सर्वानुमते ठराव करण्यात येतो की, केंद्र शासनाच्या किमान आधारभुत किंमत खेरदी योजनेचे (नाफेड तुर खरेदी) (PSF) बाजार हस्तक्षेप तुर खरेदी योजना हंगाम 2022-2023 मध्ये होणाऱ्या

खरेदी करीता ICICI Bank, नाशिक येथिल मुख्य कार्यालय खाते क्र. 002705014525 खात्यावर हुंडया वटवाव्या किंवा राष्ट्रीयकृत बँके मार्फत अथवा युनियन बँक ऑफ इंडीया यांच्या मार्फत सदरच्या हुंडया वटवीण्याचा शिफारशीचा प्रस्ताव सादर करण्यात यावा. बाबत संचालक मंडळ मान्यता देत आहे.

**सुचक** :- मा.श्री.मधुकर निंबाजी काठे.
**अनुमोदक** :- मा.श्री. विकास दुलाजी वळवी.
**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**मा. अध्यक्ष तथा मंत्री महोदय यांचे परवानगीने उपस्थित आयत्या वेळेचा विषय :-**

**आयत्या वेळेचा विषय क्रमांक.१ :-**

✓१) सद्यस्थित महामंडळामध्ये नियुक्तीवर असलेले व्यवस्थापकीय संचालक हे मनमानी कारभार करीत आहेत. संचालकांचे कोणत्याही सुचनांना दाद देत नाहीत. संचालक मंडळाचे किंवा अध्यक्षांचे मान्यता नसतांना परस्पर निर्णय घेतले जातात. त्यामुळे त्यांना तात्काळ महामंडळातुन कार्यमुक्त करण्यांत यावे. संचालक मंडळाची किंवा मा. अध्यक्षांची मान्यता नसतांना श्री.गजानन कोटलावार या एकाच अधिकाऱ्याकडे अनेक पदांचा कार्यभार सोपविलेला आहे. त्यांचा अतिरिक्त कार्यभार कमी करावा. तसेच श्री.विजय गांगुर्डे, महाव्यवस्थापक (विपणन) यांची नियुक्तीसाठी संचालक मंडळाचे किंवा अध्यक्षांचे मान्यता नसतांना त्यांना अतिरीक्त प्रभार देण्यात आलेला आहे. सदरचा त्यांचा पद्भार कमी करण्यात यावा. अशी मागणी मा.संचालकांनी केली.

यावर मा. अध्यक्ष महोदय यांनी याबाबत पुरावेअंती चौकशी करुन निर्णय घेण्यात येईल, असे सांगितले.

**आयत्या वेळेचा विषय क्रमांक. २ :-**

मा. व्यवस्थापकीय संचालक यांनी मा. अध्यक्ष महोदय यांची परवानगी नसतांना जुलै, २०२२ मध्ये मोठ्या प्रमाणात प्रशासकीय बदल्या केलेल्या आहेत त्या बदल्या रद्द करण्यांत याव्यात अशी मागणी सर्व संचालकांनी केली.

यावर मा. अध्यक्ष महोदय यांनी सदर केलेल्या प्रशासकीय बदल्यांमध्ये, ज्या अधिकारी / कर्मचारी यांची गैरसोय झालेली आहे, अशा अधिकारी / कर्मचारी यांचेकडुन विनंती अर्ज मागवुन घ्यावेत व त्याप्रमाणे पुढील कार्यवाहीसाठी प्रस्ताव सादर करावा अशा सुचना दिल्यात.

**ठराव क्रमांक ४६ :** सदर विषयाबाबत महामंडळात केलेल्या प्रशासकीय बदल्यांमध्ये, ज्या अधिकारी / कर्मचारी यांची गैरसोय झालेली आहे, अशा अधिकारी / कर्मचारी यांचेकडुन विनंती अर्ज मागवुन घ्यावेत व त्याप्रमाणे पुढील कार्यवाहीसाठी प्रस्ताव सादर करणेबाबतचा ठराव सर्वानमुमते पारित करण्यात येत आहे.

**सुचक** :- मा.श्री. भरतसिंग थुकेलसिंग दुधनाग, संचालक.
**अनुमोदक** :- मा.श्री. सुनिल चंद्रकांत भुसारा, संचालक.
**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**आयत्या वेळेचा विषय क्र. ३ :-**

महामंडळाचे उपाध्यक्ष हे शासनाकडुन नियुक्त केले जातात. त्याऐवजी महामंडळाचे उपाध्यक्ष हे महामंडळाच्या विद्यमान संचालकांमधुन नेमणुक देण्यात यावी.

यावर मा. अध्यक्ष महोदय यांनी महामंडळाचे विद्यमान संचालकांमधुन महामंडळाचे उपाध्यक्ष नेमणुकीसाठी प्रस्ताव तयार करुन शासनाकडे सादर करणेबाबत सुचना दिल्यात.

**ठराव क्रमांक ४७ :** सदर विषयाबाबत महामंडळाचे विद्यमान संचालकांमधुन महामंडळाचे उपाध्यक्ष नेमणुकीसाठी प्रस्ताव तयार करुन शासनाकडे सादर करणेबाबतचा ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सुचक** :- मा.श्री. भरतसिंग थुकेलसिंग दुधनाग, संचालक.
**अनुमोदक** :- मा.श्री. सुनिल चंद्रकांत भुसारा, संचालक.
**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**आयत्या वेळचा विषय क्रमांक** : 4

प्रादेशिक कार्यालय, गडचिरोली अंतर्गत हंगाम 2020-21 मध्ये आधारभुत किंमत खरेदी योजनेतील शिल्लक धान विक्री करून प्राप्त होणारी रक्कम शासनाकडे जमा करणेबाबत.

हंगाम 2020-21 मधील धान खरेदीच्या शासन निर्णयानुसार आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये आधारभुत किंमत खरेदी योजने अंतर्गत धान/भरडधान्य खरेदी करण्यात आली आहे. त्यानुसार प्रादेशिक कार्यालय, गडचिरोली अंतर्गत 12,22,909.68 क्विं. धान खरेदी पैकी 11,46,497.90 क्विं. धान भरडाई झाला असून वजन 76,411.78 क्विं. पुस्तकी साठयानुसार शिल्लक आहे. त्यापैकी घट वजन 17,342.40 क्विं.वजा जाता वजन 59,069.38 क्विं. धान प्रत्यक्षात शिल्लक आहे. प्रत्यक्ष शिल्लक धानातून वजन 9450.01 क्विं. NCDEX व BSE Beam यांचे प्लॅटफॉर्म वर दिनांक 06/07/2022 रोजी ई-लिलावाद्वारे विक्री साठी ठेवण्यात आला आहे. उर्वरीत वजन 49619.37 क्विं. धानाचा ई-लिलाव दिनांक 07/09/2022 रोजी घेण्यात आलेला आहे.

हंगाम 2020-21 मध्ये आधारभुत खरेदी योजने अंतर्गत गडचिरोली जिल्हयात आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये खरेदी झालेली आहे. मात्र खरेदी झालेल्या धानाचे शासन निर्णयानुसार निर्धारीत वेळेत भरडाई पुर्ण झालेली नाही. प्रादेशिक कार्यालय, गडचिरोली अंतर्गत एकूण 140 राईस मिल करारबद्ध असूनही धान भरडाई करण्यास बहुतांशी राईस मिलर्स इच्छुक नसल्याने प्रत्यक्ष धान भरडाई सुरू न करता शासनाकडे भरडाईबाबत अडचणी मांडण्यात आल्या व शासनासोबत झालेल्या व्हिडीओ कॉन्फरंस बैठकी नंतर शासनाने धान भरडाई करिता एक वेळची विशेष बाब म्हणून भरडाई अनुदान रुपये 100/- प्रती क्विंटल व भरडाई दराच्या रुपये 40/- व्यतिरीक्त रुपये 10/- असे एकूण रुपये 150/- प्रती क्विंटल धान भरडाई दर संदर्भ क्र. 4 अन्वये मंजुर केल्यानंतर माहे मे, 2021 च्या शेवटच्या आठवडयात राईस मिलर्स यांनी प्रत्यक्ष धान भरडाई करण्यास सुरूवात केली होती. म्हणजेच 7 ते 8 महिने धान साठा पडून होता. तद्नंतर मान्सूनच्या पावसाची सुरूवात झाल्याने उघडयावरील धानसाठा मोठया प्रमाणात खराब होण्यास सुरुवात झाली.

प्रादेशिक कार्यालय, गडचिरोली अंतर्गत उघडयावरील धान पावसात खराब होऊ नये याकरिता जिल्हा प्रशासनाच्या परवानगीने कोरानाच्या प्रार्दुभावामुळे बंद असलेल्या जिल्हा परिषद शाळा, शासकीय आश्रम शाळा, अनुदानित आश्रम शाळा मध्ये अंतर्गत वाहतूक करून धान सुरक्षितरित्या साठवणुक करुन ठेवण्यात आला होता.

याबाबत वेळोवेळी मा. सचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांना कळविण्यात आलेले आहे. प्रादेशिक कार्यालय, गडचिरोली अंतर्गत खरेदी झालेल्या धानाच्या भरडाई नंतर प्राप्त तांदुळ मिलर्सकडून जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या अधिनस्त गोदामात जमा करण्यात

आलेला आहे. परंतू वेळेवर धान भरडाई सुरू न झाल्याने शासनाने दिलेल्या भरडाईच्या मुदती अंती संपूर्ण धानाची भरडाई होऊ शकली नाही. त्यामुळे जिल्हाधिकारी, गडचिरोली यांच्या स्तरावरून शिल्लक धानाचा पंचनामा करणेबाबत निर्देश देण्यात आले होते. जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या तहसीलदार यांना खरेदी केंद्रावर शिल्लक असलेल्या धानाचा पंचनामा करण्यास आदेशित केल्यानुसार तहसिलदार यांनी शिल्लक असलेले धान पावसामुळे खराब झाल्याचे पंचनामा मध्ये नमूद केल्याने भरडाईविना शिल्लक असलेल्या धानाचा ऑनलाईन लिलाव करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

सदर योजनेत कॉस्टशिट मधील बाबनिहाय खर्च करण्याची व हिशेब सादर करण्याची कार्यपद्धती दिनांक 19/09/2019 चे शासन परिपत्रकान्वये अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने निश्चित केली आहे. संदर शासन परिपत्रकातील मुद्दा क्र. 10 नुसार शिल्लक राहिलेल्या धानाची जबाबदारी शासनाने अभिकर्ता संस्थांवर टाकली असून शिल्लक धानाची MSP दराच्या सव्वा पटीने वसूली करणेबाबत स्पष्टता आहे. धान भरडाईची मुदत संपल्यानंतर सात (7) दिवसाचे आत शिल्लक धानाचा लिलाव अभिकर्ता स्तरावर करून प्राप्त होणारी रक्कम शासनाच्या खाती जमा करणेबाबत देखिल स्पष्ट निर्देश आहेत.

शासन परिपत्रकातील निर्देशानुसार भरडाईविना शिल्लक धानाचा ई-लिलावाद्वारे विक्री करणे आवश्यक असल्याने प्रादेशिक कार्यालय, गडचिरोली यांनी दिनांक 06/07/2022 रोजी वजन 9,450.01 क्विं. चा ई.लिलाव आयोजित केला असून सदर ई-लिलावात प्राप्त दराच्या मंजूरीसाठी स्वतंत्र पणे विषय क्र. 5 ठेवला असून उर्वरीत वजन 49,619.37 क्विं. धान NCDEX, Agribid, Agribazar व BSE Beam यांचे प्लॅटफॉर्म वर दिनांक 07/09/2022 रोजी ई-लिलावाद्वारे विक्री साठी ठेवण्यात आला होता. सदर धानाची पावसामुळे प्रत खराब झाल्याने ई-लिलावाव्दारे सदर माल विक्री करिता ठेवण्यात आला होता. प्रस्तुत ई-लिलावामध्ये Agribid व Agribazar हे सहभागी झाले नाहीत. परंतू NCDEX व BSE Beam यांच्या कडून किमान रूपये 170/- व कमाल रूपये 1255/- प्रती क्विंटल दर प्राप्त झाला आहे.

प्रादेशिक कार्यालय, गडचिरोली अंतर्गत दिनांक 07/09/2022 रोजी उपरोक्त प्लॅटफॉर्मवर झालेल्या वजन 49619.37 क्विं. धानाची शासन निर्णयातील खरेदी दराप्रमाणे होणारी किंमत रु. 9,26,88,983.16 आहे. व सदर धानाला ई-निविदेमध्ये प्राप्त झालेल्या बोलीनुसार प्राप्त होणारी रक्कम रु. 4,75,30,210.15 आहे. या धानविक्री मध्ये अंदाजे रु. 4,51,58,773.01 अपेक्षित तोटा दिसत असल्याचे प्रादेशिक कार्यालय, गडचिरोली यांनी सादर केलेल्या प्रस्तावावरून दिसून येते. परंतू ई-लिलाव धारकांकडून प्रत्यक्ष धान उचल झाल्यानंतरच एकूण होणाऱ्या तोटयाची अचूक माहिती उपलब्ध होईल.

या कार्यालयाशी करारबद्ध ऑनलाईन कंपनीसोबत केलेल्या करारानुसार ई-निवीदे करिता ठेवलेल्या धानाच्या प्राप्त दरास 10 दिवसाच्या आत मंजुरी देणे नियमानुसार बंधनकारक आहे. हंगाम 2020-21 मधील धान साठा भरडाईविना आजमितीस शिल्लक असल्याने खरेदीकेंद्रावरील गोदामात साठवलेला आहे. सदर साठवणूक केलेल्या धानाची प्रत खालावली असून गोदामभाडे पोटी शासनाचे आर्थिक नुकसान होत आहे. तसेच सदर साठविलेल्या धानास यापुढे जास्तीचे दर मिळतीलच याची शाश्वती नाही.

हंगाम 2020-21 मधील भरडाईविना शिल्लक असलेल्या धानविक्रीची मंजूरी मा. अध्यक्ष, आदिवासी विकास महामंडळ यांच्या कडून घेतली जाते. परंतू प्रादेशिक कार्यालय, गडचिरोली यांनी दिनांक 06/07/2022 रोजी आयोजित केलेल्या ई-लिलावात प्राप्त दर मंजूरीसाठी पाठविले असता सदर विषय मा. संचालक मंडळा समोर ठेवण्यात यावा असे निर्देश प्राप्त असल्याने दिनांक 07/09/2022 रोजी आयोजित ई-लिलावात प्राप्त दर मंजूरी करिता सादर करण्यात येत आहे. मंजूरी प्राप्त झाल्यानंतर ई-लिलाव धारकांना धान उचल करणेसाठी डिलीव्हरी आदेश निर्गमीत करण्यात येतील व धान उचलअंती आलेल्या घटी निश्चित करून सदर व्यवहारात होणाऱ्या तोटयाचा प्रस्ताव शासनास सादर करता येईल.

करिता प्रादेशिक कार्यालय, गडचिरोली अंतर्गत दिनांक 07/09/2022 रोजी आयोजित ई-लिलावात प्राप्त दर बाबतचा विषयाबाबत महाव्यवस्थापक (विपणन) यांनी सभेपुढे मांडला असता खालीलप्रमाणे ठराव पारित करणेत आला आहे.

**ठराव क्रमांक 48** :- बहुमताने ठराव पारित करण्यात येतो की, वेळीच मालाची उचल न झाल्याने धानसाठा शिल्लक राहतो. तसेच धान भरडाई प्रक्रीयेत जिल्हाधिकारी/जिल्हा पुरवठा विभाग यांचेवर अवलंबुन रहावे लागते. त्यामुळे आधारभुत किंमत खरेदी योजनेअंतर्गत येणारा तोटयाची प्रतिपुर्ती अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने करणेबाबतचा प्रस्ताव पाठवावा.

**सुचक** :- मा. भरतलाल दुधनाग, संचालक.

**अनुमोदक** :- मा. सुनिल भुसारा, संचालक.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**आयत्या वेळचा विषय क्रमांक 5 :- 43 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मंजूरी पेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजूरी व मा.ना. श्री. वसंत पुरके सो. उपाध्यक्ष यांचे दौऱ्याचे वेळी झालेल्या खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत..**

वरील विषयान्वये सभेपुढे विषय सादर करणेत येते की, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाची 43 वी वार्षिक सर्वसाधारण सभा ही दिनांक 29/10/2016 रोजी मुख्य कार्यालय, नाशिक येथे संपन्न झालेली आहे.

सदर सभा व संचालक मंडळ यांचे भोजन व राहण्याची व्यवस्थपना करीता रुपये 10,56,722/- (अक्षरी दहा लक्ष छपन्न हजार सातशे बावीस रुपये मात्र) इतक्या खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यात आलेली आहे. परंतू सदर खर्चा व्यतिरिक्त रक्कम रुपये 1,11,288/- ( अक्षरी- एक लक्ष आकरा हजार दोनशे आठ्ठावीस रुपये मात्र) इतका जादा खर्च झालेला आहे. करीता सदर जादा झालेल्या खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणेस्तव सादर.

तसेच मा.ना.श्री. वसंत पुरके सो. उपाध्यक्ष म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळ मर्या. नाशिक व सामाजिक न्यायमंत्री श्री. शिवाजीराव मोघे यांनी प्रादेशिक कार्यालय, जुन्नर येथे दिनांक 05/03/2022 रोजी भेट दिली असता व त्यांचे समवेत असलेले अधिकारी व सामाजिक कार्यकर्ते व महामंडळाचे संचालक मा. श्री. काठे यांचे समवेत असलेले अधिकारी व सामाजिक कार्यकर्ते यांना अल्पोहार व भोजनाची व्यवस्था महामंडळामार्फत रक्कम रुपये 18,504/- इतका खर्च झालेला आहे.

वरील प्रमाणे रुपये 1,11,228/- व रुपये 18,504/- असे एकूण खर्चास रुपये 1,29,732/- (अक्षरी रुपये एक लक्ष एकोणत्तीस हजार सातशे बत्तीस मात्र) हया खर्चास मा.संचालक मंडळाची मंजूरीस सविनय सादर.

**ठराव क्रमांक 49** :- सदर विषयाबाबत उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे 43 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मंजूरी पेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजूरी व मा.ना. श्री. वसंत पुरके सो. उपाध्यक्ष यांचे दौऱ्याचे वेळी रक्कम रु.1,29,732/- (अक्षर रुपये एक लक्ष एकोणत्तीस हजार सातशे बत्तीस मात्र) झालेल्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येत आहे.

**सुचक** :- मा.श्री. सुनिल चंद्रकांत भुसारा, संचालक.

**अनुमोदक** :- मा.श्री. भरतसिंग थुकेलसिंग दुधनाग, संचालक.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**मा.श्री.गणेश सुकाळे, संचालक, कर्मचारी प्रतिनिधी यांनी मा.संचालकांसमोर महामंडळाच्या कर्मचाऱ्यांबाबत खालीलप्रमाणे सुचना मांडल्यात :-**

१) महामंडळाच्या अधिकारी / कर्मचारी यांना जुलै - २०२१ पासुन ७ वा वेतन आयोग लागु करण्यात आलेला आहे. सदर ७ वा वेतन आयोग हा शासनाच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांप्रमाणेच दिनांक ०१/०१/२०१६ पासुन लागु करण्यात यावा असे मा.श्री.गणेश सुकाळे संचालक यांनी संचालकांसमोर विनंती केली. याबाबत प्रस्ताव तयार करुन शासनास सादर करणेबाबत मा.अध्यक्ष महोदय यांनी सुचना दिल्यात.

**ठराव क्रमांक ५० :** सदर विषयाबाबत महामंडळाच्या अधिकारी / कर्मचारी यांना शासनाच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांप्रमाणेच दिनांक ०१/०१/२०१६ पासुन ७ वा वेतन आयोगाचा लाभ देणेबाबतचा प्रस्ताव तयार करुन शासनाकडे सादर करणेबाबतचा ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सुचक** :- मा.श्री. सुनिल चंद्रकांत भुसारा, संचालक.
**अनुमोदक** :- मा.श्री. धनराज महाले, संचालक.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

२) महामंडळाच्या अधिकारी / कर्मचारी यांना १२ वर्षे, २४ वर्षे याप्रमाणे पदोन्नतीचा लाभ देण्यात येतो. मात्र महामंडळाच्या अधिकारी / कर्मचारी यांना ७ वा वेतन आयोग लागु झालेला असल्याने शासनाच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांप्रमाणेच महामंडळातील अधिकारी / कर्मचारी यांनाही १० वर्षे, २० वर्षे व ३० वार्षांनी पदोन्नतीचा लाभ देण्यात यावा. असे मा.श्री.गणेश सुकाळे संचालक यांनी मा.संचालक मंडळासमोर विनंती केली याबाबत लवकरात लवकर प्रस्ताव तयार करुन शासनाच्या सादर करणेबाबत मा.अध्यक्ष महोदय यांनी सुचना दिल्यात.

**ठराव क्रमांक ५१ :** सदर विषयाबाबत महामंडळाच्या अधिकारी / कर्मचारी यांना ७ वा वेतन आयोग लागु झालेला असल्याने शासनाच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांप्रमाणेच १० वर्षे, २० वर्षे व ३० वार्षांनी पदोन्नतीचा लाभ देण्यात यावा. याबाबत प्रस्ताव तयार करुन शासनाच्या सादर करणेबाबत आयोगाचा लाभ देणेबाबतचा प्रस्ताव तयार करुन शासनाकडे सादर करणेबाबतचा ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सुचक** :- मा.श्री. भरतसिंग थुकेलसिंग दुधनाग, संचालक.
**अनुमोदक** :- मा.श्री. सुनिल चंद्रकांत भुसारा, संचालक.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

३) महामंडळामध्ये सर्व संवर्गातील पदावरील अधिकारी /कर्मचारी सेवानिवृत्तीमुळे रिक्त पदे आहेत. तथापी मागील अनेक वर्षापासुन महामंडळामध्ये पदोन्नती न झाल्यामुळे वंचित कर्मचाऱ्यांवर अन्याय होत आहे. बरेच अधिकारी/कर्मचारी हे नियुक्ती झालेल्या पदावरच अनेक वर्षापासुन काम करीत आहेत.

यावर मा. अध्यक्ष महोदय यांनी सूचना केली की, महामंडळामध्ये अनेक वर्षापासुन अधिकारी / कर्मचारी यांची पदोन्नती न झाल्यामुळे एखाच पदावर काम करीत आहेत ही बाब योग्य नाही. पुढे त्यांनी सूचित केले की, महामंडळातील पदोन्नतीस पात्र कर्मचा-यांची तात्काळ प्रस्ताव तयार करुन मान्यतेसाठी पाठविणेत यावेत.

**ठराव क्रमांक ५२ :** सदर विषयाबाबत महामंडळातील पदोन्नतीस पात्र कर्मचाऱ्यांचा तात्काळ प्रस्ताव तयार करुन मान्यतेसाठी पाठविणेबाबतचा ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सुचक** :- मा.श्री. भरतसिंग थुकेलसिंग दुधनाग, संचालक.

**अनुमोदक** :- मा.श्री. सुनिल चंद्रकांत भुसारा, संचालक.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**महाव्यवस्थापक (प्रशासन)** **महाव्यवस्थापक (वित्त)** **महाव्यवस्थापक (विपणन)**

**प्र. सदस्य सचिव तथा**
**महाव्यवस्थापक (प्रशासन)**
म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळ मर्या.,
नाशिक

**अध्यक्ष,**
म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळ मर्या.,
नाशिक तथा
मंत्री, आदिवासी विकास विभाग.